

संस्थापक
साने गुरुजी

साप्ताहिक
# साधना
Weekly Sadhana

Date of issue
शनिवार,
१० एप्रिल २०२१
मूल्य रु.२०
(एकूण पृष्ठे : ४४)

## विलास वाघ यांना अभिवादन
- सुभाष वारे
- राजा कांदळकर

# आणीबाणीच्या काळातील माझा तुरुंगवास

सुरेश द्वादशीवार




जॉब व करिअर रेडी होण्यासाठी!
कॉलेज सोबत करा करिअरची तयारी
MKCL
MS-CIT Learning Mode
आता MS-CIT केंद्रात जाऊन शिका
घरुन ऑनलाइन कंप्यूटरवर शिका
स्मार्टफोनवरून शिका
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
MKCL MS-ACIT
Information Technology for Teachers
KLiC MKCL Smart Teacher
For 21st Century Teachers
प्रवेशासाठी www.mkcl.org/join या लिंकला भेट द्या
किंवा नजिकच्या MS-CIT केंद्राशी संपर्क साधा
आजच प्रवेश घ्या
संपर्क : 8411960005

संस्थापक संपादक : साने गुरुजी
Date of issue
१० एप्रिल २०२१
वर्ष ७३ / अंक - ३४
संपादक :
विनोद शिरसाठ
**सहयोगी संपादक मंडळ :**
अभय टिळक
अतुल देऊळगावकर
मनोहर जाधव
रझिया पटेल
मुखपृष्ठ मांडणी : गिरीश सहस्रबुद्धे
अक्षररचना : **सुरेश माने**
मुद्रितशोधन : **मिलिंद बोरकर**

'साधना' हे साप्ताहिक मालक, साधना ट्रस्ट यांचेसाठी प्रकाशक हेमंत नाईकनवरे यांनी मुद्रक, आनंद लाटकर कॉम्प-प्रिंट कल्पना प्रा.लि., २५/१, यशगंगा इंड. इस्टेट प्रा.लि., वडगाव बु।।, पुणे ४११०४१ येथे छापून, **साधना साप्ताहिक, ४३१ शनिवार पेठ, पुणे ४११०३०.** येथे प्रसिद्ध केले.
**Ph.: 020-24451724 /**
**Mob.: 7028257757**
weeklysadhana@gmail.com
http://weeklysadhana.in
**साधना मीडिया सेंटर (पुस्तक विक्री केंद्र)**
Ph. : 020-24459635

**वार्षिक वर्गणी :**
**एक वर्षासाठी : ९०० रुपये**
**दोन वर्षांसाठी : १८०० रुपये**
**तीन वर्षांसाठी : २७०० रुपये**

वर्गणीची रक्कम रोख किंवा/म. ऑ./डी. डी./चेक 'साधना साप्ताहिक' या नावाने काढून, साधना कार्यालयाकडे पाठवावी. किंवा साधना साप्ताहिक, बचत खाते क्र.**60025586634, IFSC MAHB 0000001**, **बँक ऑफ महाराष्ट्र,** बाजीराव रोड शाखा, पुणे ३० येथे वर्गणीची रक्कम जमा करावी आणि नाव, पत्ता, फोन नं. इत्यादी तपशील साधना कार्यालयाला इ-मेल अथवा फोन करून कळवावेत.

(अंकातील सर्व छायाचित्रे इंटरनेटवरून साभार. अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)

# अनुक्रम

४ ...संपादकीय
**डेक्कन कॉलेज परिसरात केशवरावांची पाचवी मुलाखत**

७ **विलास वाघ : बुद्धाच्या पाऊलखुणांचे शोधयात्री**
– सुभाष वारे

११ **विलास वाघ काय काय होते?**
– राजा कांदळकर

१५ **आणीबाणीच्या काळातील माझा तुरुंगवास**
– सुरेश द्वादशीवार

२० **जॅन मॉरिस : अनोखं व्यक्तिमत्त्व**
– वासंती फडके

२७ **'उद्या' : वास्तव आणि शक्यतांवरील प्रकाशझोत**
– विजय राऊत

३१ **प्राथमिक शिक्षणाच्या उज्वल भवितव्यासाठीचे चिंतन**
– नंदकुमार मोरे

३५ **कथा : लीला**
– सागर सरहदी

३८ **महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाला खुले पत्र**
**चंद्रपूर जिल्हा दारूबंदी : खरी समस्या व उपाय**
– डॉ. अभय बंग

४० **प्रतिसाद**
– बाळकृष्ण शिंदे, प्रसन्न देशपांडे, Ashok Datar.

## संपादकीय

# डेक्कन कॉलेज परिसरात केशवरावांची पाचवी मुलाखत

प्रिय वाचकहो, मागील सहा महिन्यांत केशवरावांच्या चार मुलाखती झाल्या. अर्थातच, पहिली मुलाखत इतकी अनपेक्षित होती की, आपण स्वप्नात आहोत की भास होतोय असे वाटले होते. काळकर्ते परांजपे यांचे वर्गमित्र आणि दिडशे वर्षे पार केलेले गृहस्थ हे समोर आल्यावर खजिनाच हाती लागल्यासारखे झाले होते. त्यामुळे, दुसरी मुलाखत त्यांच्या काळातील तरुणाईचे मानस कसे होते हे समजून घेण्यासाठी घेतली. तिसरी मुलाखत, त्यांच्या काळातील ध्येयवादी पत्रकारितेचे पर्व समजून घ्यावे या हेतूने. चौथी मुलाखत न्यायसंस्थेची मूलतत्त्वे समजून घेता यावीत यासाठी, कारण ब्रिटिश काळात त्यांनी काही वर्षे न्यायाधीश म्हणून काम केले होते. अर्थात, आपण मनाशी काही प्रश्न ठरवून जावे आणि त्यांची उत्तरे घेऊन यावे, अशी मुलाखत देतील ते केशवराव कसले! किंबहुना, त्यांच्याकडे जाऊन आल्यावर नवे प्रश्न घेऊन यावे लागते आणि ते प्रश्नही सारखे सतावणारे. पण तरीही, जावेसे तर वाटते. कारण मनात लाटा लहरी उत्पन्न करणारा तो संवाद असतो.

तर, पार्श्वभूमी अशी असली तरी त्यांची पाचवी मुलाखत या ना त्या कारणाने मागे पडत होती. मात्र गेल्या महिन्याच्या अखेरीस २०२१ चा वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्ट प्रसिद्ध झाल्याच्या बातम्या आल्या तेव्हा ठरवले, या विषयावर केशवरावांशी बोललेच पाहिजे. पण त्यांच्याकडे जायचे तर मोघमपणा चालत नाही, म्हणून ठरवले तो दोनशे पानांचा रिपोर्ट किमान नजरेखालून तरी घालावा. तसे केले आणि मग ३१ मार्चला भल्या पहाटे डेक्कन कॉलेज गाठले. नेहमीच्या जागेवर गेलो. केशवराव दिसले. नेहमीप्रमाणेच क्षितिजाकडे नजर लावून बसलेले. शून्यात हरवलेले. थोडासा पायांचा आवाज करीत जवळ गेलो, त्यामुळे ते पटकन भानावर आले. पण या वेळी त्यांचा चेहरा काहीसा खिन्न वाटला. म्हणून थेट विषयाला हात घातला.

**प्रश्न :** केशवराव, तुम्ही आज जरा खिन्न दिसताय आणि आम्ही तर आलोय मोठ्या आशेने, वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्टच्या निमित्ताने चर्चा करायला...

– खिन्न होऊ नये असे काय आहे या काळात, आजच्या जगात?

**प्रश्न :** मान्य आहे! कोविडच्या अंताचा प्रारंभ झाला आहे, असे वाटले होते लसीकरण सुरू झाले तेव्हा. मात्र बघता बघता दुसरी लाट आली आणि तो आनंद क्षणिक ठरला. पण तुम्ही इतके चिंतेत राहण्याचे कारण नाही, १९२० ची स्पॅनिश फ्लू साथ अनुभवली तुम्ही आणि त्याआधी पाव शतक आलेली प्लेगची साथही!

– म्हणूनच चिंतेत आहे. त्या वेळी हाहाकार उडाला होता, कोटी–दीड कोटी माणसे बळी पडली होती त्या दोन्ही वेळी. हा कोविड–१९ निघून जाईल २०२० सोबत असे वाटत होते, पण ठाण मांडून बसलाय दीड वर्षं होत आलेय तरी. आम्ही साक्षीदार आहोत त्या साथींचे, तीन–तीन वर्षे ठाण मांडले होते त्यांनी. आताही तसे होणार की काय, अशी भीती वाटू लागली आहे.

**प्रश्न :** पण आता तेवढी भीती बाळगण्याचे कारण नाही. विज्ञान व तंत्रज्ञान फार पुढे गेले आहे, आरोग्याच्या सोयी कित्येक पटींनी वाढल्या आहेत, पायाभूत सुविधांची फारशी वानवा नाही, जाणीवजागृती करायला सर्वदूर पोहोचलेली माध्यमे आहेत, आणि मुख्य म्हणजे देश पूर्वीसारखा पारतंत्र्यात नाही.

– तुमचा हा आशावाद पोकळ आहे. इतके संशोधन झाले आहे, तरी ऑक्सिजन व रक्त यांचा तुटवडा का आहे? इतक्या सुविधा आहेत तरी हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध नाहीत, अशी स्थिती वर्षभरानंतरही का आहे? इतकी जाणीव जागृती झाली आहे तर मग पुन्हा पुन्हा निर्बंध/संचारबंदी का करावी लागत आहे? लॉकडाऊनची भीती का घालावी लागत आहे? आणि

त्या भीतीला नागरिक जुमानत नाहीत म्हणून त्यांची विनवणी सरकारला का करावी लागत आहे?

**प्रश्न :** ते थोडे बाजूला ठेवा. वर्ल्ड हॅपीनेस रिपोर्ट या संकल्पनेविषयी थोडे बोलू या का?

– त्यावर आनंदाने बोलावे असे काय आहे? १४९ देशांच्या यादीत भारताचा क्रमांक १३९ वा आहे. पहिले १० सोडा, पहिले २५ पण सोडा आणि पहिले ५० पण जाऊ द्या; मात्र पहिल्या १०० मध्येही आपला देश का येऊ नये? हा देश स्वतंत्र व्हावा, सुखी-समाधानी व्हावा अशी स्वप्नं उराशी बाळगली होती, स्वातंत्र्ययोद्धयांनी आणि आधुनिकीकरणासाठी लढणारांनी! पण आता असे वाटू लागले आहे की, ते शापीत असले पाहिजेत; म्हणून कासवगतीने चाललाय आपला प्रवास...

**प्रश्न :** अहो केशवराव, अशी व इतकी निराशा बरी नव्हे. त्या यादीत आघाडीवर असलेले बहुतेक देश युरोपातील आहेत, प्रामुख्याने उत्तर व दक्षिण गोलार्धातील टोकावर आहेत, नैसर्गिक साधनसंपत्तीने समृद्ध आहेत, आकारमान जास्त व लोकसंख्या कमी असे आहेत. मुख्य म्हणजे जागतिक राजकारणात कोणाच्या अध्यात-मध्यात नाहीत असे आहेत. त्यामुळे त्यांचा हॅपीनेस इंडेक्स जास्त असणार हे उघड आहे. आता ही पहा यादी. पहिल्या १० मध्ये कोणते देश आहेत- फिनलंड, डेन्मार्क, स्वित्झर्लंड, आइसलँड, नेदरलँड, नॉर्वे, स्वीडन, लक्झेंबर्ग, न्यूझीलंड, ऑस्ट्रिया. यांच्याशी आपल्या देशाची तुलना करणे योग्य नाही. आपला देश किती अवाढव्य, त्याच्या समस्या किती तरी जास्त आणि प्रचंड गुंतागुंतीच्या याकडे डोळेझाक करून कसे चालेल?

– नका डोळेझाक करू! पण आपण कोणाच्या रांगेत आहोत याचे भान ठेवणार आहात की नाही? शेवटच्या म्हणजे १४९ व्या क्रमांकावर आहे अफगाणिस्तान आणि त्याखाली कोणते १० देश आहेत ते पाहा- झिम्बाब्वे, रवांडा, बोट्स्वाना, लेसोथो, मलावी, हैती, टांझानिया, येमेन, बुरुंडी, भारत. या यादीत आपला देश असल्याचा अभिमान बाळगावा का आम्ही?

**प्रश्न :** केशवराव, तुमची निराशा स्वाभाविक म्हणावी लागेल. त्यामुळे, तुमच्या जखमेवर फुंकर घालून उपयोग नाही. पण या वर्षी प्रकाशित झालेला रिपोर्ट आहे नववा, पुढील वर्षी दहावा रिपोर्ट प्रसिद्ध होईल तेव्हा आतापर्यंतच्या सर्व रिपोर्ट्सचा अभ्यास करून एक विशेषांक सादर करावा म्हणतोय आमच्या साप्ताहिकाचा. कशी वाटतेय कल्पना?

– तुमचे ते स्वप्नरंजनच राहील. अशा विषयावर लिहू शकणारे लोक आहेत कोणी मराठीत? मुळात अशा विषयांचा नाद असणारे किती, असा विषय झेपणारे किती आणि तेवढ्या गांभीर्याने (सिन्सिअरली) अभ्यास करणारे किती? विद्यापीठीय स्तरावर आनंदी-आनंद, पत्रकारितेत कोणाला आहे वेळ, उसंत वा गरज आणि साहित्यिक तर अशा अहवालांपासून कोसो दूर...

**प्रश्न :** तुमचे म्हणणे खरे आहे, म्हणजे आमच्यासमोरची तुम्ही सांगितलेली अडचण खरी आहे...

– मग जरा सोपा मार्ग सुचवू का? तुम्ही एक करा, या हॅपीनेस इंडेक्समधील पहिले १० देश आणि शेवटचे १० देश यांचाच नीट अभ्यास करा किंवा करायला लावा. म्हणजे सर्वाधिक हॅपी १० आणि सर्वाधिक अनहॅपी १० अशा २० देशांचाच अभ्यास करा. आणि त्यासाठी तेवढे दहा रिपोर्ट्स वाचले किंवा वाचायला लावले तरी पुरे!

**प्रश्न :** कल्पना चांगली आहे. आघाडीचे दहा देश इतके आनंदी का आहेत, याचा शोध घेतला की रोडमॅप तरी कळेल. ते कसे व कोण घडवणार हा प्रश्न असला तरी, वाचकांच्या मनात स्पष्टता येईल.

– किती अल्पसंतुष्ट आहात तुम्ही! असा अभ्यास करून राष्ट्रीय धोरण व कार्यक्रम आखले पाहिजेत.

**प्रश्न :** बोलणे सोपे करणे अवघड असते केशवराव. रस्ते, वीज, पाणी, शाळा, आरोग्य, पर्यावरण, रोजगार, कायदा व सुव्यवस्था, स्त्री-पुरुष समानता, वंश-धर्म-भेदरहितता ही आहे राष्ट्र आनंदी होण्याची गुरुकिल्ली; हे कळते सर्व धोरणकर्त्यांना. पण उपलब्ध अवकाशात, उपलब्ध साधनसंपत्तीमध्ये अवघड असते ते. आणि आता कोविड कालखंडानंतर तर अधिक कठीण बनणार आहे ते.

– या वेळचा हॅपीनेस रिपोर्ट तर कोविडकेंद्रितच आहे. पण त्यातील सर्वांत लक्षवेधी भाष्य आलेय का तुमच्या लक्षात? जनतेच्या मनात विश्वास निर्माण होणे याला अनन्यसाधारण महत्त्व दिलेय त्यात. 'आपले पाकिट/वॅलेट हरवले तर पोलीस, शेजारी किंवा अनोळखी माणूस आणून देईल ते, असा विश्वास ज्या समाजात असतो तो समाज अधिक आनंदी असतो; भले रोजगार, पैसा आणि आरोग्याच्या सुविधा कमी असतील तरी;' अशी ठळक नोंद आहे या रिपोर्टमध्ये.

**प्रश्न :** ते विधान अतिसुलभीकरण करणारे आहे असे नाही वाटत तुम्हाला? कारण तसा विश्वास निर्माण होण्यासाठी जनतेच्या प्राथमिक गरजा पूर्ण व्हाव्या लागतात आधी. त्या टॉपटेन देशांमध्ये तशा गरजा पूर्ण झालेल्या असणार.

– भारत नावाच्या देशात तशा गरजा पूर्ण झालेला समाज इतकाही कमी नाही, आणि तरीही कसा वागतो तो! शेतकऱ्यांचीच मुले–मुली अधिकारपदावर जातात आणि लुबाडतात आपल्याच भाऊबंदांना, प्राध्यापक झालेली माणसेही मतदानासाठी घेतात हजार दोन हजारांची पाकिटे आणि व्यापारी–पोलीस यांचे ठेवा बाजूला, डॉक्टर लोकही किती नागवतात हताश लोकांना! अरे, राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी तरी...

**प्रश्न :** या हॅपीनेस इंडेक्सचा अर्थ, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रांतील लोक कसा लावतील ही शंका आहे. कारण 'ठेविले अनंते तैसेचि राहावे चित्ती असो द्यावे समाधान', या अभंगाचा दुरुपयोग सर्रास केला जातोच की...! आणि मोठी ध्येयशिखरे गाठू इच्छिणाऱ्या वा संपत्तीचे डोंगर उभे करणाऱ्यांना वेसण घालण्यासाठीही हॅपीनेस इंडेक्सचा वापर केला जाऊ शकतो.

– ते घडणारच, पण तसे म्हणणारांचा प्रभाव मंद गतीने का होईना ओसरत चाललाय. 'ठेविले अनंते'वाल्यांना तुकोबांच्या अन्य काव्यपंक्ती सुनावता येतील, उदा. अवघाचि संसार सुखाचा करिन, आनंदे भरीन तिही लोकां... आणि संपत्तीचे डोंगर नको म्हणाऱ्यांना तिकडचे बिल गेट्स, इकडचे अझीम प्रेमजी दिसतात तेव्हा creation of wealth चे महत्त्व पटू लागते हळूहळू.

**प्रश्न :** आमच्या प्रधानसरांनी त्यांच्या बालपणातील एक आठवण लिहून ठेवली आहे. त्यांच्या पटवर्धनसरांनी 'कोणतेही दोन शब्द समानार्थी नसतात', हे सांगताना दिलेले उदाहरण मार्मिक आहे. Joy, delight, happiness हे तीन शब्द समानार्थी म्हणून व्याकरणाच्या पुस्तकात आहेत, पण प्रत्यक्षात तसे नाही. म्हणजे हवेत फुगे किंवा पतंग उडताना पाहून होतो तो जॉय, क्रिकेटची रंगतदार मॅच पाहताना किंवा बहारदार शास्त्रीय संगीत ऐकतानाची अवस्था म्हणजे डिलाईट आणि हॅपीनेस या शब्दाचा अर्थ मुलांनो या वयात तुम्हाला कळणार नाही, तुम्ही मोठे व्हाल तेव्हा अन्‌हॅपीनेस वाट्याला येईल आणि मग हॅपीनेस या शब्दाचा अर्थ तुम्हाला कळेल. असे म्हणाले होते पटवर्धनसर. तर आमचा प्रश्न असा की, happiness या शब्दाचा अर्थ आनंद, समाधान, सुख यांपैकी कोणता घ्यावा?

– या प्रश्नाचे उत्तर द्यायला आता ग. प्र. प्रधान नाहीत आणि त्यांचे पटवर्धनसरही. तुमच्या सदानंद मोरेंना विचारा, ते तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक होते आणि संतसाहित्याचे अभ्यासकही आहेत.

**प्रश्न :** असो. त्या चिमुकल्या भूतानने हॅपीनेस इंडेक्सचे पिल्लू सोडले, पण तो देश कुठेच नाही या मोजमाप प्रक्रियेत. विकासाच्या मार्गात खोडा घालण्याचा हा एक छुपा डाव आहे, असेही बोलले जातेय दबक्या आवाजात...

– याला डाव म्हणा, नाही तर कटकारस्थान म्हणू द्या. वस्तुस्थिती लपून राहतेय का त्यामुळे? अहो, सारे जग जीडीपीच्या मागे धावत होते आणि जागतिक मंदीतून बाहेर येण्यासाठी धडपडत होते, तेव्हा चिमुकल्या भूतानचे आर्जव २०११ मध्ये ऐकले संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने. जागतिक स्तरावर हॅपीनेस इंडेक्स मोजला जावा, यासाठी अभ्यास करायला प्रोत्साहन दिले. अजूनही बडी राष्ट्रे गांभीर्याने घेत नाहीत त्याला आणि अविकसित राष्ट्रांना झेपत नाही ती संकल्पना. पण जगाला हळूहळू त्याच मार्गाने जावे लागणार आहे. जगातील सर्व राष्ट्रे स्वतंत्र झालीत अर्धशतकापूर्वी, पण सर्व समाज वा समूह अद्याप स्वतंत्र झालेले नाहीत आणि सर्व माणसे स्वतंत्र जगू–वागू लागण्यासाठीही भलताच काळ जायला हवा अजून, कदाचित काही शतके. पण मानवी संस्कृतीच्या खऱ्या उत्कर्षासाठी अंतिम दिशा तीच आहे, यात शंका नको.

**प्रश्न :** पण आपल्या समाजाला तर स्वातंत्र्याचे भय वाटते, मग हे होणार तरी कसे?

– हे तितकेसे खरे नाही. स्वातंत्र्य की सुरक्षितता असा प्रश्न येतो तेव्हा माणसे सुरक्षितता निवडतात. त्याला 'स्वातंत्र्याचे भय' असे म्हणणे बरोबर नाही. किमान सुरक्षितता मिळाली की, माणसे निर्भय व्हायला लागतात आणि मग स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगू लागतात.

**प्रश्न :** केशवराव, तुम्ही वयाची दिडशे वर्षे पार केलीत कधीच. त्यातील पाऊणशे वर्षे ब्रिटिश राजवटीत तर पाऊणशे वर्षे स्वतंत्र भारतात, असे आयुष्य आले तुमच्या वाट्याला. तर जरा खरे खरे सांगा ना, स्वतंत्र भारतात तुम्ही अधिक आनंदी जगलात की पारतंत्र्याच्या काळात?

– चला, उशीर झालाय, निघतो मी...

सुभाष वारे

# विलास वाघ : बुद्धाच्या पाऊलखुणांचे शोधयात्री

पुणे शहरात शिक्षण हक्क आंदोलन असो, कष्टकऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेचा विषय असो, की नर्मदा बचाव आंदोलन समर्थक गटाचे धरणे आंदोलन असो किंवा जादूटोणाविरोधी कायद्याची मागणी असो; विलास वाघसर कार्यकर्त्याच्या भूमिकेतून हातात फलक घेऊन पाठिंब्यासाठी उभे असत. सामाजिक समतेच्या चळवळीत एवढं प्रचंड योगदान आणि अनुभव असूनही त्यांच्या वागण्या-बोलण्यात कुठलाही अभिनिवेश नसायचा. 'मी कुणी तरी आहे' असा भाव नसायचा. माझी जबाबदारी म्हणून मला जे शक्य आहे तेवढं माझं योगदान द्यायला मी आलोय, हा साधा भाव असायचा. बुद्धाबद्दल बोलणं सोप आहे, त्या मार्गावर चालणे अवघड आहे. बुद्धाच्या पाऊलखुणांवर चालताना ते इतरांच्या किती तरी पुढे होते. त्यांना विनम्र अभिवादन!

समाजकारणात जवळपास साठ वर्षे सक्रिय असलेल्या आयुष्मान विलास वाघसरांचे २५ मार्चला कोरोना संसर्गाने दुःखद निधन झाले. कोरोना संसर्गाने अनेक जीवलगांना आपल्यापासून दूर नेले आहे. वाघसरांच्या जाण्याचे दुःख विसरता न येण्याजोगे आहे. पुण्याच्या सदाशिव पेठेत आंबेडकरी विचारांच्या प्रसारासाठी प्रकाशन व्यवसाय सुरू करायचा आणि तो यशस्वीपणे चालवायचा- यासाठी हिंमत तर पाहिजेच, त्याचबरोबर चिकाटी आणि दूरगामी नियोजनही हवे. ते सगळं त्यांनी व उषाताईंनी करून दाखवलं. ते अनेक आघाड्यावर सक्रिय होते, पण सुगावा प्रकाशन हीच त्यांची खरी ओळख राहिली. त्यांच्या मृत्यूनंतर सुगावाचे वाचक दुःखी झाले, तसेच त्यांनी उभ्या केलेल्या आश्रमशाळांतील मुली-मुले दुःखी झाली आणि त्यांनी आजवर जे असंख्य आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह घडवून आणले, ती विवेकाच्या वाटेवरची जोडपीही दुःखात बुडाली.

सामाजिक विषमतेचे चटके वाघसरांनी लहानपणापासून स्वतःच अनुभवले असल्याने, त्याविरोधात स्पष्ट भूमिका घेत सक्रिय होण्याचे बाळकडू त्यांना लहानपणीच मिळाले होते. आपल्या कामामागची वैचारिक प्रेरणा ही म.फुले, शाहूमहाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत गौतम बुद्ध यांची आहे; मात्र आयुष्यात काही तरी करून दाखवायचे, ही कृतिशीलतेची प्रेरणा मात्र आपल्याला आपल्या निरक्षर पण हुशार व कष्टाळू आईकडून मिळाली, असे ते आवर्जून सांगायचे. धुळे जिल्ह्यातील मोराणे हे त्यांचे गाव. दि.१ मार्च १९३९ रोजीचा त्यांचा जन्म. मोराणे गावातच त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झाले. वाघसरांनी पुण्याच्या स.प. महाविद्यालयातून १९६२ मध्ये विज्ञान शाखेतील पदवी शिक्षण पूर्ण केले. आंबेडकरी चळवळीच्या प्रबोधनाची पताका त्यांनी खांद्यावर घेतली होती. राष्ट्रसेवा दलाच्या प्रांगणातही ते तितक्याच

मोकळेपणाने रमायचे. राष्ट्रसेवा दलाच्या शिक्षण प्रसारक मंडळाचे ते काही काळ अध्यक्ष होते. सोशॅलिस्ट फ्रंटच्या स्थापनेपासून आणि पुढे समाजवादी जनपरिषद या पक्षातही त्यांनी सहभाग नोंदवला. त्यानिमित्ताने देशभरातील समाजवादी कार्यकर्त्यांशी त्यांची मैत्री जमली होती. त्यांच्या निधनानंतर साथी योगेंद्र यादव यांनी नोंदवलेली भावुक प्रतिक्रिया बोलकी होती. समाजवादी कार्यकर्त्यांबरोबरच्या संवादाची सुरुवात ते अनेकदा, 'तुम्ही बौद्ध कधी होणार?' या प्रश्नाने करायचे. समोरून थेट उत्तराऐवजी काही तरी स्पष्टीकरण यायला लागलं की लगेच पुढे म्हणायचे, 'राहू द्या, राहू द्या! हिंदू धर्मात राहून तुम्ही कसला जातीअंत करणार आहात!' या वैचारिक हल्ल्याने समोरचा समाजवादी कार्यकर्ता बिचकला की, मग मोकळेपणाने त्याच्या खांद्यावर हात टाकून त्या कार्यकर्त्याला विश्वासात घेत पुढील कार्यक्रमाच्या नियोजनाची चर्चा सुरू करायचे. वैचारिक आग्रह दुराग्रहात रूपांतरित होऊ द्यायचे नाहीत आणि वैयक्तिक संबंधांत कधी कटुता येऊ द्यायची नाही, हा सम्यक् मार्ग त्यांच्याकडून शिकण्यायोग्य होता. आंबेडकरी चळवळीतील ते खरे तर समाजवादी व आंबेडकरी चळवळीतला दुवा होते, असे नक्कीच म्हणता येईल.

वाघ यांनी आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात राष्ट्रीय व सामाजिक मूल्यांच्या प्रसारासाठी इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशनच्या प्रौढ शिक्षण कार्यक्रमात महत्त्वपूर्ण योगदान दिलेले आहे. त्यांनी पुणे रेल्वे स्टेशनवरील शालाबाह्य मुलांसाठी एक अनौपचारिक शिक्षण केंद्र वर्षभर चालवले. पुण्याच्या वडारवाडी परिसरात त्यांनी बराच काळ एक बालवाडी चालवली. सर्वेषां सेवा संघामार्फत त्यांनी देवदासींच्या मुली-मुलांसाठी पहिले वसतिगृह सुरू करून यशस्वीपणे चालविले आहे. वैदू महिलांसाठी शिक्षणवर्ग चालवले, वडारवाडी परिसरातील महिलांसाठी शिवणकाम विद्यालय सुरू केले. त्यांनी शिक्षणक्षेत्रात दीर्घ काळ मोलाचे कार्य केले. स्वतः पुढाकार घेऊन समता शिक्षण संस्थेची स्थापना केली. समता शिक्षण संस्थेमार्फत त्यांनी तळेगाव ढमढेरे, जिल्हा पुणे येथे कस्तुरबा मुलींचे वसतिगृह सुरू केले. तेथेच नंतर भटक्या-विमुक्त जमातींच्या मुली-मुलांसाठी आश्रमशाळाही त्यांनी सुरू केली. याच समता शिक्षण संस्थेच्या वतीने त्यांनी आपल्या जन्मगावी म्हणजे मोराणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाने समाजकार्य महाविद्यालय सुरू करून यशस्वीपणे चालवून दाखवले. ते शिक्षणसम्राट झाले नाहीत; पण द्रोणाचार्यांनी शिक्षणाचा अधिकार नाकारलेल्या एकलव्याच्या अनेक वारसांना अंगठ्याचे दान न मागता शिक्षण मिळावे, यासाठी आयुष्याच्या अंतापर्यंत ते झटत राहिले. वाघसरांच्या जाण्याने ते सगळे एकलव्य भावविवश झाले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रौढ आणि निरंतर शिक्षण विभागातही त्यांनी काही काळ काम केले. तिथेच त्यांची उषाताईंशी ओळख झाली आणि या ओळखीचे प्रेमात परिवर्तन होऊन त्यांचा आंतरजातीय विवाह झाला. विद्यापीठातील नोकरीचा राजीनामा देऊन त्या दोघांनी स्वतंत्रपणे सामाजिक कार्य सुरू केले आणि मग पुढे जी अनेक मोठमोठी कामे केली गेली, ती या दोघांनी मिळूनच केली. ते आणि उषाताईंचे सहजीवन हे म.फुले आणि सावित्रीबाई या जोडीसारखेच परस्परपूरक व संवादी होते. त्यांचा आपसातला स्नेह आणि विश्वास हा नव्या जोडप्यांसाठी मार्गदर्शक असाच होता. अर्थात विवेकी सहजीवन म्हणजे केवळ एकमेकांबद्दल आदर व कौतुक असे नसते आणि नसावेही. एकमेकांच्या व्यक्तिमत्त्वातील न्यून हळुवारपणे लक्षात आणून देत दोघांनीही परस्परांचे व्यक्तिमत्त्व अधिक समृद्ध करत जाणे, हाच विवेकी सहजीवनाचा अर्थ असतो. ते आणि उषाताईंचे सहजीवन हे असेच आदर्श होते. विवेकी सहजीवनामधून एकाची साथ सुटणे हे मागे राहिलेल्यासाठी जरा जास्तच त्रासदायक असते. उषाताईंना या दुःखातून सावरण्याचे बळ निर्मिक देवो.

फुले-शाहू-आंबेडकरी विचारांच्या प्रसारात वाघसर आणि उषाताईंनी स्थापन केलेले सुगावा प्रकाशन हा एक मैलाचा दगड आहे. आधी म्हटल्याप्रमाणे पुण्याच्या सदाशिव पेठेत या ध्येयासाठी प्रकाशन व्यवसायात जम बसवणे, हे नक्कीच धाडसाचे काम होते. आज सुगावा प्रकाशन हे नाव सर्वांच्या तोंडी आहे, त्याला मान्यता आहे. असे असले तरी हा प्रवास त्या वेळी सोपा नव्हता आणि आजही सोपा नाही. यासाठी किती खस्ता खाव्या लागल्या, किती कडू-गोड अनुभवांना सामोरं जावं लागलं ते वाघसर आणि उषाताईच जाणोत. आंबेडकरी विचारांवरील अविचल निष्ठा आणि त्यासाठी सर्व प्रकारचे कष्ट करण्याची तयारी असल्याशिवाय हे शक्य नव्हते. सुगावा प्रकाशनाने जसे डॉ.रावसाहेब कसबे, डॉ.सुखदेव थोरात, डॉ. यशवंत

मनोहर, उत्तम कांबळे यांच्यासारख्या मान्यवरांची पुस्तके प्रकाशित केली, तसेच त्यांनी आंबेडकरी चळवळीतील अनेक नवोदित लेखकांनाही लिहिते केले. 'माझा भाऊ- अण्णा भाऊ' हे सुगावाचे पहिले पुस्तक. डॉ. रावसाहेब कसबे यांनी लिहिलेले 'आंबेडकर आणि मार्क्स' हे दुसरे पुस्तक. कथा-कादंबऱ्या प्रकाशित न करता केवळ वैचारिक साहित्याला आणि त्यातही आंबेडकरी विचारांच्या साहित्याला वाहून घेणे हे काम ध्येयासाठी वेडे होणाऱ्यांना व त्यासाठी वैयक्तिक आयुष्यात अनेक आव्हानांना भिडण्याची तयारी असणाऱ्यांनाच जमू शकते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्रखंड, डॉ.आंबेडकर आणि हिंदू कोड बील, डॉ.भा. ल. भोळेलिखित आंबेडकरांचा वैचारिक वारसा, उत्तम कांबळेसरांचे वामनदादांच्या गीतातील भीमदर्शन, गं. बां. सरदारलिखित गांधी आणि आंबेडकर, डॉ.रावसाहेब कसबे यांचे डॉ.आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना, य. दि. फडकेसरांचे डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि काळाराम सत्याग्रह अशी एकापेक्षा एक मौल्यवान पुस्तके सुगावा प्रकाशनाने दिली व वाचकांपर्यंत पोहोचवली. शोषितांचे नेते आणि संविधाननिर्माते याशिवाय बाबासाहेबांच्या कर्तृत्वाचे इतर अनेक दुर्लक्षित पैलू समाजासमोर आणण्यासाठी काही विशेष पुस्तके सुगावाने प्रकाशित केली. डॉ.सुखदेव थोरात यांनी लिहिलेले डॉ.बाबासाहेब आंबेडकर : नियोजन जलविद्युत विकास भूमिका व योगदान तसेच विजय खरेलिखित डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रीय सुरक्षा, डॉ.भालचंद्र मुणगेकर यांचे भारतातील आर्थिक सुधारणा आणि डॉ.आंबेडकर ही त्या अर्थाने सुगावा प्रकाशनाची महत्त्वाची पुस्तके ठरावीत. जिथे वाचक तिथे पुस्तके



पोहोचविण्यासाठी त्यांनी व उषाताईंनी जे अविश्रांत कष्ट घेतले, तशी मेहनत अन्य कुठल्याही प्रकाशनाने घेतलेली मला आठवत नाही. पुस्तकांचे गठ्ठे उचलणे, वाहनात चढवणे, गठ्ठे उतरवणे ही कामेसुद्धा त्या दोघांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत अनेकदा केलीत. दि.६ डिसेंबर आणि १४ एप्रिलला विविध शहरांत तसेच मोठ्या कार्यक्रमांच्या व अधिवेशनांच्या स्थळी सुगावाचे स्टॉल लागावेत आणि पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचावीत यासाठीची त्यांची धडपड वाचकांचा प्रतिसाद मिळाला की, सत्कारणी लागायची. पुस्तक प्रकाशनासोबतच सुगावा नियतकालिकातून अनेक महत्त्वाच्या विषयांवरील प्रबोधन साहित्य हे कार्यकर्ते व वाचकांसमोर ठेवून या विचारांची एक जनचळवळ उभी राहावी, असा वाघसरांचा प्रयत्न असायचा. आंबेडकरी राजकारणाची चिकित्सा आणि भविष्यासाठी दिशादर्शन हा त्यातील महत्त्वाचा विषय असायचा. आंबेडकरी प्रबोधन चळवळीत सुगावाचे स्थान सतत अग्रभागी राहील आणि वाघसरांचे स्मरणही त्या निमित्ताने सतत होत राहील.

परिवर्तन मिश्रविवाह संस्थेच्या वतीने आंतरजातीय व आंतरधर्मीय विवाह करू इच्छिणाऱ्या युवती-युवकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहायचं कामं तर त्यांनी ज्या बांधिलकीने केलं, ती सलाम करण्याजोगीच आहे. त्यांच्या व उषाताईंच्या मदतीने असंख्य विवाह झाले आणि यशस्वी झाले. एस.एम.जोशी सोशलिस्ट फाउंडेशनची वास्तू ही त्यासाठी त्यांच्यासहित इतरांनी पण हक्काची जागा मानलेली आहे. या कामात पण केवळ विवाह लावून देणे एवढेच कर्तव्य त्यांनी कधी मानले नाही. आर्थिक दृष्ट्या सक्षम नसलेल्या जोडप्यांच्या पाठीशी ते आई-वडिलांच्या मायेने उभे राहिले. जोडप्याचा संसार नीट मार्गी लागेपर्यंत लक्ष ठेवत राहिले. नवरी आणि नवरा दोन्हीकडच्या घरच्यांची सहमती असेल, तर आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाहांना अनेक जण उपस्थित राहतात. शुभेच्छा वा आशिर्वाद देतात. पण दोनपैकी एक किंवा दोन्हीकडच्या घरच्यांचा विरोध असेल आणि तणाव असेल, तर मोजकेच लोक मदतीला तयार असतात. अशा मोजक्या लोकांमध्ये ते आघाडीवर असायचे. पोलीस स्टेशन असो की कोर्टबाजी असो- वाघसर ती स्वतःची जबाबदारी समजून हजर असणार, पुढाकार घेणार. आंतरजातीय-आंतरधर्मीय विवाह केलेल्या अनेक जोडप्यांच्या मनात वाघसरांच्या जाण्याने आज पोरकेपणाची भावना आहे, तशी ती चळवळीतील अनेक विद्रोही तरुणी-तरुणांच्या मनात पण आहे. कारण बंडखोर तरुणाईच्या पाठीशी उभे राहताना वाघसर संभाव्य नुकसानीचा हिशोब कधी मांडायचे नाहीत.

विलास वाघसर हे बोलके समाजकारणी नसून क्रियाशील कार्यकर्ते तर होतेच, पण त्यांनी आपल्या कामाला कप्पेबंद स्वरूपही कधी येऊ दिले नाही. सुगावा प्रकाशन व सुगावा नियतकालिक तसेच परिवर्तन मिश्रविवाह संस्था आणि समता शिक्षण संस्था हा सगळा व्याप सांभाळतानाच समविचारी जनआंदोलनांच्या लढ्यांना साथ देण्यासाठी पण ते आवर्जून वेळ काढायचे. १९७६ च्या विषमता निर्मूलन शिबिराने 'एक गाव- एक पाणवठा'ची हाक देताच त्यांनी पुणे जिल्ह्यातील ४० गावांना भेटी दिल्या. जातीयता या विषयावर गावकऱ्यांशी संवाद साधला. पाणवठे सर्वांना खुले करण्याचा प्रयत्न केला. मला आठवतंय तसं पुणे शहरात शिक्षण हक्क आंदोलन असो, कष्टकऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेचा विषय असो, की नर्मदा बचाव आंदोलन समर्थक गटाचे धरणे आंदोलन असो किंवा जादूटोणाविरोधी कायद्याची मागणी असो; ते कार्यकर्त्यांच्या भूमिकेतून हातात फलक घेऊन पाठिंब्यासाठी उभे असत. सामाजिक समतेच्या चळवळीत एवढं प्रचंड योगदान आणि अनुभव असूनही त्यांच्या वागण्या-बोलण्यात कुठलाही अभिनिवेश नसायचा. 'मी कुणी तरी आहे' असा भाव नसायचा. माझी जबाबदारी म्हणून मला जे शक्य आहे तेवढं माझं योगदान द्यायला मी आलोय, हा साधा भाव असायचा. बुद्धाबद्दल बोलणं सोप आहे, त्या मार्गावर चालणे अवघड आहे. बुद्धाच्या पाऊलखुणांवर चालताना ते इतरांच्या किती तरी पुढे होते. त्यांना विनम्र अभिवादन!

**सुभाष वारे**, पुणे
subhashware64@gmail.com
Mob.9822020773

राजा कांदळकर

# विलास वाघ काय काय होते?

समाजवाद्यांमधला आंबेडकरवादी आणि आंबेडकरवाद्यांमधला समाजवादी अशी त्यांची सार्थ ओळख होती. एका अर्थाने समाजवादी आणि आंबेडकरवादी चळवळींना जोडणारा पूल ते झाले होते. गांधी-आंबेडकर या दोन्ही विचारधारा एकमेकांना पूरक ठरणाऱ्या आहेत, हे त्यांनी मनोमन स्वीकारलं होतं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राममनोहर लोहिया आणि एस. एम. जोशी यांच्या स्वप्नातला राजकीय पक्ष उभा करायचा, या नादापायी भाई वैद्य यांच्यासोबत वाघ सरांनी समाजवादी जनपरिषद हा पक्ष उभारायचा प्रयत्न करून पाहिला. पण आपला पिंड राजकीय नेत्याचा नाही, हे त्यांच्या लवकरच लक्षात आलं असावं की काय कुणास ठाऊक? ते त्यात रमले नाहीत. का रमले नसावेत? दिवसही उलटे फिरत चाललेत, हे त्यांच्या लक्षात येत होतं.

प्रा. विलास वाघ दि.२५ मार्चला पहाटे निधन पावले. ते ८३ वर्षांचे होते. 'वाघसर' म्हणत सर्व जण त्यांना. ते गेल्यानंतर समाजमाध्यमात त्यांचे चाहते प्रतिक्रिया देत होते. तेव्हा उमजत गेलं की, वाघ सर काय काय होते! सुगावा मासिकाचे संपादक, सुगावा प्रकाशनाचे प्रकाशक, देवदासींच्या मुला-मुलींसाठी पहिलं वसतिगृह सुरू करणारे द्रष्टे समाजसेवक, शिक्षणसंस्था उभारून शाळा-कॉलेजं काढणारे शिक्षणसंस्था चालक, जातिनिर्मूलनाचा ध्यास घेतलेले कार्यकर्ते-संघटक, सत्यशोधक, समाजवादी, आंबेडकरी चळवळीतले कृतिशील कार्यकर्ते-नेते, समाजवादी जनपरिषद या राजकीय पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष; तसेच पुणे विद्यापीठ, अशोक माध्यमिक विद्यालय, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन या संस्थांत प्रभावी काम केलेले विद्यार्थिप्रिय शिक्षक, महाराष्ट्रभरातील सर्व परिवर्तनवादी चळवळींचे मित्र... अशी किती रूपं आहेत त्यांची!

दि.१ मार्च १९३९ रोजी मोराणे (जि. धुळे) इथं वाघ सरांचा जन्म झाला. हे गाव स्वातंत्र्य चळवळीचा प्रभाव असलेलं. त्यामुळे इथल्या सर्व तरुणांवर स्वातंत्र्य चळवळीने पुढे आणलेल्या विचारांचे संस्कार होणं स्वाभाविक होतं. वाघ सरांवर ते संस्कार झाले नसते, तरच नवल. स्वातंत्र्य मिळालं. आता नवा देश घडवायचा, तो गांधी-आंबेडकरांच्या विचारांचा- असा ध्यास घेतलेल्या तरुणांपैकी एक होते वाघ सर. धुळे- जळगाव- खानदेश या परिसरातली फक्त जमीनच सुपीक नाही; तर इथला समाजही सुपीक, नवविचारांची मशागत झालेला. साने गुरुजींची कर्मभूमी- विचारभूमी असलेला.

अशा खानदेशातून नव्या जगण्याचं स्वप्न घेऊन पुण्यात आलेला विद्यार्थी म्हणजे विलास वाघ. पुण्यात एस. पी. कॉलेजमधून ते पदवीधर झाले. नंतर शिक्षक म्हणून नोकरीसाठी काही काळ कोकणात नरडवणे इथं काम केलं.

त्यानंतर पुण्यातल्या अशोक विद्यालयात शिक्षक म्हणून रुजू झाले.

कार्यकर्ता-शिक्षक अशी त्यांची अल्पावधीतच ओळख झाली. त्यांनी १९७२ मध्ये 'सुगावा' मासिक सुरू केलं. त्यांनी १९८३ मध्ये उषाताईंशी आंतरजात-धर्मीय विवाह केला. वाघ स्वत: बौद्ध. उषाताई कुलकर्णी हिंदू कुटुंबातून आलेल्या. उषाताई गणिताच्या नावाजलेल्या प्राध्यापक होत्या. पुणे विद्यापीठात दोघांचे सूर जुळले. दोघांनी एकजीवानं पुढचा कार्याचा सारा डोंगर उभा केला. दोघांनी नोकऱ्या सोडल्या आणि सामाजिक काम सुरू केलं.

उषाताई गणिताच्या प्राध्यापक असल्यानं व्यवहार-कुशल. वाघ सर यांना व्यवहाराचा कंटाळा असावा, असं वाटे. वाघ सरांच्या पंच्याहत्तरीला 'प्रबोधनपर्व' हा विशेषांक काढण्यात आला होता. वाघ सर आणि उषाताई यांचं जीवनच एक प्रबोधनपर्व म्हणता येईल. 'सुगावा' मासिक आणि 'सुगावा प्रकाशन' चालवणं हे मोठं कठीण काम. दर महिन्याला अंक काढणं जिकीरीचं. लेख जमा करणं, त्याचे डीटीपी, प्रूफरीडिंग, छपाई बघणं, अंक घेऊन येणं, त्यांच्या घड्या घालणं, पोस्टाची तिकिटं लावणं, जिल्हावार गठ्ठे करणं, मग ते पोस्टात टाकणं- हे काम वाघ सर आणि उषाताई दर महिन्याला स्वत: करत. कधी माझ्यासारखा कुणी त्यांच्या मदतीला असे. प्रकाशनाचेही असेच. प्रूफरीडिंग करणं, पुस्तकाचं छपाई बघणं, मुखपृष्ठ करून घेणं- ते ती पुस्तकं विकणं- तीही सार्वजनिक कार्यक्रमात टेबल मांडून! असा व्याप दोघांनी सतत मांडला. निभावला.

मासिक आणि पुस्तक प्रकाशन करताना वाघ सरांची भूमिक स्पष्ट होती. ज्ञान-साहित्य-व्यवहाराचं लोकशाहीकरण करण्याची. जातव्यवस्थेचे चटके भोगल्यानं त्यांना मक्तेदारीचा जाम तिटकारा होता. मिरासदारीची चीड होती. साहित्यव्यवहारातल्या ब्राह्मणी प्रवृत्तीला ते कडवा विरोध उभा व्हावा म्हणून धडपडत. 'सुगावा'त त्यांनी किती नवनवे लेखक उभे केले. कवींच्या कवितांना 'सुगावा'मध्ये जागा दिली. दि.६ डिसेंबरला न चुकता निघणारा त्यांचा विशेषांक आगळावेगळा असे. आंबेडकरी विचारधारा समृद्ध करणारं साहित्य, लेख त्यात असत. एका विषयाला वाहिलेला असे. नवनवे लेखक त्या अंकात लिहीत. यातले नवखे कवी, लेखक पुढे-नावारूपाला आले. कुणीही फाटका कार्यकर्ता वाघ सरांकडे 'सुगावा'च्या सदाशिव पेठेतल्या दुकानकम-ऑफिसात लेख, कविता आणून देई. नवा कार्यकर्ता, लेखक, कवी किंवा आम माणसांचं वाघ सरांना भारी कौतुक. तो काय वाचतो, लिहितो, काय काय करतो- हे वाघसरांना जाणून घेण्याची भारी हौस.

'सुगावा'चा दर महिन्याचा अंक ते तेवढ्याच हौसेने आलेल्या प्रत्येकाला दाखवत. प्रत्येक पुस्तक त्यांना स्वत:चं मूल वाटे. वाघसर शिक्षण, प्रकाशन, संपादन, चळवळीत पन्नासेक वर्षे महत्त्वाचा रोल करत होते. सत्यशोधक, समाजवादी, आंबेडकरी चळवळीत त्यांच्या शब्दाला किंमत होती. या चळवळींचे ते भाष्यकार होते. पण 'मी खूप मोठा आहे', असा अहंकाराचा वारा त्यांच्या अंगी लागला नाही. त्यांनी कधी स्वत:चं मार्केटिंग केलं नाही. आजच्या भाषेत ते खुद्द एक ब्रँड होते, पण त्यांना त्याची पर्वा नव्हती. आपण न-नायक आहोत, हे जणू त्यांनी ठरवून टाकलेलं होतं की काय, कुणास ठाऊक! नायकत्वाची त्यांना शिसारी बसली असावी. दि.६ डिसेंबर (मुंबई) आणि धम्मचक्र परिवर्तनदिन (नागपूर) इथं 'सुगावा'चा पुस्तक विक्रीचा स्टॉल हामखास असे. पुस्तक विकणं हा त्यांच्या हौसेचा विषय. महाराष्ट्रभरातील पुस्तक विक्रेत्याचे वाघ सरांकडे येणे-जाणे असे. त्यांचे बारीकसारीक प्रश्न-अडचणी, खोडी, स्वभाव वाघ सरांना माहीत असत. हे पुस्तके विक्रेते 'सुगावा' प्रकाशनाची पुस्तक विक्रीसाठी नेत. काही विक्रेते हिशेब नीट देत नसत. पैसे वेळेवर न देणं, कधी बुडवणं असं पुस्तक विक्रेत्यांकडून होत असे. अनेक जण वाघ सरांशी खोटे बोलत, तेव्हा उषाताईंना राग येत असे. वाघ सर सांभाळून घेत. 'सुगावा' प्रकाशन ही वाघ सरांची जीवनशैली होती. व्यवसाय म्हणून त्यांनी त्याकडे कधी बघितलं नाही.

'सुगावा'मार्फत त्यांनी कॉम्रेड शरद पाटील, डॉ.रावसाहेब कसबे अशा दिग्गजांची पुस्तकं प्रकाशित केली. दलित, आदिवासी, भटके-विमुक्त, कष्टकरी, अनाथ, देवदासी, दलित, ख्रिश्चन, मुस्लिम या समूहाच्या प्रश्नांवरची पुस्तकं त्यांनी अग्रक्रमाने प्रकाशित केली. त्यातून मराठी साहित्य, विचार यांच्या अभिजनकेंद्री स्वरूपाला त्यांनी सुरूंग लावला. सर्व जात-धर्मांचे लेखक उभे करून साहित्याचं लोकशाहीकरण केलं. हे त्यांचं मराठी साहित्याला खूप मोठं योगदान मानावं लागेल.

वाघ सरांची जीवनशैली सहज होती. मंचावर ज्या सहजपणे ते वावरत, त्याच सहजपणे ते लोकांचे प्रश्न

सोडवत. परत त्याचा कुठे बोलबाला करण्यात त्यांना काडीचाही रस नसे. स्वत:च्या कामाचा लेखाजोखा मांडण्यात त्यांना हिरीरी वाटत नसे. एखादा तपस्वी ज्या तन्मयतेने व्रत करत असेल, तसं त्यांचं सारं कार्य लयबद्धपणे सुरू असे.

त्यांचा गोतावळा खूप मोठा होता. राज्यभरातले नेते, कार्यकर्ते, लेखक, कवी यांच्याशी त्यांचा सतत संवाद असे. ते त्यांच्या मतांवर ठाम असत. पण कुणाशी कटुता येऊ द्यायची नाही, हे त्यांचं ठरलेलं असे. ते निर्मळ हसत. त्यांच्याकडे पाहिलं की वाटे– इतकं निरंहकारी, निर्विष, निष्कपट जगता यायला हवं.

हेन्री डेव्हिड थोरो म्हणतो– हजारापैकी एक व्यक्ती सद्गुणी असते, उरलेले नऊशे नव्याण्णव सद्गुणांचे केवळ कोरडे समर्थक असतात. वाघ सर या हजारातले एक सद्गुणी व्यक्ती होते. वाघ सरांमध्ये खानदेशी माणसांतला मायाळूपणा शिगोशिग भरलेला होता. पुण्यात सिंहगड रोडला वडगाव बुद्रुक इथं देवदासी, अनाथ मुलांचं

सोई–सवलती, जात–समूह आधारित सत्तावाटप या पलीकडे राजकारण न्यायला हवं. तरुणांमध्ये प्रबोधन– प्रशिक्षणाचा प्रभावी कार्यक्रम सतत राबवावा, त्यातून पुरोगामी चळवळींना–विचारांना बळ मिळेल, अशी त्यांची मनोधारणा होती. कार्यकर्त्यांनी, लिहिणाऱ्यांनी खूप शिकावं अशी शिदोरी वाघसरांजवळ होती. ते कुणाही विषयी पाठीमागे वाईट बोलत नसत. जेवढं समोर बोलता येईल तेवढं आणि तेच समोर बोलायचं, अशी त्यांची धारणा असायची. चहाड्या, कुटाळक्या, गटबाजीत त्यांना रस नव्हता. जवळ येणाऱ्यांवर अपार माया करणं, त्याला गुण–दोषांसहित सांभाळून घेणं हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष होता. त्यांच्या वागण्या–बोलण्यात करुणा होती. कुठून आलं होतं हे? मी बौद्ध आहे, हे ते अभिमानानं सांगत.



वसतिगृह ते चालवत. त्या मुला-मुलींना ते नियमित भेटत. पहिली ते चौथीची मुलं ती. वाघ सर आले की त्यांना अत्यानंद होई. आपलं कुणी आलंय, आता खाऊ मिळेल, आपल्याला कडेवर उचलून घेईल, आपलं कोडकौतुक होईल- असं प्रत्येक मुलाला वाटे. मुलं वाघ सरांना बिलगत. मग वाघ सर, उषाताई मुलांना खेळवत. त्यांच्याशी गप्पा, त्यांना खाऊ देत. मुलांच्या खोड्या, त्यांना समजावून सांगणं असं पाहण्यासारखं व अनुभवण्यासारखं ते दृश्य असे.

वाघ सरांबद्दल मुलांना किती विश्वास वाटे! आपल्या आजोबांना सांगावीत अशी गुपितं, अडचणी, कौतुक मुलं त्यांना सांगत. ते विश्वासाचं नातं केवळ पाहत राहावं असं वाटे.

वाघ सरांमध्ये एक लहान मूल सतत दडलेलं असावं. लहान मुलाच्या निरागसपणे ते जगण्याकडे बघत असावेत. कुणाचा राग नाही, कुणाशी छक्केपंजे नाहीत, कुणाशी स्पर्धा नाही. त्यांना महान व्हायचा सोस नव्हता. आमदार, खासदार, मंत्री होण्याची वाट त्यांची नव्हतीच. सत्ता महत्त्वाची असते, हे त्यांना कळलं होतं; पण सत्ताबाजीत त्यांना रस नव्हता. स्वत:च्या संस्थेतही ते संस्थाचालकासारखे वागत नसते. कुणाचे मालक बनण्याची त्यांना गोडी नव्हती. आपण समाजाचं काम करतोय, हा भाव सतत त्यांच्याजवळ असे.

राष्ट्रसेवा दलाचे त्यांच्यावर संस्कार होते. समाजवादी चळवळीत भाई वैद्य, बाबा आढाव यांच्यासोबत ते विविध चळवळींत लढले. समाजवाद्यांमधला आंबेडकरवादी आणि आंबेडकरवाद्यांमधला समाजवादी अशी त्यांची सार्थ ओळख होती. एका अर्थाने समाजवादी आणि आंबेडकरवादी चळवळींना जोडणारा पूल ते झाले होते. गांधी-आंबेडकर या दोन्ही विचारधारा एकमेकांना पूरक ठरणाऱ्या आहेत, हे त्यांनी मनोमन स्वीकारलं होतं. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, डॉ. राममनोहर लोहिया आणि एस. एम. जोशी यांच्या स्वप्नातला राजकीय पक्ष उभा करायचा, या नादापायी भाई वैद्य यांच्यासोबत वाघ सरांनी समाजवादी जनपरिषद हा पक्ष उभारायचा प्रयत्न करून पाहिला. पण आपला पिंड राजकीय नेत्याचा नाही, हे त्यांच्या लवकरच लक्षात आलं असावं की काय कुणास ठाऊक? ते त्यात रमले नाहीत.

का रमले नसावेत? दिवसही उलटे फिरत चाललेत, हे त्यांच्या लक्षात येत होतं. फुले, शाहू, आंबेडकर ही सुधारणावादी विचारधारा पुढच्या पिढीत रुजवण्यासाठी परिणामकारक राजकीय-सांस्कृतिक कार्यक्रम हवा, हे ते सतत मांडत. डावे, समाजवादी, आंबेडकरवादी यांची संस्थात्मक पातळीवर पडझड झालीय, याचा सुगावा त्यांना लागला होता. त्यामुळे आता राष्ट्रसेवा दलासारखी संघटना जीव ओतून पुन्हा बांधली पाहिजे, याची त्यांना तातडी वाटे. भाई वैद्य हे सेवादलाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले, तेव्हा वाघ सर सेवादलात अधिक सक्रिय झाले होते.

सोई-सवलती, जात-समूह आधारित सत्तावाटप या पलीकडे राजकारण न्यायला हवं. तरुणांमध्ये प्रबोधन-प्रशिक्षणाचा प्रभावी कार्यक्रम सतत राबवावा, त्यातून पुरोगामी चळवळींना-विचारांना बळ मिळेल, अशी त्यांची मनोधारणा होती. कार्यकर्त्यांनी, लिहिणाऱ्यांनी खूप शिकावं अशी शिदोरी वाघसरांजवळ होती. ते कुणाही विषयी पाठीमागे वाईट बोलत नसत. जेवढं समोर बोलता येईल तेवढं आणि तेच समोर बोलायचं, अशी त्यांची धारणा असायची. चहाड्या, कुटाळक्या, गटबाजीत त्यांना रस नव्हता. जवळ येणाऱ्यांवर अपार माया करणं, त्याला गुण-दोषांसहित सांभाळून घेणं हा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विशेष होता. त्यांच्या वागण्या-बोलण्यात करुणा होती. कुठून आलं होतं हे? मी बौद्ध आहे, हे ते अभिमानानं सांगत. सर्वांनी बुद्ध अभ्यासावा, असा त्यांचा आग्रह होता.

सारनाथ (उत्तर प्रदेश) ला त्यांच्यासोबत होतो. तिथल्या बुद्धमूर्ती बघत होतो. ते किती तन्मयतेनं बुद्धमूर्ती बघत होते. गौतम बुद्ध आणि बौद्ध धर्माशी ते एकरूप झाले होते. ज्याच्याशी आपण एकरूप होतो, ती आपली जीवनशैली होते. वाघ सर बौद्धमय, बुद्धमय झाले होते. तीच त्यांची जीवनशैली झाली होती, जीवनमार्ग झाला होता. त्यानुसारच ते जगले.

**राजा कांदळकर,** मुंबई
Mob. 9887121300

सुरेश द्वादशीवार

# आणीबाणीच्या काळातील माझा तुरुंगवास

सुरेश द्वादशीवार यांनी चार वर्षांपूर्वी दिवंगत झालेल्या पत्नी जयाला उद्देशून लिहिलेल्या ३० दीर्घ पत्रांचे पुस्तक येत्या आठवड्यात साधना प्रकाशनाकडून येत आहे. या पुस्तकात कौटुंबिक आठवणी तर आहेतच, पण जास्त भाग व्यापला आहे तो राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटना घडामोडींच्या आठवणींनी! त्यातील एक प्रकरण आहे, १९७५ मध्ये देशावर लादल्या गेलेल्या आणीबाणीच्या काळातील तुरुंगवासावर! नाशिक येथील कारागृहात १४ महिन्यांचा तुरुंगवास भोगलेले द्वादशीवार त्या वेळी ३३ वर्षांचे होते. राज्यशास्त्राचे प्राध्यापक आणि पत्रकार संपादक अशी दुहेरी ओळख त्यांची त्या वेळी नागपूर-चंद्रपूर परिसरात होती. नंतरच्या अर्धशतकात लोकसत्ता व लोकमत या दैनिकांचे नागपूर आवृत्त्यांचे संपादक, आठ वैचारिक कादंबऱ्या व दहा वैचारिक पुस्तकांचे लेखक अशी त्यांची ओळख महाराष्ट्राला आहे. मात्र ते त्या पलीकडे बरेच काही होते/आहेत, हे या नव्या पुस्तकातून चांगले कळते आणि त्याची एक झलक म्हणजे हे प्रकरण आहे.

– संपादक

प्रिय जया,

दार्जिलिंगला असतानाच २५ जूनच्या रात्री देशात आणीबाणी लागू करण्यात आल्याची बातमी रेडिओवर ऐकली. अलाहाबाद न्यायालयाच्या त्या निकालानंतर राजीनामा देणे किंवा असे काही करणे, हे दोनच पर्याय इंदिरा गांधींसमोर होते. त्यांनी त्यांच्या सल्लागारांच्या सहाय्याने दुसरा पर्याय निवडला होता. ती बातमी ऐकताच आपल्याला यात अटक होईल, असे मनात आले. दुसऱ्या दिवशी सकाळी मी दार्जिलिंगहूनच डॉ. काशीकरांना फोन लावून माझी शंका बोलून दाखवली. ते म्हणाले, ‘परतण्याची घाई करू नका. मी तुम्हाला तिथूनच जपानला पाठवण्याची व्यवस्था करतो.’ मला ते सारे निरर्थक वाटत होते. बैठकीचा काळ संपताच मी नागपूरला व पुढे चंद्रपूरला परत आलो. तिथे विरोधकांचे अटकसत्र सुरू झाले होते. दर दिवशीच्या त्या अटकेच्या बातम्या कानांवर येत होत्या. माझा कोणत्याही राजकीय पक्षाशी वा संघासारख्या संघटनेशी संबंध नव्हता, तरी माझे सरकारविरोधी लेखन व तरुण भारतचे प्रतिनिधित्व मला तुरुंगात पाठवण्यास पुरेसे आहे, हे लक्षात आले होते. तरीही डिसेंबर उजाडेपर्यंत मला अटक झाली नाही.

याच काळात शैलाचे लग्न गंगाधरशी झाले. त्याची तारीख ९ डिसेंबर ही होती. त्या आधी एक-दोन दिवस राज्याचे तेव्हाचे मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण चंद्रपूरला आले. त्यांच्या येण्याआधी एकच दिवस चंद्रपुरात भरलेल्या कुस्त्यांच्या राज्यस्तरीय सामन्याच्या वेळी कुणा अज्ञात इसमाने आणीबाणी विरोधी पत्रके वाटली होती आणि पोलीस त्याचा माग घेत होते. शंकररावांनी चंद्रपूरचे आमदार एकनाथ साळवे यांच्या घरी सायंकाळचा चहा घेतला. त्या वेळी उजव्या कम्युनिस्ट पक्षाचे एक नेते गणपतराव अमृतकरही तिथे होते. त्यांनी ती पत्रके बहुधा मीच लिहिली आणि त्यातली भाषा माझ्या वृत्तपत्रीय लिखाणाशी जुळणारी

आहे, असे मुख्यमंत्र्यांना सांगितले. त्याच वेळी त्यांनी माझ्या अटकेचा आदेश पोलीस प्रमुखांना दिला. ते प्रमुख माझ्या संबंधातले असल्याने त्यांनी आमच्या घरी ९ तारखेला लग्न होणार असल्याचे शंकररावांना सांगितले. त्यावर त्यांना नंतर अटक करण्याचे आदेश त्यांनी पोलिसांना दिले. परिणामी १३ डिसेंबरला मला अटक होऊन माझी नाशिकच्या मध्यवर्ती कारागृहात रवानगी झाली.

त्याआधी या घडामोडींची माहिती समजताच चंद्रपूरचे काँग्रेस खासदार अब्दुलभाई शफी आपल्या घरी आले. येताना त्यांनी शहराचे नगराध्यक्ष मनोहरराव कोतपल्लीवार यांनाही आणले. मला होणारी अटक अन्यायपूर्ण आहे आणि माझा कोणत्याही राजकीय पक्षाशी वा संघटनेशी संबंध नाही हे ठाऊक असलेले शफी भैया म्हणाले, 'मी आज रात्रीच मुंबईला जाऊन चव्हाण साहेबांची भेट घेतो आणि त्यांना हे सारे सांगतो.' त्यावर मीच त्यांना अशा रदबदलीचा कोणताही उपयोग होणार नसल्याचे सांगितले. त्यांनी माझे काहीएक न ऐकता मला सामान बांधायला व आपल्या गाडीत बसायला सांगितले. मी मुकाटपणे त्यांच्यासमवेत गेलो. खरे तर मी शफीभैयांच्या प्रत्येक निवडणुकीत त्यांच्याविरुद्ध काम केले होते. ते जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असताना विरोधी पक्षांची जुळवाजुळव करून त्यांच्या विरोधात अविश्वासाचा ठराव आणणाऱ्यांतही मी होतो. पण शफीभैयांमध्ये एक अनोखे माणुसपण होते आणि ते त्यांच्या स्वभावधर्माचा भाग होते. आपले राजकारण अडचणीत आणून, ते तेव्हा मला मदत करू पाहत होते.

ते मला घेऊन नागपूरला त्यांच्या सदर भागातील घरी गेले. त्यांच्या पडदानशीन घरात मला दोन दिवस राहायला फर्मावले. रात्रीच्या विमानाने ते व कोतपल्लीवारजी मुंबईला गेले. शंकररावांना भेटले. पण माझ्या अपेक्षेप्रमाणे त्यातून काही निष्पन्न व्हायचे नव्हते व तसे ते झालेही नाही. रात्री उशिरापर्यंत त्यांचा फोन आला नाही, तेव्हा पुढचे सारे लक्षात घेऊन मी त्यांचे घर सोडले व वसूकडे राहायला आलो. तूही मग नागपूरला आलीस. एक रात्र तिथे काढून आपण सकाळच्या बसने चंद्रपूरला आलो. घरी एक दिवस घालवून मी चंद्रपूरचे ठाणेदार वसंत पाटील यांना फोन केला आणि मी कॉलेजात जात असल्याचे त्यांनाच सांगितले. कॉलेजातले सारे प्राध्यापक अन् विद्यार्थी माझ्याकडे आश्चर्याने पाहात होते. मी शांतपणे पहिला वर्ग घेतला अन् दुसरा घेत असतानाच कॉलेजचा कर्मचारी वर्गाच्या दाराशी आला अन् मला खूण करून बोलवू लागला.

माझे बोलणे थांबवून दाराशी जात मी विचारले, ''काय आहे?''

त्यावर ''साहेब, तुम्हाला घ्यायला पोलिसांची गाडी आली आहे.'' तो म्हणाला.

''माझा तास संपताच मी येतो, असे त्यांना सांग.''

एवढंच म्हणून मी पुन: माझ्या तासास सुरुवात केली व तो पूर्ण झाल्यानंतरच बाहेर येऊन पोलिसांना भेटलो. वसंतराव पाटील हे ठाणेदार माझे स्नेही होते. माझ्या अटकेचा वॉरंट हाती देत ते म्हणाले, 'तुम्ही तुमच्या स्कूटरने घरी जा. तासाभरात आम्ही तुम्हाला घ्यायला येतो.' मी घरी आलो, तेव्हा तू अन् घरचे सगळे माझी वाटच पाहत होतात. तुझे डोळे कोरडे होते अन् तू एखाद्या शांत पुतळ्यासारखी वागत होतीस. काकूच्या डोळ्यांत पाणी होतं अन् वडिलांच्या डोळ्यांत संताप. तशातच दोन घास खाऊन अन् तू दिलेले कपडे अन् अंथरुणाचा होल्डॉल घेऊन पोलिसांची वाट पाहत तुझ्याशी बोलत राहिलो... पोलिसांच्या गाडीत बसताना मी हळवा झालो, तू मात्र शांतच होतीस. तशीच एकटक पाहत होतीस.

गाडी घरापासून दूर जाताच सोबतचे पाटील म्हणाले, 'भाऊ, आपण अगोदर माझ्या घरी जाऊ. तुमच्या वहिनीने तुमच्यासाठी पुरणपोळी बनवली आहे. ती खाऊनच मग पुढे जायचे.' मी मनातून हललो होतो. पण तो भाव चर्येवर येऊ न देता मी त्यांना हसून म्हणालो, 'चला मग.'

पाटीलदादांकडून आम्ही सरळ पोलीस स्टेशनला आलो व पुढच्या प्रवासास लागलो. वाटेत वरोऱ्याला बस स्टँडजवळ गाडी थांबवायला सांगून मी स्टँडवर आलो. तेथून आनंदवनात बाबांना फोन केला. ते म्हणाले, 'कृष्णाच्या जन्मस्थानी जात आहेस, सुखरूप परत ये.' मग मीही त्यांना घराकडे लक्ष द्यायला सांगून त्यांचा ताईंचा निरोप घेतला.

सायंकाळपर्यंत आम्हाला नेणारी पोलिसांची निळी व्हॅन अकोल्याला पोहोचली. पाटील यांच्या सूचनेवरून तीत मला ड्रायव्हरच्या शेजारची सीट दिली गेली. बाकीचे चार बंदी मागे, डब्यासारख्या मोठ्या जागेत होते. अकोल्याच्या पोलीस मैदानालगतच्या जागेत आमची व्यवस्था होती. तिथल्या अधिकाऱ्यांनी कॉट्स, गाद्या व ब्लँकेटची व्यवस्था केली होती. रात्रीचे त्यांनी आणलेले जेवण घेऊन आम्ही झोपलो. सकाळी मी माझ्या त्या शहरात राहणाऱ्या आतेबहिणीच्या घरी गेलो. आत्याही तिथेच होती. त्यांच्या

भेटी घेऊन चौकीवर आलो आणि आमचा पुढचा प्रवास सुरू झाला. अंधार पडण्याआधीच आम्ही नाशिकला पोहोचलो. पण सोबतच्या पोलिसांनी आम्हाला सरळ तुरुंगात न नेता पंचवटीवर आणले. तेथील खडकाळ जागेतून वाहणाऱ्या गोदावरीत स्नान करूनच आम्ही कारागृहात आलो.

जेलच्या दारातून आत शिरताच शिपायांनी ते लगेच बंद केले. मागे अंधार झाला. पुढचे मात्र पाहायचे काही नव्हते. त्यानंतरचा १४ महिन्यांचा– २६ जानेवारी १९७७ पर्यंतचा काळ तिथे घालवायचा होता. तो सुरू होताना, कधी संपेल याची कल्पना नव्हती. जेलमधले इतर कैदी म्हणायचे, 'आमची शिक्षा संपताच आम्ही बाहेर जाऊ, पण तुम्ही?'

मी म्हणायचो, 'तुम्हाला अपराधासाठी शिक्षा झाली. आम्ही अपराध न करता, येथे आलो. आमच्या कारावासाला आरंभ नाही अन् शेवटही सांगता यायचा नाही.' त्यावर तेच हळहळायचे.

आपली भेटही आता थांबली. जेव्हा कधी तू जेलमध्ये यायचीस तेव्हा अन् एरव्ही पत्रातून. हा काळ कधी संपेल याची तुलाही कल्पना नव्हती, मलाही अन् देशालाही...

नाशिकचे मध्यवर्ती कारागृह एका विस्तीर्ण जागेवर गोलाकार उभे आहे. त्याभोवती परकोटवजा काळ्या दगडाची उंच भिंत बांधली आहे. या भिंतीवर दर काही फुटांच्या अंतरावर एक चौकी अन् तिच्यात हाती बंदूक घेतलेला एक शिपाई आहे. कारागृहाच्या मध्यभागी एक उत्तर-दक्षिण लांबलचक रुंद रस्ता अन् त्याच्या दोन्ही बाजूला कैद्यांना ठेवायला इमारती आहेत. रस्त्याच्या उजव्या हाताला लांब-रुंद बराकी अन् डाव्या बाजूला दोन कैदी राहतील अशा भक्कम खोल्या आहेत. जेलच्या प्रवेशद्वारातून आत आले, की लगेच उजव्या हाताला क्वारंटाईनची इमारत आहे, तीत दोन-दोन जण राहतील अशा खोल्या आहेत. सामान्यपणे बडे नेते वा राजकीय कार्यकर्ते तिथे ठेवले जातात. पूर्वी या तुरुंगात फाशीची सोय होती, तेव्हा या इमारतीत फाशीचे कैदीही बंद असत. याच इमारतीत कधी काळी साने गुरुजी राहिले होते. त्यांची काही पुस्तके त्यांनी तिथेच लिहिली होती. त्या इमारतीच्या विरुद्ध बाजूला दवाखाना आणि एकांतवासाची शिक्षा झालेल्या बंद कैद्यांची जागा आहे. नंतर कैद्यांच्या राहण्याच्या खोल्या. रस्त्याच्या मध्यभागी एक गोलाकार इमारत असून तीत एक छोटेखानी ग्रंथालय व तुरुंगाचे कामकाज चालविणारे ऑफिस आहे.

मी रात्री आलो व मला बराकीत जागा दिली गेली. मी मुद्दाम दाराच्या जवळची जागा मागून घेतली आणि सोबत आणलेला होल्डाल पसरून त्यावर लागलीच झोपी गेलो. बराकीचे दरवाजे रात्री दहा वाजता बंद केले जात, ते पहाटे साडेपाचच्या सुमारास उघडण्यात येत. प्रत्येक बराकीमागे टिनाच्या मजबूत संडासांची व्यवस्था आहे आणि पुढच्या जागेतील खुल्या हौदात सतत पाण्याचे नळ पाणी फेकत आहेत. तिथेच साऱ्यांची स्नाने व त्याच नळांचे पिण्यासाठी पाणी. पहाटे उठलो अन् बाहेर आलो. नाशिकची हवा तशीही थंड आणि मऊशार. काही क्षणांतच दोन दिवसांच्या प्रवासांचा क्षीण दूर झाला. मी अवतीभवतीची अन् ओळखीच्यांची चौकशी करू लागलो.

सोबतच्या बंद्याने सांगितले, अनंतराव भालेराव क्वारंटाईनमध्ये आहेत. मी लागलीच तिथे गेलो तर तिथे मोठ्या माणसांचा खजिनाच हाती आला. त्यात मोहन धारिया होते, बापू काळदाते, प्रा.दाते, गंगाप्रसादजी अग्रवाल, किशोरभाई हे सारे. त्यांचा रोज सकाळी वाचनाचा वर्ग चालायचा. गंगाप्रसादजी जाडे विद्वत ग्रंथ वाचायचे अन् बाकीचे ऐकून मग त्यावर चर्चा करायचे. अनंतरावांनी माझी ओळख करून दिली. मी त्या वर्गात सामील झालो.

तुरुंगात संघपरिवार व जनसंघाची माणसे सर्वात अधिक होती. त्या खालोखाल समाजवादी, काही संघटना काँग्रेसचे, काही चळवळीचे नेते, तर फार थोडे पत्रकार होते. तुरुंगात संघाची नियमीत शाखा भरायची. तीत त्यांच्या कवायती अन् बौद्धिके चालायची. औरंगाबादचे प्रल्हादजी अभ्यंकर हे त्यातले कमालीचे चांगले वक्ते व संघटनेत बऱ्याच वरच्या पदावर असणारे गृहस्थ होते. त्यांची भाषणे मी आवर्जून ऐकायला जायचो. समाजवाद्यांकडे वक्ते फार होते. त्यात बापू काळदाते, अनंतराव भालेराव यांच्याशिवाय इतरही माणसे होती. बाकीचे लोक कधी इकडे तर कधी तिकडे जायचे, तर काही जण तुरुंगातल्या रस्त्यावर फिरून संध्याकाळ काढायचे. आरंभी तुरुंगातले कैदी साऱ्यांचे जेवण शिजवायचे. पण पुढे ते काम संघाच्या शिबिरात तयार झालेल्या अन् स्वयंपाकात तरबेज असलेल्या कार्यकर्त्यांनी आपल्याकडे घेतले. जेलच्या नियमानुसार राजबंद्यांना सकाळी चहा, नास्ता, दुपारी जेवण, मधल्या काळात एखादे फळ व रात्री पुन्हा जेवण दिले जायचे. पुढे त्यात दर दिवशी दिल्या जाणाऱ्या तुपाची भर पडली.

कधी बाहेरची माणसे फळांच्या गाड्या पाठवायची, तर सणासुदीला एखादे पक्वान्न. राजबंदी म्हणून कशाची कामे

नव्हती. परिणामी माणसांच्या तब्येती सुधारू लागल्या आणि अनेकांचे शारीरिक वजनही वाढताना दिसले. पण तुरुंग ही माणसांना बरेच काही शिकण्याची आणि सोबतची माणसे वाचायला शिकवणारी जागा आहे. तुरुंगातील बंद्यांसमोर राणा भीमदेवी थाटात भाषणे देणारे काही जण आपली सुटका कधी होणार, म्हणून रात्र-रात्र रडायचे. एक गृहस्थ घरात वाघ पाळणारे म्हणून प्रसिद्ध होते. पण त्यांना असे कासावीस होताना लोक बघायचे. उलट तरुण माणसे उत्साहात होती. कार्यकर्ते अधिकाधिक संघटीत व आपल्या विचारांना धार परजताना दिसले. एरवी नम्र वाटणारी माणसे गुरकावून बोलत, तर काही माणसांवर थेट सर्वोदयी संस्कार झालेले दिसत.

वणीचे (जिल्हा यवतमाळ) ॲड. तात्या देशपांडे हे त्यांच्या चिरंजीवासह आमच्यासोबत होते. ते दुपारचा चहा करीत. आम्ही त्यांच्याभोवती जमून तो चहा घेत असू. एक दिवस ऐन चहाच्या वेळी एक सज्जन चेहऱ्याचे पोक्त गृहस्थ अंगात साधी बंडी घालून अन् कमरेभोवती पंचा गुंडाळून तिथे आले. मी तात्यांना विचारले, ‘‘तात्या, हे सर्वोदयी आहेत का हो?’’ त्यावर जराही मागे-पुढे न पाहता ते म्हणाले, ‘‘का? ते बह्यताड दिसतात म्हणून काय?’’

मीच गडबडलो. मग तात्यांनी त्या सद्गृहस्थांची ओळख करून दिली. ते ॲडव्होकेट होते अन् तात्यांच्या जवळच्या नात्यातले होते. अशीच माणसे भेटत गेली. त्यांचा परिवार वाढतानाच ती माझ्याशी जुळत गेली.

रात्रीचे बहुधा आम्ही बाहेर अंथरुणे टाकून आकाशाखाली झोपत असू. तेव्हा मनात यायचे, कधी तरी याच वेळी तूही, मी पाहतो ते तारे अन् त्यांनी भरलेले आकाश पाहात असशील. परळी वैजनाथचे लोखंडे हे त्या काळी फार निकटचे मित्र झाले. काही दिवसांनी चंद्रपूरचा विजय सगदेव आला आणि माझ्या बराकीत शेजारी राहिला. त्या बराकीत पंचांगकर्ते धुंडिराज शास्त्री दाते होते. सोबत सोलापूरची व पुण्याची काही माणसे होती. दातेशास्त्री तुरुंगातच नव्या वर्षाचे पंचांग तयार करत होते. बाकीचे त्यांना भविष्य विचारत होते. त्या साऱ्यांचा मुख्य प्रश्न ‘आमची सुटका कधी?’ हाच असे. काही दिवसांनी कुमार सप्तर्षी आले. त्याच सुमारास प्रमोद महाजन यांनाही तिथे आणले गेले. ते भूमिगत असल्याचे तोवर सांगितले जात होते. मात्र नंतर प्रवीण महाजन या त्यांच्या भावाने लिहिलेल्या ‘माझा अल्बम’ या आत्मचरित्रात ते अंबाजोगाईच्या घरातच दडून होते, अशी माहिती प्रकाशित झाली. मात्र त्या दोघांच्या येण्याने तुरुंगातील वक्त्यांच्या संख्येत वाढ झाली. गोपिनाथ मुंडे अगोदरच तिथे आले होते. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाहीचा नामदेव सालोडकर व्यवसायाने न्हावी होता. एक दिवस तो माझ्याकडे आला आणि म्हणाला, ‘‘भाऊ, एक इच्छा आहे. ती तुम्ही पूर्ण कराल?’’

‘‘सांग.’’ मी म्हणालो.

‘‘तुरुंगात असताना, एक दिवस मोहन धारियाजींची दाढी करून द्यायची इच्छा आहे.’’ तो म्हणाला.

धारियाजींनी त्याला तात्काळ होकार दिला आणि माझ्या व क्वारंटाईनमधील सगळ्या बड्यांच्या उपस्थितीत नामदेवने धारियांची दाढी करून दिली. दोघेही मनातून प्रसन्न झाले होते.

एक दिवस धारियांनी साऱ्यांना बोलावून आपण वेगवेगळ्या विचारसरणीबाबतचे अभ्यासवर्ग घेऊ, अशी सूचना केली. ती साऱ्यांना आवडली. वक्त्यांनी अभ्यास करून बोलायचे आणि ऐकणाऱ्यांनी त्याच्या नोंदी करून घ्यायच्या, असे सांगितले गेले. मग बापू काळदाते समाजवादावर, प्रमोद महाजन हिंदुत्ववादावर, स्वत: धारिया काँग्रेसच्या सेक्युलॅरिझमवर, मी मार्क्सवादावर अशा आठ-दहा दिवसांची व्याख्यानमालाच तिथे रंगली. त्यातून प्रमोदची आणि माझी मैत्री झाली. तो राज्यशास्त्रात एम. ए. करीत होता. मी त्याच विषयाचा प्राध्यापक होतो. मग तो त्याच्या नोट्स मला आणून त्या तपासायला द्यायचा. तेव्हापासून तो मला ‘सर’ म्हणायला लागला आणि अखेरपर्यंत त्याने मला ‘आहो-जाहो’ म्हणू दिले नाही. प्रमोद उत्कृष्ठ वक्ता होता. त्याच वेळी त्याची महत्त्वाकांक्षाही प्रखर होती. एक दिवस तो आमच्या बराकीत आला अन् धुंडिराज शास्त्रींना म्हणाला, ‘‘माझा भविष्यावर विश्वास नाही, पण तुम्ही त्याचे अधिकारी आहात म्हणून विचारतो, मी या देशाचा पंतप्रधान कधी होईन ते सांगा.’’

शास्त्रीबुवा म्हणाले, ‘‘ते नाही सांगता येणार. पण तुमच्या आयुष्यात राजकारणाचे उंचीचे योग मात्र आहेत.’’

तो म्हणाला, ‘‘ते मलाही ठाऊक आहे. ते योग नकोत. मला माझ्या पंतप्रधानकीचं सांगा.’’

पुढे वाजपेयींच्या पहिल्या मंत्रिमंडळात तो संरक्षणमंत्री झाला. त्याची महत्त्वाकांक्षा वास्तवानेच अधोरेखित केली. दुर्दैवाने त्याचे नंतरचे दिवस निसरडे बनले. प्रमोदचे संरक्षण मंत्रीपद तेरा दिवस चालले. तेवढ्या अवधीत त्याने देशातील उद्योगपतींशी व बड्या भांडवलदारांशी आपले

संबंध जोडले. संघाचा आणि परिवाराचा एकूणच कनिष्ठ व मध्यमवर्गीय स्थितीचा त्याला तिटकारा होता. जनसंघाचे प्रदेश पातळीवरचे नेते एस.टी.ने वा रेल्वेने प्रवास करीत असतानाही, केवळ विद्यार्थी परिषदेच्या अध्यक्षपदी असलेला प्रमोद विमान वा टॅक्सीने प्रवास करायचा. या श्रीमंती सवयी त्याने त्या परिवारालाही लावल्या आणि तो परिवार साध्या पत्रव्यवहारावरून संगणकीय दळणवळणाच्या मार्गावर आला. संघाची अधिवेशनेही मग थाटात व साऱ्या दिमाखदार भपक्यानिशी होऊ लागली.

प्रमोद संरक्षण मंत्री असतानाच त्याने एम्स या खासगी कंपनीला भद्रावतीजवळ (चंद्रपूर जिल्हा) एक मोठी 'ओपन कास्ट' कोळसा खाण सुरू करण्याचा परवाना दिला. तो परवाना देण्याच्या काही महिने अगोदरच ए. पी. जे. अब्दुल कलाम समितीचा अहवाल केंद्र सरकारसमोर आला होता. त्या अहवालाने कोणत्याही संरक्षण प्रकल्पाजवळ खाणी उघडायला मनाई करण्याची शिफारस केली होती. त्यावरही प्रमोदने हा परवाना दिला, म्हणून भाजपाचेच एक नागपूरचे खासदार बनवारीलाल पुरोहित यांनी पक्षाकडे त्याची तक्रार केली. सरकारकडेही चौकशीची मागणी केली. त्यावर संतापून प्रमोदने या पुरोहितांना एका बैठकीत सरळसरळ धमकी देऊन त्यांना पक्षाबाहेर काढण्याची भाषा उच्चारली होती. त्या वेळी मी लोकसत्ताच्या नागपूर आवृत्तीचा संपादक झालो होतो. पुरोहितांनी मला भेटून त्यांची कथा सांगितली व त्यांचे गाऱ्हाणे जनतेपर्यंत पोहोचवण्याची विनंती केली. तेव्हा 'ते तेरा दिवस' या नावाचा अग्रलेख लिहून मी प्रमोदचा हा अगोचरपणा जनतेसमोर आणला.

त्यानंतर लगेच त्याचे मंत्रीपद व वाजपेयींचे सरकार गेले होते. पण प्रमोद माझा 'प्रमाद' विसरला नव्हता. एक दिवस तो नानाजी देशमुखांना घेऊन सरळ लोकसत्ताचे प्रमुख विवेक गोयंका यांना भेटला. त्या वेळी त्याने मला कामावरून कमी करावे, अशी मागणीच केली. विवेकजी मला ओळखत होते. त्यांनी प्रमोदची कशीबशी समजूत काढली. मात्र त्यामुळे ती खाण व्हायची राहिली नाही. पुढे तो वाजपेयींचा राजकीय सल्लागार झाला, तेव्हा कोणत्या तरी कारणाखातर मी दिल्लीला गेलो होतो. त्याने मला निमंत्रण व त्यासोबत गाडीही पाठवली. त्या वेळी तो पूर्वीसारखाच जवळकीने बोलला. त्याच्या तोंडचे 'सर' ऐकून मला कसेसेच झाले. तसे मी त्याला म्हणालो. तेव्हा 'आपली जुनी नातीच कायम राहिली पाहिजेत', असे तो म्हणाला होता. पण त्याची जुनी व घरची नाती मात्र तुटायला तेव्हाच सुरुवात झाली होती. त्या घटनाक्रमाचा शेवट प्रवीण या त्याच्याच धाकट्या भावाच्या हातून झालेल्या त्याच्या खुनात झाला.

तुरुंगात आमच्यासोबत गोपीनाथही होता. त्याचे प्रमोदच्या बहिणीशी लग्न व्हायचे होते. तो धाडसी आणि पुरेशा महत्त्वाकांक्षा बाळगून होता. नंतरच्या काळात तो आमदार झाला व पुढे पक्षाचा प्रदेशाध्यक्ष होऊन राज्याचा उपमुख्यमंत्री झाला. तुरुंगातून बाहेर पडल्यानंतर त्याने लगेचच माझी दोन व्याख्याने त्याच्या परळी या गावात आयोजित केली होती. त्या वेळी त्याने मला एका धनवान व्यापाऱ्याकडे उतरविले होते. मी त्याच्याचकडे राहू असे म्हणालो, तेव्हा 'माझे घर तुम्ही राहावे असे नाही' असे तो खेदाने म्हणाला. परळीत माझे इतरही जेलमधील मित्र होते. गोपीनाथला राज्याचे मुख्यमंत्रीपद मिळवायची जिद्द होती आणि त्याला प्रमोदची मदत होती. त्याचसाठी प्रमोदने अविनाश धर्माधिकारींना पुण्याचे लोकसभेचे तिकीट मिळू दिले नव्हते. त्याविषयी मी प्रमोदच्या एका भेटीत विचारले, तेव्हा तो सरळपणेच म्हणाला होता, 'त्याला राजकारणात आणले, तर तो आपल्या गोपीनाथचा प्रतिस्पर्धी नाही का होणार?' दरम्यान गोपीनाथ महाराष्ट्राचा उपमुख्यमंत्री झाला व पुढे केंद्रीय मंत्री झाला. या काळात त्याने अनेक साखर कारखाने आपल्या क्षेत्रात उघडले. मात्र दिल्लीला असतानाच कोणा अज्ञात कारणास्तव त्याचा मृत्यू झाला. तो मोटार अपघातात गेल्याचे सांगितले गेले. पण त्यावर अनेकांचा विश्वास बसला नाही.

गोपीनाथसंबंधीची एक आणखीही घटना येथे नोंदवण्याजोगी आहे. तू तुझ्या कुटुंबीयांसोबत माऊंट अबूला गेली होतीस. तिथे फिरतानाच एका बंगल्यावर तुला गोपीनाथ मुंडे या नावाची पाटी दिसली. तू तिथूनच मग मला फोन केलास. मी तुला फोन थांबवायला सांगून गोपीनाथला फोन लावून ती हकीकत सांगितली. तेव्हा तो म्हणाला, 'वहिनींना तिथे थांबायला सांगा. मी बंगल्यावर फोन करून तेथील माणसांना निरोप देतो. ते मग वहिनींची व त्यांच्यासोबतच्या साऱ्यांची व्यवस्थाही करतील.' तुला तुझ्या नियोजित प्रवासानुसार तिथे थांबता आले नव्हते, ही गोष्ट वेगळी... प्रमोदला प्रवीण महाजनने गोळ्या घातल्यानंतर त्याला बारा दिवस व्हेंटिलेटरवर ठेवले होते. त्या दिवसांत मी प्रमोदच्या अल्पावधीतील भरारीवर आणि त्याच्या असण्याच्या महत्त्वावर दोन लेख लिहिले.

गोपीनाथचा त्यावर फोन होता. त्या लेखांचे प्रमोदच्या कुटुंबात सामूहिक वाचन झाल्याचा व ते लेख सर्वांना आवडल्याचा. (प्रमोदवर मी माझ्या 'तारांगण'मध्येही एक सविस्तर लेख लिहिला आहे.)

गंगाप्रसादजींचा संबंध तुरुंगाबाहेरही कायम राहिला. सेवाग्राम, परंधाम आश्रमात तर कधी नागपूरच्या विनोबा अध्ययन केंद्रात. कुठे ते अध्यक्ष अन् मी वक्ता, तर कुठे मी अध्यक्ष अन् ते वक्ते. त्यांनी माझी भाषणे परभणी आणि वसमतला आयोजित केली. त्यातले वसमतचे व्याख्यान बापू काळदात्यांवरचे होते. गंगाप्रसादजी मुळात कार्यकर्ते होते. त्यांचे संतत्वाजवळ जाणारे माणूसपण त्यांच्या कार्यनिष्ठेतून आले होते. एक सच्चा गांधीवादी विचारवंत व तेवढाच गांधीजींच्या मार्गाने जाऊन काम करणारा कार्यकर्ता, अशी त्यांची मनोभूमिका होती. झालेच तर उंच्यापुऱ्या व धडधाकट देहाचे गंगाप्रसादजी मूळात प्रेमळ आणि मितभाषीही होते.

तुरुंगानंतर बापूंचा संबंध फारसा आला नाही. लातूरची विधानसभा केवळ वक्तृत्वाच्या जोरावर जिंकणारे बापू काळदाते १९७७ मध्ये औरंगाबादमधून लोकसभेवर निवडून गेले. पुढे दोनदा देवेगौडांच्या जनता दल (सेक्युलर) कडून राज्यसभेवर जाऊन ते त्या पक्षाचे सक्रीय सचिव झाले. पण त्यांचा महाराष्ट्राशी मात्र यावा तसा संबंध नंतरच्या काळात आला नाही. नामांतराच्या चळवळीत ते एसेमसोबत दलितांच्या बाजूने लढले. त्यासाठी त्यांनी सगळ्या जुन्या स्नेह्यांशी– त्यात अनंतरावांपासून कुरुंदकरांपर्यंत सारे होते– अबोला धरला. पुढल्या काळात माझ्या औरंगाबादेत झालेल्या एका व्याख्यानाला ते श्रोत्यांच्या पहिल्या रांगेत उपस्थित होते. तिथे मी त्यांना वाकून नमस्कार केला, तेव्हा त्यांनी माझ्या पाठीवर थाप मारून तुरुंगातल्या आठवणी काढल्या. अनंतराव मात्र त्यांच्याविषयी अखेरपर्यंत दु:खाचे कढ काढत राहिले. 'ज्याच्याशी आयुष्यभराची मैत्री केली, एकच एक कॉमन वॉल असलेले घर बांधले; तो बापू माझ्याशी बोलतदेखील नाही', असे म्हणताना त्यांचा कंठ दाटून आलेला मी पाहिला आहे. पुढच्या काळात बापूंची भेट झाली नाही. मी नंतर गेलो ते वसमतच्या सभेत त्यांना श्रद्धांजली वाहायलाच.

धारियांची सुटका ३० डिसेंबर १९७६ या दिवशी पहाटे झाली. देशभरातील सारे विरोधी पक्षनेते एकत्र यायचे होते व ते सरकारशी पुढली बोलणी करणार होते. त्यासाठी त्यांना संबंधित स्थळी नेण्यात आले. १९७७ च्या निवडणुकीनंतर ते देशाचे नियोजन मंत्री झाले. मंत्रिपदावर असतानाही त्यांनी माझ्याशी संपर्क राखला होता आणि नंतर स्थापन झालेल्या जनता पक्षाच्या प्रदेश कार्यकारिणीवर त्यांनीच मला घेतले होते. एकदा धारियांना मी फोनवरून एक विनंती केली होती. चंद्रपूर व गोंदिया जिल्ह्यातील धानाच्या गिरण्या चालविणाऱ्यांचे एक मंडळ एक दिवस घरी आले होते. सरकारने त्यांना त्यांच्या गिरणीतील दगडाचे रूळ काढून त्याऐवजी रबरी रूळ लावण्याचा आदेश काढला होता. त्या आदेशाला एक वर्षाची स्थगिती द्या, हे सांगायला ते आले होते. मी त्यांच्या समक्षच धारियांना तसा फोन लावला आणि त्यांनीही ती स्थगिती देण्याचे आश्वासन तत्काळ दिले. पुढे काही दिवसांनी त्यातले एक गिरणीमालक मला भेटले आणि म्हणाले, 'एका गिरणीचे रूळ बदलण्याचा खर्च किमान बारा हजारांपर्यंत जातो. तुम्ही आमचे काही लाख रुपये वाचविले. तुम्ही आम्हाला अडवून धरले असते, तर प्रत्येक गिरणीकडून किमान दोन हजार रुपये घेऊन आम्ही तुम्हाला वा तुमच्या पक्षाला काही लाख रुपये दिले असते. पण तुम्हाला आणि तुमच्या मंत्र्यांनाही राजकारणातले अर्थकारण समजत नसावे.' माझ्या अनभिज्ञतेवर व धारियांच्या साधेपणावर मनसोक्त हसून घेऊन ते गृहस्थ गेले. पुढे ही गोष्ट मी धारियांना सांगितली, तेव्हा तेही आमच्या या राजकीय भोळेपणावर मनापासून हसले. धारियांनी तुरुंगात असताना लिहिलेले 'सफर' हे आत्मचरित्र मी वाचले होते. त्यांच्याशी संबंधही अखेरपर्यंत चांगला राहिला. नागपुरात साजऱ्या झालेल्या त्यांच्या ७५ व्या वाढदिवसाच्या सोहळ्यात मी भाषणही केले.

मध्यंतरी एका छोट्याशा घटनेने आमच्यात काही काळ दुरावा आला. ज्या राष्ट्रभाषा प्रचार समितीचे ते अध्यक्ष होते, तिच्या विदर्भ शाखेचे अध्यक्षपद राम शेवाळकरांकडे होते. समितीजवळ फार मोठी जागा नागपूरच्या प्रमुख रस्त्यावर होती. त्या जागेचा कार्यालयासाठी उपयोग व्हावा, अशी मागणी करून शेवाळकर थकले होते. त्यांनी निराशेने पाठविलेले अखेरचे पत्र हा जणू काही त्यांचा राजीनामा आहे, असे समजून व तसे त्यांच्या कार्यकारिणीला सांगून धारियांनी तो 'मंजूर' केला. त्यांच्या जागी नेमलेल्या नव्या लोकांनी त्या जागेवर व्यावसायिक बांधकाम केले. जागा सार्वजनिक कामासाठी दिली गेली असल्याने, तिचा व्यावसायिक वापर नियमात बसणारा नव्हता. त्यावर खटला

दाखल होऊन मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने त्या समितीवर १५६ कोटी रुपयांचा दंड बसवला. ते प्रकरण अजून न्यायप्रविष्ट आहे. यातल्या राजीनामा प्रकरणावर मी लोकसत्तातून लिहिले, तेव्हा धारिया नाराज झाले. ही नाराजी पुढे बरेच दिवसांनी नाहीशीही झाली. त्यांच्या चर्येवर सदैव असणारे प्रसन्न हास्य मला नंतरही पाहता आले.

तुरुंगाबाहेर दीर्घकाळ माझा ज्यांच्याशी संबंध राहिला ते होते अनंतराव भालेराव. त्यांची लेखणी तेज, अभ्यास सखोल, भाषा धारदार अन् शैली वक्तृत्वाची होती. त्यांचे 'मराठवाडा' हे दैनिक केवळ तेवढ्याच बळावर मराठवाड्यात चालायचे. ते मुंबईत असते तर तिथल्या ज्या संपादकांची नावे पुढल्या काळात घेतली गेली ती कधी पुढेही आली नसती. त्यांच्या व्यक्तिमत्वाची पहिली चमक मी अनुभवली ती अहमदनगरच्या राज्य पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली तेव्हा. त्यांच्या भाषणात तेव्हाच्या कन्नमवार सरकारवर टीका होती आणि कन्नमवार त्या अधिवेशनाच्या उद्घाटनाला यायचे होते. ऐन वेळी त्यांचा निरोप आला, 'अनंतराव तो परिच्छेद वाचणार असतील, तर मी येणार नाही.' मग तणाव अन् वाटाघाटी झाल्या. अनंतराव कन्नमवारजींना फोनवर म्हणाले, 'आपण दोघेही स्वातंत्र्यसैनिक आहोत. आपण एकमेकांच्या मतस्वातंत्र्याचा मान राखला पाहिजे!' त्यावर कन्नमवारजी हसले आणि उद्घाटनाला आले. मात्र ते येईपर्यंत सारा सभामंडप तणावाखाली होता.

नाशिकच्या तुरुंगात असतानाच त्यांनी त्यांच्या दोन आठवणी आम्हाला सांगितल्या. त्यातली एक याच तुरुंगात त्यांनी अनुभवली होती. महाराष्ट्राचे माजी खाद्यमंत्री होमी तल्यारखान यांच्या व्यवहारातील भ्रष्टाचाराचे एक प्रकरण त्यांनी 'मराठवाडा'मध्ये छापले. त्यातून दाखल झालेल्या बदनामीच्या खटल्यात त्यांना तीन महिन्यांच्या कारावासाची शिक्षा झाली होती. ती शिक्षा नाशिकच्या कारागृहात भोगताना त्यांनी बायबल आणि ख्रिस्ती धर्माचा अभ्यास चालविला. त्या वेळी त्यांना भेटायला त्या वेळचे एक वयोवृद्ध व निवृत्त अधिकारी आले. त्यांनी येरवड्याच्या तुरुंगात गांधीजींना पाहिले होते. अनंतरावांसमोरची ख्रिस्ती धर्माची पुस्तके पाहून ते त्यांना म्हणाले, 'ही पुस्तके वाचण्यापेक्षा तुम्ही तुमचा गांधीच वाचा. तो वाचून तुम्हाला येशू समजेल' हे सांगताना त्यांचा कंठ दाटून आला होता.

नेहरू, पटेल आणि मौलाना या तीन राष्ट्रीय नेत्यांचा त्यांनी प्रत्यक्ष घेतलेला अनुभव असाच प्रेरणादायी व ज्ञानवर्धक होता. हैदराबादचा लढा यशस्वी झाल्यानंतर हे तीनही नेते त्या प्रदेशाला भेट द्यायला विमानाने औरंगाबादला आले होते. तेथून निघालेला त्यांचा दौरा काही शहरांना व ग्रामीण भागांना भेट देणार होता. अनंतराव व अन्य कार्यकर्ते त्यांच्यासोबत निघाले. एका शहरात या नेत्यांचा मुक्काम ज्या सरकारी अतिथीगृहात होता, तिथे मुस्लिम स्त्रियांचा एक मोठा समूह त्यांच्या भेटीला आला. आपल्यावर भारतीय सैनिकांनी केलेले अत्याचार, त्यांनी मारलेली आपल्या घरची माणसे व केलेली लूटमार यांच्या अतिशय हृदयद्रावक कथा त्या स्त्रिया रडून सांगत होत्या. ते ऐकून गहिवरलेले मौलाना त्या समूहात शिरले आणि त्यातल्या एकेकीला समजावून त्यांची दु:खे ऐकू लागले. ते सारे पाहत असलेल्या नेहरूंना मग ते संतापून म्हणाले, 'कशाचे सरकार आणि कशाचे आपले सैनिक, त्यांच्यात व आपल्यात काही फरक आहे की नाही? अशा सैनिकांचे राज्य चालवण्यापेक्षा आपणच सरकारातून बाहेर पडले पाहिजे.' त्यावर त्यांच्याजवळ येत नेहरू म्हणाले, 'मौलानासाहेब, आपला दौरा आता सुरू झाला आहे. या एकाच अनुभवावरून आपण आपले मत बनवू नका.' सरदारही त्या वेळी बाहेर आले आणि क्षणभर त्या प्रकाराकडे पाहून, युद्धात हे चालणारच अशी मुद्रा करून पुन: आत गेले.

पुढे हे नेते बिदरला पोहोचले. तिथे हिंदू स्त्रियांचा असाच जमाव रडत-भेकत त्यांना भेटायला आला. रझाकारांनी त्यांच्या कुटुंबावर खून, बलात्कारांसह केलेले अत्याचार, डोळ्यांत पाणी आणून सांगू लागल्या. येथेही मौलाना त्या समूहात गेले आणि त्यांचे दु:ख पाहून सद्‌गदित झाले. नेहरूंना ते म्हणाले, 'कशाचा धर्म आणि कशाचा देश? असे अत्याचार शिकवतो तो धर्म कशाचा आणि त्यातली माणसे तरी माणसे कशी म्हणायची?' नेहरू त्यांना शांत करीत म्हणाले, 'यासाठी मौलानासाहेब आपण दौरा पूर्ण झाल्याखेरीज कोणतेही मत बनवू नका, असे मी तुम्हाला सांगत होतो.' सरदार मात्र याही ठिकाणी काही क्षणांसाठी बाहेर आले व त्या जमावावर एक कटाक्ष टाकून आत गेले.

तीन नेत्यांच्या तीन तऱ्हा त्यांच्यातील वेगळेपण आणि ऐक्य साऱ्यांना समजावून गेल्या. त्याच वेळी या देशाची भविष्यातील मध्यममार्गी वाटचालही त्यांनी साऱ्यांच्या ध्यानात आणून दिली.

तुरुंगातली एक आठवण माझ्या कायमची स्मरणात

आहे. एक दिवस कुणी तरी एका विशेष वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले. 'सद्यस्थितीत फक्त माझाच पक्ष या देशाला व येथील लोकशाहीला सुरक्षित राखू शकतो' या विषयावर सगळ्या स्पर्धकांनी बोलायचे होते. जनसंघाच्या बाजूने प्रमोद होता. समाजवाद्यांच्या बाजूने बापू होते, संघटना काँग्रेसकडून कुडाळचे एक संपादक तर इतर पक्षांची बाजू मांडणारेही निश्चित झाले. पण आणीबाणी लावून त्या साऱ्यांना तुरुंगात डांबणाऱ्या काँग्रेसची बाजू कोण मांडणार? बऱ्याच वक्त्यांनी व कार्यकर्त्यांनी ती कोणालाही न आवडणारी बाजू मांडायला नकार दिला. अखेरची विनंती आयोजकांनी मला केली आणि मी ती साऱ्यांना न आवडणारी बाजू मांडायला होकार दिला.

दुपारच्या वेळी एका विस्तीर्ण वडाखाली सगळे जमले. धारियांपासून प्रल्हाद अभ्यंकरांपर्यंतचे दिग्गजही हजर झाले. वक्त्यांनी त्यांच्या जागा घेतल्या. मला प्रथम काँग्रेसची भूमिका मांडायची होती व अखेर साऱ्यांना उत्तरेही द्यायची होती. मी ती बाजू कशी मांडतो याची सर्वांनाच उत्सुकता होती. भाषणाची सुरुवातच मी आणीबाणीच्या समर्थनापासून केली. 'देशाची अखंडता, सुरक्षितता व एकात्मता राखायची, तर त्यावर आजची आणीबाणी लादणे आवश्यक होते.' असा आरंभ करून मी म्हणालो, 'अखेर देश जयप्रकाशजींहून मोठा आणि त्याचे ऐक्य त्यांच्या सप्तक्रांतीहून श्रेष्ठ व महत्त्वाचे आहे. काही थोडे जण उणीव काढतात, म्हणून इंदिरा गांधींनी त्यांची जबाबदारी नाकारणे हा पळपुटेपणा झाला असता. साऱ्यांचा रोष पत्करून केवळ देशात सुरक्षितता नांदावी म्हणून त्यांनी ही आणीबाणी आणली आहे. तिला संसदेचे, न्यायालयाचे आणि देशातील बहुसंख्य जनतेचेही समर्थन आहे.'

पुढे म्हणालो, 'या विरोधकांचे एक सोपे गणित आहे. ते म्हणतात, काँग्रेस पक्षाला ३७ टक्के मते मिळतात. त्यामुळे देशातील ६३ टक्के लोक काँग्रेसविरुद्ध आहेत. मी म्हणतो अरे, हेच गणित जरा तुमच्याही पक्षांना लावून बघा. प्रमोदजी, तुमच्या पक्षाला ६ टक्के मते मिळतात. याचा अर्थ ९४ टक्के लोक तुमच्या विरुद्ध आहेत, असे त्याचे उत्तर येईल. समाजवाद्यांविरुद्ध ९६ टक्के आणि संघटना काँग्रेसच्या बाजूने तर एकही टक्का मते नसल्याने सारा देशच त्यांच्याविरुद्ध असल्याचे स्पष्ट होते.' माझ्या वाक्यांवर टाळ्या आणि हशा होत होता. त्यातली आक्रमकता मात्र बाकीच्या वक्त्यांना एकदम बचावाच्या पवित्र्यात नेणारी ठरली. माझ्यानंतर इतरांची भाषणे झाली.

अखेर मी म्हणालो, 'अरे तुमच्या पक्षाचे सोडा, पण तुमच्या राष्ट्रीय म्हणविणाऱ्या नेत्यांनाही त्यांचा मतदारसंघ सापडत नाही. प्रमोदजी, तुमचे वाजपेयी कधी रामपूर, कधी फूलपूर, कधी गुणा तर कधी दिल्ली असे का हिंडतात? बाकीच्यांची गोष्टच सोडा. मोरारजींना आता मतदारसंघ नाही, जगजीवनरामांना नाही, प्रत्यक्ष इथल्या धारियांनाही तो नाही. ही पाठबळ नसलेली माणसे आमचा पराभव कसा करणार!'

स्पर्धेच्या अखेरीस पुरस्कार वितरण झाले. ते प्रल्हादजी अभ्यंकरांच्या हातून. त्यांनी मला पहिला क्रमांक देऊन एक प्लॅस्टिकची थाळी तर प्रमोदला दुसऱ्या क्रमांकासाठी प्लॅस्टिकचाच एक पेला बक्षीस म्हणून दिला. त्यानंतरच्या काळात जो भेटेल, तो मला हसून म्हणायचा, 'आता तुमची सुटका जवळ आली बरं का…' त्यावर मी नुसतेच हसून मान हलवायचो.

१९७७ च्या २६ जानेवारीला गणराज्यदिनाच्या मुहूर्तावर आमची सुटका झाली. मात्र त्याआधीच्या काळात मला तुरुंगात अनेक कायमचे मित्र मिळाले होते. त्यात सर्व पक्षांच्या नेत्यांचा व कार्यकर्त्यांचा समावेश होता. तुरुंगात असताना जया, तू चारदा मला भेटायला आलीस. एका मोठ्या हॉलमध्ये अनेकांच्या उपस्थितीत आपण भेटत होतो. तुझ्या चर्येवर कधी व्यथा वा दुःख दिसले नाही. तू प्रसन्नपणे बोलायचीस. बाकीच्या गमतीजमती सांगायचीस. वडिलांच्या आजारपणात कुरुंदकर येऊन गेल्याचा सारा वृत्तांत तू तिथेच मला सांगितलास आणि हो, त्याच काळात इंग्रजी वाङ्मयात एम.ए.ची परीक्षा विद्यापीठात पहिला क्रमांक मिळवून तू उत्तीर्ण झाली होतीस. तुला साधी एखादी भेट द्यायलाही तेव्हा माझ्याजवळ काही नव्हते. मी फक्त तुझा हात हातात घेऊनच तुझे अभिनंदन केले होते. त्या काळात एकदा शैला आणि गंगाधरही मला भेटून गेले होते.

तुरुंगाबाहेर पडल्यानंतर आमच्यातील अनेकांनी नाशिकजवळच्या त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेतले व नंतरच घरी जाणारी गाडी पकडायला नाशिक स्टेशन गाठले.

**सुरेश द्वादशीवार**, चंद्रपूर
sdwadashiwar2021@gmail. com
Mob. : 9822471646

**वासंती फडके**

# जॅन मॉरिस : अनोखं व्यक्तिमत्त्व

दि.२ ऑक्टो. १९२६ रोजी इंग्लंडमधील सॉमरसेटमध्ये जन्मलेल्या जेम्स हंफ्रे मॉरिसचा मृत्यू जॅन मॉरिस या नावाने वयाच्या ९५ व्या वर्षी वेल्समधील एका इस्पितळात झाला. अनेक वर्षांपूर्वी जॅन मॉरिस म्हणाली होती– माझ्या मृत्युलेखाचं शीर्षक असेल लिंगबदल करून घेतलेली लेखिका. वयाच्या ४६ व्या वर्षापर्यंत ती पुरुष म्हणून जेम्स या नावाने वावरत होती. वयाच्या तिसऱ्या किंवा चौथ्या वर्षापासून आपल्यात काही तरी वेगळं आहे, असं वाटत असल्याचा उल्लेख Conundrum आढळतो. लिंगबदलामुळे नव्हे, तर लेखनकर्तृत्वामुळे ती लेखिका म्हणून प्रसिद्ध झाली.

जेम्सचे प्राथमिक शिक्षण स्थानिक शाळेत झाले. ऑक्सफर्ड ख्राईस्ट चर्चमध्ये तो choral scholar होता. कॉयरमध्ये गाणाऱ्या मुलांना दिली जाणारी शिष्यवृत्ती त्याला मिळत होती. दुसऱ्या महायुद्धात क्वीन्स रॉयल लॅन्सरमध्ये त्यानं काम केलं. जेम्समधील स्त्रीत्वाच्या भावनेशी त्याची लष्कराबद्दलची ओढ कदाचित अनेकांना भुवया उंचावणारी वाटतही असेल. पण लष्करातील धाडस, निष्ठा, स्वयंशिस्त यासह सैनिकाचा रुबाबदारपणा जेम्सला आवडत असे. वयाच्या २३ व्या वर्षी त्याची भेट एलिझाबेथ टकनीसशी झाली. ते दोघं १९४९ मध्ये विवाहबद्ध झाले. ते वेल्समध्ये राहात असत. या जोडप्याला ५ मुलं झाली. एक लहानपणीच दगावलं. तीन मुलगे व एक मुलगी यांना त्या दोघांनी मोठं केलं.

जेम्सनं पत्रकार म्हणून लंडन टाइम्स, गार्डियन या वृत्तपत्रांत काम केलं. वृत्तपत्रात काम करता-करता जेम्सच्या लिखाणाला सुरुवात झाली. हे लिखाण विविध प्रकारचं होतं. लंडन टाइम्सनं त्याला गाझापट्टीत घडणाऱ्या घडामोडींचा अहवाल घेण्यासाठी १९४६ मध्ये पाठवलं. पॅलेस्टाइनवर १९२० पासून ब्रिटिशांचा ताबा होता. तेथील गव्हर्नर लॉर्ड मॉयनीची (Moyne) हत्या १९४४ मध्ये

जेम्सनं हाती घेतलेला सर्वांत मोठा प्रकल्प म्हणजे Pax Britanica हा तीन खंडांत लिहिलेला ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास होय. जेम्सच्या दृष्टीनं इतिहास म्हणजे एक प्रकारचं कथाकथन होय. महाराणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव ते विन्स्टन चर्चिलच्या निधनापर्यंतच्या ब्रिटिश साम्राज्याच्या काळाचं त्यात वर्णन आहे. त्यात हीरकमहोत्सवाचा प्रारंभ, त्यासाठी बकिंगहॅम पॅलेसमध्ये खास निर्माण केलेलं तार ऑफिस व ठरलेल्या वेळी बटण दाबून जगभर दिलेला महोत्सवाचा संदेश– या सगळ्याचं वर्णन आहे. पण त्याचबरोबर व्हिक्टोरिया राणीला हे साम्राज्य अभेद्य वाटत असलं आणि ते तिनं मिळवलं याचा तिला अभिमान वाटत असला, तरी काबीज केलेल्या सर्व देशांत दडपशाहीचा वापर करून, लष्करी बडगा दाखवून ते देश ताब्यात घेतले आहेत याचीही नोंद मॉरिसनं केली आहे.

झाली. तेथील किंग डेव्हिड हॉटेलवर १९४६ मध्ये बाँबहल्ला झाला होता. ह्या घटनांचा व तेथील परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी त्याला पाठवलं होतं.

वयाच्या २६ व्या वर्षी माऊंट एव्हरेस्टची यशस्वी चढाई करणाऱ्या एडमंड हिलरी व तेनसिंग नोर्जे यांच्या चमूत जेम्स सामील झाला. एव्हरेस्ट चढाईच्या वृत्तांकनाचे हक्क लंडन टाइम्सने मिळवले होते. त्या चमूत जेम्स एकटाच वार्ताहर होता आणि त्यानं १७९०० फूट उंचीपर्यंत त्यांच्याबरोबर चढाई केली. हेतू हा की, शिखर सर केल्याची वार्ता प्रथम आपल्या वृत्तपत्रातून जाहीर करता यावी. त्या काळात आजच्याइतकी प्रगत संपर्क-संवादव्यवस्था नव्हती. एव्हरेस्ट सर केल्याचा सांकेतिक भाषेतील संदेश त्यानं नामचे बझार येथील रेडिओ स्टेशनवरून लंडनला पाठवला. ही वार्ता लंडनला राणी एलिझाबेथच्या (दुसरी) राज्यारोहण समारंभाच्या आदल्या दिवशी पोहोचली. ब्रिटनच्या साम्राज्यावरील सूर्य मावळू लागला होता. त्यामुळं ही वार्ता उत्साहवर्धक ठरली. या मोहिमेवर असतानाच जेम्सला त्याची पत्नी प्रसूत होऊन दुसरा मुलगा हेन्री झाल्याचा संदेशही मिळाला. अशा पथकाबरोबर जाण्यासाठी त्या पथकाशी खूप मनापासून जवळीक असावी लागते. ही जवळीक आयुष्यभर टिकून राहिली. एडमंड हिलरीचं न्यूझीलंडमध्ये २००८ मध्ये निधन झालं तेव्हा त्याच्या अंत्ययात्रेसाठी न्यूझीलंड सरकारनं जॅन (जेम्स) व एलिझाबेथ यांची येण्या-जाण्याची व्यवस्था केली होती. चढाई करणाऱ्यांच्या मोहिमेतील ती एकटीच उरली होती. या मोहिमेवरील पुस्तक मात्र जेम्सनं तीन वर्षांनंतर लिहिलं. प्रत्यक्ष चढाई करणाऱ्यांची पुस्तके प्रसिद्ध झाल्यावर स्वतःचं पुस्तक प्रसिद्ध करण्याचा संकेत जेम्सनं पाळला.

विद्यार्थिदशेत Travels in Arabia Deserts, Seven Pillars of Wisdom यांसारख्या पुस्तकांनी जेम्सला खूप प्रभावित केलं होतं. त्यामुळंच Sultan in Oman हे एकमेव प्रवासवर्णनात्मक पुस्तक जेम्सनं लिहिलं. शहरांवरील अन्य पुस्तकात त्या जागा व तेथील लोकांची वर्णनं आहेत. मॉरिसला स्वतःला प्रवासवर्णनलेखिका म्हणवून घेणं आवडत नसे. अरब जगतावरचं दुसरं पुस्तक Market of Seleukia हे शीर्षक एका ग्रीक कवितेतून घेतलं आहे. या पुस्तकामध्ये एक देव बाजारात मौजमजा, फसवणूक करण्यासाठी येतो, अशी कल्पना आहे. वार्ताहर म्हणून असलेला अनुभव तसंच लष्कर व कैरोतील न्यूज एजन्सीचे अनुभव यातून त्याला ही कल्पना सुचली. इजिप्तच्या नासरभोवती अख्खं अरब जग फिरत असे. इतर अनेक देशांचे हितसंबंध त्यात गुंतलेले होते. आजच्या तेथील समस्यांचे मूळ या सर्वांत आहे. हे पुस्तक लिहिण्यापूर्वी जेम्सनं संपूर्ण मध्य-पूर्व हिंडून पालथी घातली होती. लेबनॉन हा सावकारांचा (मनी लेंडर्स) देश आहे, असं मॉरिस म्हणत असे. या सगळ्या वर्णनातून जेम्सला ज्यूंपेक्षा अरबांबद्दल अधिक सहानुभूती असल्याचं दिसून येतं.

मॉरिसची व्हेनिस, ट्रिस्टी (Trieste) ही पुस्तकं गाजली. त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. ट्रिस्टी हे व्हेनिससारखं नेहमी ओठावर येणारं शहर नाही. पण १९१४ मध्ये फ्रान्झ फर्डिनंड व त्याची पत्नी सोफी यांची हत्या झाल्याच्या घटनेमुळं पहिल्या महायुद्धाला तोंड फुटलं. त्यांची अंत्ययात्रा ट्रिस्टीमधून गेली होती. हे शहर कधी युरोपातील ह्या राज्याला, तर कधी त्या राज्याला जोडलं जाई. अखेरीस ते इटलीला जोडलं गेलं. त्या शहरात फिरताना हे शहर कोणत्या देशात आहे, हे इटलीतील ७० टक्के लोकांना माहीत नसल्याचं जेम्सला आढळलं. १९६० मध्ये प्रसिद्ध झालेलं 'व्हेनिस' अधिक लोकप्रिय असलं, तरी जेम्सला स्वतःला 'ट्रिस्टी' जास्त आवडत असे. व्हेनिस हे बोटींचं व होड्यांचं शहर आहे. व्हेनिस १५ शतकांपूर्वी समुद्रातून निर्माण झालं. व्हेनिस पाण्याखाली जाण्याची भीती १९६६ मध्ये निर्माण झाली होती. पण पाण्याखाली प्रचंड मोठाले अटकाव निर्माण करून व्हेनिस बुडू दिलं नव्हतं. जॅननं २०१५ मध्ये व्हेनिसला परत भेट दिली, तेव्हा तिला ते शहर आपलं वाटलं नाही.

मॉरिसनं जगातील जवळजवळ सर्व मोठ्या शहरांना भेटी देऊन तेथील लोकांचं व तेथील प्रमुख स्थळांचं वर्णन केलं आहे. त्याखेरीज जगभरात चाललेल्या अनेक महत्त्वाच्या खटल्यांचं वार्तांकनही तिथं प्रत्यक्ष जाऊन केलं आहे. फ्रॅन्सिस गॅरी पॉवर्सचा खटला मॉस्कोत चालला होता. (तो अमेरिकेच्या हेरगिरी करणाऱ्या विमानाचा पायलट होता.) चे गेवारा या क्रांतिकारक नेत्याची मुलाखत मॉरिसनं क्युबामध्ये जाऊन घेतली. त्याचं वर्णन तिनं as sharp as cat असं केलं आहे. मॉस्कोत मॉरिसनं गाय बर्जेस या ब्रिटिश हेरखात्यातील दोषी माणसाची भेट घेतली. इस्रायलमध्ये ॲडॉल्फ इचमन (Eichmann) ह्या नाझी गुन्हेगाराच्या खटल्याचं वार्तांकन करताना मार्मिक विनोदाचा वापर केलेला दिसतो. लाखो ज्यूंना मारण्यात

त्याचा हात असल्याचं सिद्ध झाल्यानं त्याला फाशीची शिक्षा ठोठावण्यात आली. हिरोशिमालादेखील जेम्सनं भेट दिली होती.

जेम्सनं हाती घेतलेला सर्वांत मोठा प्रकल्प म्हणजे Pax Britanica हा तीन खंडांत लिहिलेला ब्रिटिश साम्राज्याचा इतिहास होय. जेम्सच्या दृष्टीनं इतिहास म्हणजे एक प्रकारचं कथाकथन होय. महाराणी व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाचा हीरकमहोत्सव ते विन्स्टन चर्चिलच्या निधनापर्यंतच्या ब्रिटिश साम्राज्याच्या काळाचं त्यात वर्णन आहे. त्यात हीरकमहोत्सवाचा प्रारंभ, त्यासाठी बकिंगहॅम पॅलेसमध्ये खास निर्माण केलेलं तार ऑफिस व ठरलेल्या वेळी बटण दाबून जगभर दिलेला महोत्सवाचा संदेश– या सगळ्याचं वर्णन आहे. पण त्याचबरोबर व्हिक्टोरिया राणीला हे साम्राज्य अभेद्य वाटत असलं आणि ते तिनं मिळवलं याचा तिला अभिमान वाटत असला, तरी काबीज केलेल्या सर्व देशांत दडपशाहीचा वापर करून, लष्करी बडगा दाखवून ते देश ताब्यात घेतले आहेत याचीही नोंद मॉरिसनं केली आहे. तसेच सॅलिस्बरी, ऱ्होड्स, लॉर्ड किचनेर, जोसेफ चेंबरलेन यांची शब्दचित्रे रेखाटली आहेत. ब्रिटिश साम्राज्यवाद एखाद्या साथीच्या रोगासारखा पसरत चालला असल्याचं विधान ग्लॅडस्टोननं केलं होतं. ब्रिटिश साम्राज्यात भारत हा मोठा देश असल्यानं साहजिकच भारतानं त्यात बरीच जागा व्यापली आहे. प्रकल्पाला जेम्स या नावानं सुरुवात केली तरी प्रकल्पाच्या शेवटी तिनं जॅन हे नाव धारण केलं होतं.

जेम्सनं १९५७ मध्ये South African Winter या पुस्तकात त्रिभाजित आफ्रिकेचं आणि द्विधा मनःस्थितीतील जोहान्सबर्गचं वर्णन केलं आहे. आफ्रिकेतील या भटकंतीत जेम्सची गाठ एक मांत्रिकाशी पडली. तेव्हा त्यानं जेम्सला 'तुझ्यात आमूलाग्र बदल घडून येईल आणि पूर्वीचं सगळं बदलून जाईल, सगळे त्रास (डोकं दुखणं वगैरे) नाहीसे होतील' असं भविष्य वर्तवलं होतं. जगभर भविष्य वर्तवणारे लोक प्रश्नकर्त्यांना हवं तेच उत्तर देतात, असं मॉरिसनं नमूद केलं आहे. जेम्सच्या मनीची इच्छा दुभाष्यामार्फत मांत्रिकापर्यंत कशी पोहोचली असेल, असा वाचकाला प्रश्न पडतो.

मॉरिसनं वृत्तपत्रातील वार्ताहर म्हणून काम करणं १९६० च्या सुमारास सोडून दिलं. जगभर भटकंती करून विविध देश व शहरे पाहिली. थोडक्यात, फिरस्त्याचं जीवन स्वीकारलं. फिरणं, लेखन करणं, पुनश्च भटकंतीसाठी बाहेर पडणं– असा जीवनक्रम जेम्सनं स्वीकारला. अख्खा स्पेन

जेम्स मॉरिस



जॅन मॉरिस



१९६३ मध्ये पिंजून काढला. संपूर्ण देशावर लिहिलेलं The Presence of Spain हे एकमेव पुस्तक. अपवाद– तिनं नंतर लिहिलेल्या वेल्सवरील पुस्तकांचा. स्पेनच्या बासिलिकातील ब्राँझचे चार घोडे जेम्सला फार आवडत. इतकंच नव्हे, तर उजवीकडून दुसऱ्या घोड्याचं खिंकाळणं ऐकू येणारा जेम्स हा एकमेव प्रवासी असावा. जेम्स अज्ञेयवादी असूनही त्याला चर्च पाहण्यात रस असे. स्पेनमधील टोलेडो येथील कॅथेड्रल म्हणजे ख्रिश्चन संस्कृतीचे यशोगीत आहे, असं जेम्सला वाटत असे. जॅननं १९८३ मध्ये चीनला प्रथमच भेट दिली. बीजिंगच्या तिआनमेन चौकात उभं राहिल्यावर तेथील अत्याचार आठवून उबग आणणारी एक इच्छा सफल झाल्याचं समाधान मिळालं, असं तिनं म्हटलं आहे.

तिचं Last Letters from Hav हे पुस्तक १९८५ मध्ये प्रसिद्ध झालं. हाव हे संपूर्णपणे काल्पनिक शहर होतं. आपल्या पुस्तकात भूमध्य समुद्रापलीकडचं हे शहर असल्याचा उल्लेख तिनं केला आहे. त्या शहराला मार्को पोलो, इब्न बतुता, टी.ई.तॉरेन्स, ॲडाल्फ हिटलर यांनी भेटी दिल्याचा उल्लेख त्यात केला आहे. अल्बर्टो मॅन्युएल व जिआनिनी गुडालुपी यांच्या काल्पनिक स्थळांच्या कोशात त्याचा उल्लेख केलेला आहे. हे शहर नकाशात सापडत नसल्यामुळं अनेकांनी जॅनवर पत्रांचा मारा केला होता. इतिहास लेखन असो वा शहरांची वर्णने असोत, तिची लेखनपद्धती पारंपरिक नव्हती. त्यातच तिचं वेगळेपण होतं.

वयाच्या ४६ व्या वर्षी (१९७२ मध्ये) मोरोक्कोतील कॅसाब्लँका शहरामधील डॉ. जॉर्जेस ब्यूरो (Burou) यांनी लिंगबदल शस्त्रक्रिया व त्याआधीची औषधोपचार योजना यशस्वीरीत्या पार पाडली आणि जेम्स मॉरिसची जॅन मॉरिस झाली. ह्या सगळ्याबद्दल तसंच त्याबाबतच्या लोकांच्या व कुटुंबीयांच्या प्रतिक्रियांबद्दल जॅननं Conundrum पुस्तकात सविस्तर लिहिलं आहे. ते एक प्रकारे तिचं आत्मचरित्रच आहे. काहींनी त्यावर टीका केली. मात्र एलिझाबेथ व मुलांनी तिला चांगला पाठिंबा दिला. ब्रिटिश कायद्यानुसार समलिंगी जोडप्यांना मान्यता नसल्यामुळं जेम्सला एलिझाबेथशी घटस्फोट घ्यावा लागला. जॅननं लिहिलं आहे, 'हा अनुभव आश्चर्यकारक तर होताच' पण मनाला शांतता देणाराही होता. नको असलेलं शारीरिक ओझं दूर करता आलं. औषधोपचारप्रक्रिया चालू असताना काही काळ ऑक्सफर्डमध्ये स्त्री म्हणून तर वेल्समध्ये चार मुलांचा बाप म्हणून पुरुषवेषात वावरावे लागत होते', असं तिनं एका मुलाखतीत सांगितलं होतं. त्यानंतर जॅन व एलिझाबेथ लीगल पार्टनर म्हणून शेवटपर्यंत एकत्र राहिले. एकत्र प्रवास केला.

नंतरच्या काळात मूळ इंग्रज असलेल्या जॅनला वेल्सबद्दल अधिक प्रेम व आपुलकी वाटू लागली. प्रिन्स ऑफ वेल्स या बिरुदाची निरर्थकता तिच्या लक्षात आली. वैयक्तिक रीत्या कोणत्याही इंग्लंडच्या राजपुत्राबद्दल तिला आकस नव्हता; पण इंग्रजी व वेल्स ह्या दोन्ही भाषा अगदी भिन्न आहेत. प्रिन्स ऑफ वेल्सला वेल्स भाषा येत नाही. त्याचं निवासस्थान वेल्समध्ये नाही. कधी तरी इंग्लंडचं जोखड फेकून वेल्स स्वतंत्र होईल, असा विश्वास तिनं आपल्या वेल्सवर लिहिलेल्या पुस्तकातून वेल्सचा इतिहास सांगताना व्यक्त केला आहे. इंग्लंड वा इंग्रजी भाषा तिला शत्रू वाटत नाही, पण ओढा मात्र वेल्सकडे आहे.

वयानुरूप जॅनलाही काठी घेऊन चालावं लागलं. भ्रमंती हळूहळू कमी झाली. एलिझाबेथला अल्झायमरनं ग्रासलं. मात्र जॅननं तिची साथ सोडली नाही. एकदा ब्रेकफास्टचा ट्रे जॅनच्या हातून पडला, त्यातील वस्तू सांडल्या–फुटल्या. एलिझाबेथ चटकन पुढे झाली अन् तिनं सगळं स्वच्छ केलं. जॅननं एलिझाबेथला 'तू चटकन किती छान सांभाळून घेतलंस' असं म्हणेपर्यंत एलिझाबेथला आपण काय केलं ते लक्षातच राहिलं नव्हतं. जॅनला आत्मचरित्र लिहावंसं वाटत नव्हतं. मात्र तिचे प्रकाशनसंबंधी व्यवहार सांभाळणाऱ्या डेरेक जोन्सला (Derek Johns) तिनं तिचं वाङ्मयीन चरित्र लिहिण्याची परवानगी दिली. त्याचं पुस्तक Ariel शीर्षककानिशी प्रसिद्ध झालं आहे. तिला अनेक मानसन्मान व पारितोषिकेही मिळाली. तिची विविध प्रकारची सुमारे ५० पुस्तकं प्रसिद्ध झालेली आहेत. विपुल लेखन करणारी ही लेखिका २० नोव्हेंबर २०२० रोजी आपल्या लेखनाचा ठसा जनमानसावर उमटवून काळाच्या पडद्याआड गेली.

**वासंती फडके,** मुंबई–४०००५१
Ph. No. 022-26591412

विजय राऊत

# ‘उद्या’ : वास्तव आणि शक्यतांवरील प्रकाशझोत

अनंत यशवंत खरे ऊर्फ नंदा खरे यांनी लिहिलेल्या ‘उद्या’ या कादंबरीला २०२० चा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. मनोविकास प्रकाशनातर्फे ही कादंबरी २०१५ मध्ये प्रकाशित झाली. आधुनिकतेचा आणि नावीन्यतेचा शोध घेणारे आशयगर्भ लेखनविश्व खरेसरांनी आतापर्यंत साकारलेले आहे. वर्तमानातून भविष्याचा चिकित्सक वेध घेणे आणि माणसाच्या असुरक्षित असण्याची घुसमट निडरपणे व्यक्त करणे, हे त्यांच्या लेखनातील प्रमुख लक्षण आणि प्रसिद्धिपराङ्मुख असणे हा त्यांचा स्वभाव. अशा वाङ्मयविरहित साहित्याच्या/लेखनाच्या बाबतीत अरसिक म्हणता येईल अशा क्षेत्रात कार्यरत असून, विपुल तरीही दर्जेदार आणि समकाळाबरोबर भविष्यवेध घेणारे मराठी/इंग्रजी लेखन करणे हा त्यांचा लेखनधर्म आहे. एखादी व्यक्ती अथवा परिस्थितीकडे कोणत्या व किती अंशांच्या कोनातून आपल्याला पाहता येईल तेव्हाच त्यामागील आणि त्यातील नेमके सत्त्व सापडू शकेल, या शोधात या अभियंत्याचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व सतत मग्न असते. प्रतिभावान, भविष्यवेधी आणि विचक्षण आकलनशक्ती लाभलेल्या या वैदर्भीय साहित्यिकाला त्यांच्या ‘उद्या’ या कादंबरीतून समजून घेण्याचा हा अल्पसा प्रयत्न!

नंदा खरे यांचे ‘उद्या’ नावाचे पुस्तक एक प्रकारे कथापुंज आहे. एकूण १५ कथा २८५ पानांमध्ये पुस्तकरूपाने आपल्यासमोर येतात. यातील ‘अस्तित्व’, ‘लोगो अन् पेनं’ व ‘मुळं-पारंब्या’ या कथेतील विषय एकच आहे. तसेच ‘सर्व्हेलन्स’, ‘बच के कहा जाओगे’ या दोन कथांत एकच विषय विभागला गेलेला आहे आणि ‘जंगलात शेतं’, ‘लांडगेतोड’ व ‘कुत्रे’ यातून एकच वास्तवकथा वर्णिलेली आहे. ‘दिवाणखान्यातील हत्ती’, ‘तंबूतला उंट : केवायसी प्लस’, ‘लक्ष्मीची पाऊले’, ‘सुस्वरूप कन्या म्हणजे’, ‘ज्याची त्याची श्रद्धा’, ‘सरडे’ व ‘तीनदा स्टिग्लित्झ’ या

नंदासरांनी या कथामालिकेतून सरकार आणि कॉर्पोरेट यातील संगनमत कसे असेल याची शक्यता नोंदवली आहे. स्वार्थाकरता शेतकरी-आदिवासींना नक्षलवादी ठरवून त्यांच्या जमिनीतील खनिजसंपत्तीची लूट चालविली आहे. या कथेतील पहाडे पोलीस म्हणतो, ‘साली चांदा-गडचिरोलीची किस्मत खोटी. जमीन खंदली तर सिमेंटचा गोटा, कोयला, तांबा, लोखंड भेटणार. जमिनीवर चार-बोरापासनं बांबू-सागापर्यंतचे झाडं. जंगल कायदे घरच्यानले चोर ठरवणार!’ मूलनिवासी आदिवासींना नक्षलवाद्यांमध्ये कसे रूपांतरित केले जाते याची नियोजनबद्ध प्रक्रिया या कथामालिकेतून खरेसरांनी उलगडून दाखविली आहे. ‘तीनदा स्टिग्लित्झ’ या लेखात फार चिंतनशील, विचारप्रवृत्त करणारे आणि दाहक वास्तव अमेरिकन अर्थशात्रज्ञ व २००१ चे नोबेल पारितोषिकप्राप्त जागतिक बँकेचा प्रमुख सल्लागार जोसेफ स्टिग्लित्झ यांच्या सिद्धांताच्या आधाराने स्पष्ट केलेले आहे.

उरलेल्या कथांमधील विषय अतिशय वास्तववादी आणि वाचकाला स्तंभित करणारे आहेत. मुळात ‘उद्या’ हे पुस्तकच भविष्यात घडणाऱ्या घटितांवर बेतलेले आहे. भूतकाळात रमणे सहसा बहुतेकांना सहज शक्य होते, पण भविष्याचे भीषण वास्तव काय असू शकते; नव्हे, तर काय असणार याची मांडणी करणे सोपे असू शकते असे मला वाटत नाही. या पुस्तकातील घटनाच मुळात बाविसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या जगातील आहेत. जागतिकीकरण, व्यापारी-भांडवलदारांची मनमानी, हळूहळू हुकूमशाहीकडे परावर्तित होत जाणारी एककेंद्री सत्ता, बेमुर्वत सत्ताधारी, असुरक्षित आणि संख्येने कमी होत जाणाऱ्या स्त्रिया, मुलींची हंटिंग, वैयक्तिक माहिती चोरणारी व सतत कॅमेऱ्याने सर्वांवर काटेकोर लक्ष ठेवणारी शासनव्यवस्था, सर्वोच्च पदावरील अधिकाऱ्यांचा सत्ताधाऱ्यांद्वारे होणारा वापर व त्यातून येणारे डिप्रेशन, राग आणि ताण, या सर्वांत पिचला जाऊन उद्ध्वस्त होत जाणारा सामान्य-अतिसामान्य माणूस आणि यातून जगावे लागलेले अस्तित्वहीन जीवन- या सर्व भविष्यातील नकोशा वाटेल एवढे वास्तव लेखक नंदा खरे ‘उद्या’ या time machine ने वाचकाच्या दृष्टिक्षेपात आणतात. खरे तर हॉलीवुड सिनेमांत अशा कल्पना मुबलक प्रमाणात बघायला मिळतील. पण त्यात आणि आपल्या उद्यात आशयमूल्याच्या दृष्टीने फार मोठा फरक आहे. त्यात बव्हंशी काल्पनिकता अधिक, अतार्किक प्रसंगांची रेलचल आणि मर्यादेपलीकडील मनोरंजन असते. ‘उद्या’मध्ये भविष्याची निश्चितता (certainty), काल्पनिकता टाळून अटळ वास्तव गंभीर आणि तटस्थपणे मांडलेलं आहे. या अर्थी उद्यातील कथा अधिक रिॲलिस्टिक म्हणून विचारात घेण्यासारख्या आहे. लेखक हा जेवढा भूतकाळात रमणारा तेवढाच, किंबहुना त्यापेक्षा अधिक भविष्यवेधी असावा, असे मला वाटते. कारण साहित्य हे जेवढा भूतकाळ कवेत घेते तेवढ्याच ताकदीने भविष्यकाळालाही पकडू पाहणे अत्यावश्यक बाब आहे. म्हणजे साहित्यिक द्रष्टा असावा. नंदा सरांजवळ हे द्रष्टेपण आहे.

उद्या या कथापुंजात ‘अस्तित्व’, ‘लोगो अन् पेनं’, ‘मुळं- पारंब्या’ या तीनही कथांतील विषय एकच आहे. सुदीप जोशी नावाच्या बाविसाव्या शतकातील एका भाषा ट्रान्सलेशन कंपनीत ट्रान्सलेटर म्हणून काम करणाऱ्या व तांत्रिक जगात होरपळणाऱ्या तरुणाची धडपड या कथेतून समोर येते. या जगात जगण्याचा व आपल्या असण्याचा पुरावा म्हणजे त्याचे ओळखपत्र आहे. या ओळखपत्रानेच तो जगण्यासंबंधातील सर्व कामे करू शकतो, सर्व आर्थिक व्यवहार यामुळे शक्य होत असतात. हे ओळखपत्र हरवल्यानंतर तो या आधुनिक जगात जिवंत असूनही अस्तित्वहीन होतो. ते अस्तित्व मिळवण्यासाठी त्याची प्रचंड तडफड चाललेली आहे. असे अनेक जीवघेणे आणि नकोसे प्रसंग माणसाच्या फक्त काही काळ अंतरावर असून अटळ आहेत. ही उद्याची चेतावणी खरेसरांनी या कथेतून दिलेली आहे. मुंबई या महानगरातील २०२२ च्या सुरुवातीची ही कथा आहे. ज्या वेळी सुदीप जोशीला दुसरे ओळखपत्र मिळवण्यासाठी पैशाची गरज भासते, तेव्हा तो सुरेश आजरेकर या दळव्याच्या मदतीने महिकादळात सामील होतो.

याच कथेचा पुढचा भाग म्हणजे, ‘लोगो अन् पेनं’ ही कथा होय. अमरावती जिल्ह्यातील तीनखेडा हे सुदीप जोशींचं गाव. या गावातील सद्‌गृहस्थ भाकरेगुरुजी आणि कुशाग्र बुद्धिमत्तेचा तरुण नितीन भक्ते व पत्नी रितू यांच्या जीवनाची ही कथा होय. ही कथासुद्धा भविष्यकाळातीलच आहे. या तीनखेडा गावात विविध जागतिक कॅमेरे, चिप बनवणाऱ्या कंपन्या स्थापन झालेल्या आहेत. नितीन भक्ते याच गावातील विद्यार्थी शिकून एका कंपनीशी मिळून काम करतोय! त्याची पत्नी रितूसुद्धा उत्कृष्ट designer आहे. तिच्या मदतीने तो आंतराष्ट्रीय कंपन्यांचा लोगो design करतो आणि नफ्याचा व्यवसाय करतो. नंतरच्या वाढलेल्या स्पर्धेमुळे नितीनची घुसमट सुरू होते; शेवटी तो डिप्रेशनमध्ये जातो व दारू पिण्याचं प्रमाण वाढून अखेर मृत्यू पावतो. विविध जागतिक कंपन्यांची मक्तेदारी नोकरदारांच्या जीवावर उठणार आहे, अशी पूर्वसूचना लेखक या माध्यमातून देतात.

‘मुळं-पारंब्या’ हा वरील दोन कथांचा शेवटचा भाग. सुदीप जोशी कंपनीत ट्रान्सलेटर आणि महिकादळात काम करीत असतो. हळूहळू तो गुन्हेगारी जगतात कुख्यात होतो. असं सर्व सुरळीत चालू असताना जोशीचा बहीणजावई अशोकराव आणि भाची एका अपघातात मृत्यू पावतायेत, त्यामुळे जोशीला सर्व सोडून तातडीने गावाकडे जावे लागते.

जावई मेल्यानंतर सुदीप कित्येक दिवस संबळी या बहिणीच्या गावी काढतो. तेथे अपुरा पैसा आणि

जावयाच्या कर्जाची परतफेड करणं त्याला कठीण होत जाते. अमरावतीचा गवळीसेनेचा प्रमुख सगनभाऊ नावाचा गुन्हेगार कशी तरुण मुलींची हंटिंग करवतो व बाहेर त्यांना कसे विकतो याचेही वर्णन या कथेत आलेले आहे. मुलींचे असुरक्षित जीवन हे पुढचे महत्त्वाचे आव्हान राहणार आहे, असे दिसते. या कथेत मुलींजवळ तिखटाचे स्प्रे असतात. त्या ज्या वाहनाने जाणार त्याला कॅमेरा, मोबाईलमध्ये जीपीएस इत्यादी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने मानवी अस्तित्व हरवून जाण्याची शक्यता खरेसरांनी व्यक्त केलेली आहे.

'सर्व्हेलन्स' आणि 'बच के कहाँ जाओगे' या दोन्ही कथांचा विषय एकच आहे. देशातील आयएएस, आयपीएस तथा समकक्ष अधिकाऱ्यांची सत्ताधाऱ्यांकडून हेरगिरी कशी होते आणि सत्ताधारी विविध प्रलोभने दाखवून या बुद्धिमान अधिकाऱ्यांना कसे जाळ्यात पकडतात याचे चकित करणारे वास्तव रेखाटन या दोन कथांत केलेले आहे. विकास आणि भरोसासारख्या सरकारच्याच व त्यांच्याच कृपादृष्टीने चालणाऱ्या कंपन्या जनतेच्या संपत्तीची कशी चोरी करतात याचे उपरोधिक वर्णन अरुण सन्मार्गी या आयएएस अधिकाऱ्याच्या व त्याच्या पत्नीच्या- अनसूया सन्मार्गी यांच्या- जीवनातून स्पष्ट केलेले आहे. कॅमेऱ्याच्या माध्यमातून लोकांच्या चेहऱ्यावरील हावभाव टिपून अत्याधुनिक यंत्रणेद्वारे त्यांच्या कृतीचा अदमास घेतला जातो आहे. नव्वद टक्के लोक 'अँगर अँड अँझाईटी' म्हणजे राग आणि ताणात आहेत. हे उद्याचे वास्तव आहे.

'जंगलात शेतं', 'लांडगेतोड' आणि 'कुत्रे' या तीनही कथा सानिका धुरू या तीस-बत्तीस वर्षांच्या तरुण वार्ताहर मुलीची जिज्ञासा वर्णन करणारी आणि सरकारची छुपी राजनीती स्पष्ट करणारी कथामालिका आहे. सानिका धुरू ही 'राउंड अँड अबाऊट' या ई-वृत्तपत्राची वार्ताहर आहे. काही तरी वेगळी खळबळजनक स्टोरी लिहिण्याची तिची तगमग तिला स्वस्थ बसू देत नाही. या वृत्तपत्राचा संपादक केके तिची भेट एसेमदा नावाच्या सत्तर वर्षांच्या सिनिअर रिपोर्टरशी घालून देतो. पूर्वी त्याने बराच काळ चंद्रपूर, गडचिरोली या भागात देशांतर्गत आतंकवादावर काम केलेले असते, पण एका कॉर्पोरेटसच्या नाराजीमुळे त्याला हा भाग सोडावा लागतो. तेथील आदिवासींच्या स्टोरी कव्हरेजसाठी एसेमदा तिला स्टोरी बनवायला चंद्रपूरला पाठवितो. तेथील साधू नावाचा खबऱ्या तिला गडचिरोलीच्या जंगलात खूप आत असलेल्या चारगाव या




भागात पोहोचवण्याची व्यवस्था करतो. नागेपल्ली, आतमपल्ली, तांबेपाडा आणि देवठाण या जंगलातील चार गावांच्या समूहाला चारगाव म्हणून ओळखले जाते. संपूर्ण खनिज संपत्तीने संपन्न असे क्षेत्र. पलीकडे अबूजमाड या पहाडी भागात असणारे नक्षलवादी आणि बाजूला मोन्सागिल या शेतीत संशोधन करणाऱ्या कंपनीची वसाहत. तांबे, पितळ इत्यादी धातूची भांडी बनवण्याचे स्थानिक लोकांचे लघुउद्योग या भागात आहेत. सरकारनियंत्रित कॅमेऱ्याने वेढलेल्या या भूभागाची इत्थंभूत माहिती नागोरावदादा आणि देवरावभाऊ सानिकाला देत असतात. त्याच कालावधीत कुण्या एका मोठ्या कॉर्पोरेटला हा चारगावचा खनिजसंपत्तीने विपुल भाग घशात घालायचा असल्यामुळे चारगावला नक्षलवादी ठिकाण म्हणून सरकारपुरस्कृत झालेल्या चकमकीत सानिका धुरूचा नाहक बळी जातो.

नंदासरांनी या कथामालिकेतून सरकार आणि कॉर्पोरेट यातील संगनमत कसे असेल याची शक्यता नोंदवली आहे. स्वार्थाकरता शेतकरी-आदिवासींना नक्षलवादी ठरवून त्यांच्या जमिनीतील खनिजसंपत्तीची लूट चालविली आहे. या कथेतील पहाडे पोलीस म्हणतो, 'साली चांदा-गडचिरोलीची किस्मत खोटी. जमीन खंदली तर सिमेंटचा गोटा, कोयला, तांबा, लोखंड भेटणार. जमिनीवर चार-बोरापासनं बांबू-सागापर्यंतचे झाडं. जंगल कायदे घरच्यानले चोर ठरवणार!' मूलनिवासी आदिवासींना नक्षलवाद्यांमध्ये कसे रूपांतरित केले जाते याची नियोजनबद्ध प्रक्रिया या कथामालिकेतून खरेसरांनी उलगडून

दाखविली आहे. ‘तीनदा स्टिग्लित्झ’ या लेखात फार चिंतनशील, विचारप्रवृत्त करणारे आणि दाहक वास्तव अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ व २००१ चे नोबेल पारितोषिकप्राप्त जागतिक बँकेचा प्रमुख सल्लागार जोसेफ स्टिग्लित्झ यांच्या सिद्धांताच्या आधाराने स्पष्ट केलेले आहे. कोटीतील लाख, लाखातील हजार आणि हजारातील शंभर कशा प्रकारे सत्ताधीश होऊन आपल्याला हवे ते अनुकूल बदल करून घेतात; फक्त शंभर लोकच कसे अदलून-बदलून त्याच पदावर येतात, हे दाखविले आहे. जगाच्या व्यवहारात हक्क हा तुल्यबळांमध्येच उद्‌भवणारा प्रश्न आहे. बलवान त्यांना जमेल ते करतात, आणि दुर्बल त्यांना भोगावे लागते ते भोगतात. ग्रीक इतिहासकार थुकिडायडिजच्या या वाक्याद्वारे ही प्रक्रिया ते स्पष्ट करतात.

‘दिवाणखाण्यातील हत्ती’ या रूपक कथेतून लोकसंख्या आणि दुष्परिणामांवर प्रकाशझोत टाकलेला आहे. लोकसंख्येने व्यक्तीचे व्यक्तीपण हरवले आहे. प्रजा वाढण्याबरोबर ती टिकून राहणे, बहुसंख्य होताना सक्षम होणे किती गरजेचे आहे- या भयावह वास्तवाला भविष्यात किती विराट रूप येईल याचे मौलिक चिंतन या लेखात आलेले आहे.

‘तंबूतला उंट : केवायसी प्लस’ या लेखातून सेवेच्या नावावर know your customer केवायसी या प्रक्रियेद्वारे आपण वापरत असलेल्या मोबाईल, कॉम्पुटरद्वारे वैयक्तिक माहिती उघड होऊन केवायसी नावाचा उंट आपल्या तंबूत नकळत शिरून आपले खासगीपण संपले आहे. तसेच खुल्या अर्थव्यवस्थेत तंत्रज्ञान, पेटंट विकली जातात आणि विकत घेणारे श्रीमंत होतात. विकत घेणारे हे कसे भाडखाऊ/सटोडिये आहेत, हे खरेसर ‘लक्ष्मीची पाऊले’ या लेखातून पटवून देतात. कायद्याची अंमलबजावणी त्यांच्याच सोईची असून हा सर्व प्रकार सर्वसामान्यांना समजू नये म्हणून प्रसारमाध्यमांनासुद्धा यात कसे जुंपले जाते याची चर्चा या लेखात आलेली आहे. ज्या प्रदेशात नैसर्गिक संसाधनं मुबलक असतात, त्या प्रदेशाचा विकास झपाट्याने व्हावयास पाहिजे; पण तसे न होता, ते असणं म्हणजे एक शाप ठरतो. सुस्वरूप कन्या ज्याप्रमाणे आई-बापाच्या छाताडावरील धोंड ठरविली जाते, त्याप्रमाणे या जमिनीचा मालक असणे शाप ठरतो. लेखक या प्रकाराला संसाधनांचा शाप (resource curse) संबोधतात. ‘ज्याची त्याची श्रद्धा’ आणि ‘सरडे’ या दोन्ही लेखांतून लेखकाने अतिशय गंभीर विषय हाताळले आहेत. २००१ पासून अस्तित्वात आलेले आभासी चलन बिटकॉइनचे संभाव्य धोके आणि स्त्रीभ्रूणहत्येमुळे निर्माण होणाऱ्या गंभीर प्रश्नांची चर्चा या लेखांत आलेली आहे.

नंदा खरे हे एक अभियंता आहेत. अभियंता म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची एक विशिष्ट मूस बनलेली आहे. प्रचंड पाश्चात्त्य आणि भारतीय साहित्यवाचनातून आलेली सजगता त्यांच्या लेखनाचा आधारस्तंभ आहे. तशी त्या-त्या क्षेत्रात ती-ती सर्वांची असतेच. म्हणून सर्वांचा दृष्टिकोन परस्परांहून पूर्णतः वेगळा. ‘उद्या’ या कथापुंजात त्यांच्यातील अभियंत्याचे द्रष्टेपण जागोजागी प्रत्ययास येते भविष्यातील शक्याशक्यतेचा वावर त्यांच्या विचारातील अविभक्त घटक असून त्यांच्या लिखाणाचा कॅनव्हास प्रचंड भव्य आहे. त्यांचा वाचक सतत दक्ष राहावा म्हणून विचाराच्या, घटितांच्या नानाविध शक्यता खरेसर निडरपणे मांडतात. डाव्या-उजव्याची चिंता न वाहता मानवतावादी राहणे त्यांना अधिक सोईचे वाटते. स्वातंत्र्यापेक्षा समता, समतेपेक्षा बंधुता त्यांना अधिक महत्त्वाची वाटण्याबरोबरच साहित्यातील मनोरंजनापेक्षा ज्ञान जीवनावश्यक व जीवनोद्धारक घटक वाटतो. केवळ रटाळ, वाचकाच्या बुद्धीला ताण न आणणारे लेखन बहुधा त्यांच्या हातून घडत नाही. लेखक म्हणून विविधता अनुस्यूत असलेले सर्जनशील लेखन करणे हा त्यांच्या लेखणीचा अंगभूत गुण असून त्याचा प्रत्यय त्यांच्या लेखनातून सतत येत असतो. बहुधा सामान्यांच्या दृष्टिक्षेपात न येणाऱ्या घटकांचे वैज्ञानिक/संशोधकाच्या पातळीवर जाऊन निरीक्षण नोंदवणे ही त्यांच्या लेखनाची खासियत ठरते. वर्तमानात सतत डोकावणारी अस्वस्थता त्यांना उद्याच्या दृष्टीने धोक्याची वाटते. या सगळ्या वैशिष्ट्यगुणांनी खरेसर मराठी साहित्यात चाकोरीबाहेरचे लेखक ठरतात. कोणत्याही सभा-समारंभापासून अलिप्तता राखून आपल्या अनन्य शैलीने लेखन करणारे खरेसर ‘द्रष्टा’ लेखक ठरतात. त्यांना दिसलेले उद्याचे जटिल/गुंतागुंतीचे स्वरूप पाहून निश्चितच विचारप्रवृत्त होऊन उद्याचा दिवस तरी गोड होईल, अशी अपेक्षा करू या.

**प्रा.डॉ. विजय रूपराव राऊत,** नागपूर
parambiraut@gmail.com
Mob, 9850236879




# प्राथमिक शिक्षणाच्या उज्वल भवितव्यासाठीचे चिंतन

हे पुस्तक प्राथमिक शिक्षणाच्या- पर्यायाने देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी धडपडणाऱ्या शिक्षकांच्या माफक अपेक्षांचे, त्यांनी पाहिलेल्या स्वप्नांचेच संकलन आहे. या शिक्षकांची स्वप्ने सत्यात आणण्यासाठी पैशांपेक्षा इच्छाशक्तीची गरज आहे. त्यांनी मांडलेल्या अपेक्षा अवास्तव नाहीत, तर त्या विद्यार्थ्यांचे हक्क आहेत. जी मुलं उद्या देशाचे भवितव्य ठरवणार आहेत, त्यांच्यासाठी इतक्या माफक अपेक्षा पूर्ण करू न शकणाऱ्या देशाचे भविष्य नक्कीच अंधकारमय असेल. त्यासाठी या पुस्तकातील शिक्षकांच्या अपेक्षा नवे शिक्षण धोरण ठरवताना, अभ्यासक्रम रचताना आणि अगदी शाळांसाठी नव्या इमारती बांधतानाही विचारात घ्याव्यात इतक्या महत्त्वाच्या आहेत. शिक्षणाबद्दल अनास्था बळावत चाललेल्या या दिवसांत शिक्षणक्षेत्रानेच नाही, तर संपूर्ण समाजाने अशा पुस्तकाचे मन:पूर्वक स्वागत केले पाहिजे.

## नंदकुमार मोरे

भुदरगड पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी दीपक मेंगाणे यांनी संपादित केलेले 'आमच्या कल्पनेतील प्राथमिक शिक्षण' हे पुस्तक प्राथमिक शिक्षणाच्या भवितव्यासाठी केलेल्या चिंतनपर निबंधांचे संकलन आहे. पुस्तकाची निर्मिती एका विशिष्ट मानसिक अस्वस्थतेतून झालेली आहे. ही अस्वस्थता काय आहे, हे संध्या वास्कर आपल्या निबंधात नेमकेपणाने सांगतात. त्या लिहितात : नोकरीची सुरुवातीची वर्षे छान गेली. 'पाठ्यपुस्तकांत जे आणि जसं दिलं आहे ते आणि तसंच मुलांच्या गळी उतरवणे म्हणजे अध्यापन' असं वाटायचं. मुलंही पोपटासारखी बोलायची. छान चाललं होतं. पण हल्ली थोडंसं अस्वस्थ झालं होतं. कशामुळे, ते मात्र समजत नव्हतं. कुठे तरी काही तरी बिघडलं होतं. 'घडी विस्कटल्यासारखं.' हे घडी विस्कटल्याचे वास्तव प्राथमिकच नव्हे, तर सर्व स्तरांवरच्या शिक्षणक्षेत्राचे वास्तव आहे. सरकारने शिक्षकांना आपले पूर्ण लक्ष आपल्या कामावर केंद्रित करता यावे म्हणून त्यांचे वेतन वाढवले आहे. त्यांचे काम बौद्धिक असल्यामुळे कामाच्या ठिकाणी राहण्याचे बंधन त्यांना असते. परंतु, बरेच शिक्षक दिल्या जाणाऱ्या वेतनापेक्षा अधिकचे काही कसं मिळवता येईल यात गुंतलेले असतात. कोणी एलआयसी एजंट, तर कोणी स्टेशनरीचे दुकान टाकतात. खेडोपाडी शाळेपेक्षा शेतीकडे जास्त लक्ष देणारे शिक्षक आहेत, तर अनेक शिक्षक प्लॉट खरेदी-विक्री ते वडापच्या गाडीपर्यंत नाना प्रकारचे धंदे करताना दिसतात. भौतिक सुखसोईंच्या हव्यासाने मुलांचे शिक्षण आणि इतर काय वाट्टेल ती कारणे पुढे करत ते निर्धास्तपणे शहरात येऊन राहतात. शंभर-शंभर किलोमीटरचा प्रवास करत नोकरीच्या स्थळी पोहोचतात. असे शिक्षक ना विद्यार्थ्यांना न्याय देतात, ना कुटुंबाला. अशा शिक्षकांमुळे आज शिक्षणक्षेत्र बदनाम झालेय. तथापि, शिक्षणाचा व विद्यार्थ्यांचा गांभीर्याने विचार करणारे

शिक्षक आणि अधिकारीदेखील आहेत. हे वास्तव खूप आशादायी आहे. शाळेच्या वेळेपेक्षा अधिकचा वेळ हे विद्यार्थ्यांसाठी देऊ इच्छितात. त्यामुळे सारेच बिघडले आहे, असेही म्हणता येणार नाही. काही चांगलेही होत आहे, काही चांगले शिक्षक आज अस्वस्थ आहेत. ते नव्या कल्पना अमलात आणू इच्छिताहेत. दीपक मेंगाणे हे असेच अस्वस्थ अधिकारी आहेत. या अस्वस्थेतून त्यांनी प्राथमिक शिक्षणात काय प्रयोग करता येतील, याबद्दलची निबंध स्पर्धा आयोजित केली. या स्पर्धेतून शिक्षकांबद्दलचे एक आशादायी वर्तमान लोकांसमोर येते आहे. हे वर्तमान वाचून महात्मा गांधींच्या स्वप्नातील 'नई तालीम' आठवते. कारण या सर्वच शिक्षकांनी प्राथमिक शिक्षणाच्या भवितव्यासाठी नानाविध कल्पना सुचवलेल्या आहेत, त्यातील कोणत्याच कल्पना अनाठायी नाहीत. थोडीशी इच्छाशक्ती असेल आणि थोडी धडपड केली, तर त्या सर्वांनाच कमी-जास्त प्रमाणात अमलात आणता येतील अशा आहेत.

दीपक मेंगाणे यांनी घेतलेल्या या स्पर्धेत भुदरगड तालुक्यातील ५३० प्राथमिक शिक्षकांपैकी केवळ ७० शिक्षक सहभागी झाले, हे चित्र चिंता व्यक्त करणारे आहे. परंतु, आशादायीही आहे. कारण सहभागी न झालेल्यांचा विचार करताना सहभागी झालेल्या कल्पक शिक्षकांच्या स्वप्नांकडे, कल्पनांकडे आणि त्यांच्या विचारांकडे दुर्लक्ष होऊ नये. सर्वोत्कृष्ट सोळा निबंध सदर पुस्तकात एकत्रित करण्यात आले आहेत. प्रारंभी मेंगाणे यांनी या निबंधांमधून वाचकांनी 'प्रत्यक्ष वर्ग आणि शाळेत काम करणारी आम्ही मंडळी प्राथमिक शिक्षणाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी काय विचार करतो, कोणत्या कल्पना बाळगतो इतकंच समजून घ्यावं' ही अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यांची ही अपेक्षा वाचकांनी समजून घेतल्यास आणि आपल्या पातळीवर या कल्पनांना सत्यात उतरवण्यासाठी थोडी धडपड केल्यास प्राथमिक शिक्षणाचे भविष्य बदलल्याशिवाय राहणार नाही.

स्वातंत्र्याची पंच्याहत्तरी साजरी करणाऱ्यांनी आपल्या देशात स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी, प्राथमिक शिक्षणातील गोंधळ दूर करता आलेला नाही, हे लक्षात घ्यावे. त्यासाठीच हे सारे शिक्षक नव्या कल्पना घेऊन आले आहेत. त्या कल्पना मनापासून समजून घेणे आवश्यक आहे. अशोक कौलवकर आपल्या निबंधात 'आपली शाळा प्रेमाच्या पायावर उभी असेल' असे लिहितात. पुढे आपले स्वप्न व्यक्त करताना जे लिहितात, ते वाचून आपल्याला स्वत:चीलाज वाटायला लागते. कारण ते अपेक्षितात त्या प्राथमिक गोष्टीही आपल्या राज्यकर्त्यांना मागील सत्तर वर्षांत पूर्ण करता आलेल्या नाहीत. कौलवकर यांनी अपेक्षिलेल्या प्राथमिक गोष्टीही आज शाळांमध्ये नाहीत, हे भयावह वास्तवच यातून समोर येते. ते लिहितात, 'शाळेची इमारत नव्या युगाची गरज ओळखून सुसज्ज बांधलेली असेल. प्रत्येक वर्गासाठी स्वतंत्र खोली असेल. खोलीत पुरेसा प्रकाश असेल. बैठकव्यवस्था, वायुवीजन यांची सोय असेल. प्रत्येक वर्गखोली अध्ययन-अध्यापनाच्या साधनांनी परिपूर्ण असेल.' इत्यादी. या गोष्टीत कोणतीच गोष्ट अनाठायी नाही. खरे तर या अपेक्षा मुलांच्या प्राथमिक हक्काच्या आहेत. या गोष्टी स्वप्नवत् वाटाव्यात अशा पद्धतीने आपले शिक्षक मागताहेत, हे वाचून मन खजील होते. या सर्व मूलभूत सुविधाही अद्याप प्राथमिक शिक्षकांना मिळत नाहीत, हे वाचून मनात चीड निर्माण होते. देशातील बहुतांश शाळांच्या इमारती कोंदट, स्वच्छ प्रकाश नसलेल्या, अस्वच्छ, अडचणीच्या ठिकाणी बांधलेल्या आणि देखभाल न केलेल्याच आहेत. बसायला पुरेशी आणि योग्य जागा मिळणे, हेही स्वप्न असल्याचे वाचून मान लाजेने खाली जाते. या अपेक्षा म्हणजे नाकर्तेपणाचा कळस आणि आपणच केलेला आपला पराभव आहे. गावोगावी भव्य-दिव्य मंदिरे बांधली जाताहेत, त्यासाठी लाखोंच्या देणग्या लोक देताहेत; तर गावोगावच्या प्राथमिक शाळा मात्र बंद पडताहेत. पालकांना जिल्हा परिषदांच्या कोंदट, पडक्या इमारतीत आपल्या मुलांना पाठवायला लाज वाटू लागली आहे. या गोष्टीचा पुरेपूर फायदा खासगी शाळा घेत आहेत. शासनालाही या बाबतीत अंग झटकायचेच आहे.

या अपेक्षेमध्ये चांगल्या विचारांचे शिक्षक ही एक महत्त्वाची बाब आहे. हेच शिक्षकच काही चांगले करू शकतात, भव्य स्वप्न पाहू शकतात, नव्या कल्पना राबवू शकतात. परंतु, आज चांगले शिक्षक निर्माण करणारी यंत्रणा भ्रष्ट झाली आहे. ती एका गर्तेत अडकली आहे. तिच्यावरचे शासनाचे नियंत्रण सुटले आहे. या समस्येचे मूळ तेथे आहे. वशिल्याचे तट्टू आणि लाखोंची देणगी देऊन आलेले शिक्षक चांगली स्वप्नं बघू शकत नाहीत. असे शिक्षक बोगस डीएड, बीएड कॉलेजातील पदवीचा कागद विकत घेऊन व्यवस्थेत शिरले आहेत. हे महाभागच आज शिक्षण

संपवत आहेत. अधिकारी आणि राज्यकर्तेदेखील अशा महाविद्यालयांच्या वाढीला पोषक वातावरण तयार करत आहेत. थोड्याशा लालसेने त्यांचा गैरकारभार डोळ्यांआड करताहेत. यातून अंतिमत: अनेक पिढ्यांचे आणि देशाचे भवितव्य अंधकारमय होऊ लागले आहे, हे वास्तव ते विसरताहेत. हे पुस्तक अशा अनेक गोष्टी ऐरणीवर आणते आहे.

निसर्गशिक्षण, खेळ या गोष्टीही अलीकडे कालबाह्य होताहेत. गावाच्या सार्वजनिक जागा विकासाच्या नावाखाली बिल्डर हडप करताहेत. मुलांची क्रीडांगणे बळकावली जात आहेत. निसर्ग तर चित्रातच राहतो की काय, अशी स्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर गावोगावी मोकळी जागा हेही स्वप्नच बनले आहे. हे सर्व वाचताना अभय बंग यांचे 'माझी शाळा' हे पालक आणि मुलांसाठी लिहिलेले पुस्तक आठवते. या पुस्तकातील शिक्षणाचे प्रयोग गांधीजींच्या स्वप्नातील शाळा समजून घेण्यासाठी फार महत्त्वाचे आहेत. त्यांच्या 'नई तालीम'मधील अनेक प्रयोगच हे सर्व शिक्षक आपल्या अपेक्षा म्हणून व्यक्त करताहेत. मूल्यशिक्षण, वैज्ञानिक दृष्टिकोन, संवेदनशीलता, सहिष्णुता, विवेक, स्त्री-पुरुष समानता या गोष्टी शिक्षकांनाच नव्याने शिकवण्याची गरज निर्माण झाली आहे. त्याशिवाय या निबंधातून व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण होऊ शकणार नाहीत. पी.एस. पाटील या शिक्षकाने योगाभ्यास, सकारात्मकता, वेळोवेळी प्रशिक्षणवर्ग, परिपाठ, गटचर्चा या गोष्टींची गरज अधोरेखित केली आहे. तर आनंदा आरेकरांनी शिक्षकांच्या वाचनावर बोट ठेवले आहे. शिक्षकांचे 'वाचन' ही शिक्षणातील मूलभूत गोष्ट आहे. त्यामुळे यावर अनेकांगी विचार होणे आवश्यकच आहे. कारण चांगले ग्रंथच शिक्षणाचा पाया मजबूत करतात. त्यामुळे सर्व शिक्षक वाचनाकडे वळले पाहिजेत. त्यांनी धरलेला अधिकचा व्यासंग विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मार्ग प्रशस्त करणारा असणार आहे. संध्या वास्करांनी अपेक्षिलेल्या अनेक गोष्टींमध्ये 'निर्णयप्रक्रियेत विद्यार्थ्यांचा सहभाग असावा' ही महत्त्वाची गोष्ट सांगितली आहे. ही कल्पना वाचताना गो.ना. मुनघाटे यांची 'माझी काटेमुंढरीची शाळा' ही शिक्षणप्रयोगाचे प्रारूप ठरावी अशी कादंबरी आठवते. या कादंबरीत आदिवासी मुलांच्या कल्पना गुरुजी ऐकतात. त्यांच्या अचाट कल्पना सत्यात आणतात आणि स्वत: ज्ञानसमृद्ध बनतात. या आदिवासी मुलांचे ज्ञान पाहून ते थक्क होतात. मुलं म्हणतात- झाडाखाली शाळा भरवू, नदीकाठी भरवू, एक दिवस डोंगरावर शाळा नेऊ. गुरुजी मुलांचे ऐकतात. मुलांच्या निर्णयांची कदर करतात. त्यामुळे मुलंही आनंदी होतात. त्यांना शाळा, गुरुजी आणि शिक्षण आपले वाटू लागते. त्यामुळे वास्करांची ही कल्पना फार महत्त्वाची आहे. मुलांच्या सहभागातून त्यांच्या आवडी-निवडीचे कल तपासता येतील. त्यांना कोणत्या विषयात गती आहे, ते जाणता येईल. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला, मताला योग्य किंमत दिली गेली पाहिजे. त्यांच्यावर आपल्या गोष्टी सतत लादत राहण्यापेक्षा त्यांचेही ऐकले पाहिजे. त्याशिवाय शेतीशिक्षणाचे धडे हे मूल्यशिक्षणाचा भाग समजले आहेत. नवी पिढी शेतीपासून तुटू न देण्यासाठी हे फार आवश्यक आणि आश्वासकही आहे. त्यांनी पालात राहणाऱ्या श्रमकरी वर्गाच्या मांडलेल्या शिक्षणसमस्याही भारतीय समाजशास्त्र समजून घेण्यासाठी फार महत्त्वाच्या आहेत.

बाजीराव पाटील, श्रीकांत माणगावकर यांनीही काही मूल्यं सांगून आपल्या अनुभवांच्या आधारे सांगितलेले प्रयोग विचारप्रवृत्त करणारे आहेत. त्यांच्या विचारांमध्ये विद्यार्थिकेंद्री शिक्षणाच्या कल्पना आहेत. विद्यार्थ्यांची भावना जपत केलेले प्रयोग नक्कीच शिक्षणाची गोडी वाढवणारे असतील, यात शंका नाही. राजेंद्र शिंदे यांनी दिव्यांग-अपंग मुलांना आपल्याच शाळेत, परंतु विशेष सुविधा देऊन आणि त्यांची सर्वस्वी काळजी वाहणाऱ्या आईची मदत घेऊन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे स्वप्न पाहिले आहे. ही मातृहृदयी शाळेची कल्पना म्हणजे मोठाच मानवतावादी विचार आहे. संजय नानंग आणि सचिन देसाई यांनी इतर शिक्षकांप्रमाणे अनेक प्रयोग सांगत खासगी इंग्रजी शाळांना तोंड देण्यासाठी आपल्या मुलांना परकीय भाषा शिक्षणाचे महत्त्व सांगितले आहे. थोड्याशा परिश्रमाने आपली मुले इंग्रजीसारखी भाषा कशी शिकतील, त्यासाठी काय प्रयत्न अपेक्षित आहेत, हे सुचवले आहे. सागर मोरे यांनी विद्यार्थांच्या नजरेतून शिक्षकांनी जग पाहण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले आहे. त्यासाठी शिक्षक निरंतर शिकणारा हवा. त्याचे वाचन चतुरस्र हवे. तो स्वप्रज्ञ असावा. त्याला स्वत:ची दृष्टी असावी. स्वत:ची मते हवीत. त्याबरोबर त्याचे चारित्र्य सदाचारी, सदाशयी हवे- असे सांगत आता अभ्यासक्रम पारंपरिक पद्धतीने शिकवण्याचे दिवस संपले

असल्याचे सांगितले आहे. त्यासाठी नव्या तंत्रज्ञानाची गरजही त्यांनी अधोरेखित केली आहे.

ज्योती चौगले आपल्या कल्पनेतील शिक्षण सांगताना कृतिशील स्वयंशिक्षणाचे महत्त्व सांगतात. मुले अनेक गोष्टी करून पाहतात, स्वत: अनुभव घेतात; पण हे सारे शाळेच्या चार भिंतींत अशक्य असल्याची खंत त्या व्यक्त करतात. त्यासाठी शाळेबाहेरच्या आणि कौशल्यविकासाच्या शिक्षणाची गरज त्या अधोरेखित करतात. तर भगवान मुंढे आपल्या कल्पनेतील शाळेत परिसरस्वच्छता, परसबाग, सूतकताई, स्वयंपाक, समाजसेवा, कार्यानुभव या उपक्रमांना महत्त्व देतात. त्यांना केवळ पुस्तकी शिक्षण नको आहे. हे करत त्यांना चुकीचे इंग्रजी शिकवणाऱ्या खासगी इंग्रजी शाळांशी सकारात्मक स्पर्धा निर्माण करायची आहे. आपले विद्यार्थी चंगळवादाला बळी पडू नयेत, याची त्यांना काळजी घ्यायची आहे. नितीन देसाई यांनाही असेच काही प्रयोग करायचे आहेत. त्यासाठी प्रसंगी पाठ्यपुस्तके गुंडाळून ठेवण्याचे धाडस दाखवण्याची त्यांची तयारी आहे. त्यांना गोष्टी, गाणी, नाटके, चित्रपटांची रेलचेल वर्गात हवी आहे. मुलांचा गळून पडलेला ‘श्रवण’ हा टप्पा त्यांना मजबूत करायचा आहे. देसाईंसमोर लीलाताई पाटील यांच्या शाळा आदर्श शिक्षणाचे मॉडेल म्हणून आहेत.

नव्या स्पर्धेच्या युगात ताणतणावांना दूर करण्यासाठी शाळांमध्ये वाचनसंस्कृतीची रुजवात करण्याचे स्वप्न संजय शिंदे बघताहेत. त्यासाठी विद्यार्थांना ते ‘एक तास वाचनासाठी’ हा उपक्रम राबण्याची कल्पना सांगताहेत. आज विद्यार्थ्यांपेक्षा पालक तणावाखाली आहेत. त्यांच्यासाठी ते वाचनालयात पालक विभाग कल्पिताहेत. त्यांच्या आदर्श वाचनालयात शिक्षक, पालक आणि विद्यार्थी असे विभाग असतील. तर, कृष्णा कोटकर हे गुणांची सूज व फुगवटा कमी करण्यासाठी काही कल्पना सांगताहेत. त्यासाठी ‘घोका आणि ओका’ आणि खासगी क्लास प्रवृत्तीवर ते नेमकेपणाने भाष्य करतात. मुलांच्या सर्जनशीलतेला आणि मानसिकतेला ते विशेष महत्त्व देताहेत. शेवटच्या निबंधात विठ्ठल कोळीही मुलांच्या मेंदूशी मैत्री करण्याची भन्नाट कल्पना सांगताहेत. ते राजर्षी शाहू आणि साने गुरुजींच्या स्वप्नातील आनंददायी विद्यार्थी घडवू इच्छिताहेत.

प्रस्तुत पुस्तकाच्या दुसऱ्या भागात पुस्तकात समाविष्ट न केलेल्या निबंधावर संपादकांनी दीर्घ चर्चा केली आहे. त्यामध्ये शिक्षण हे व्यक्तीला सुजाण नागरिक बनवण्यासाठी आणि जात, धर्म, पंथ, लिंग भेद, अज्ञान, अंधश्रद्धांपासून दूर ठेवण्यासाठी दिले पाहिजे, अशा कल्पना सांगितल्या आहेत. शिक्षणामुळे आत्मविश्वास वाढतो. माणूस जीवनातील समस्यांना निर्भयपणे तोंड देतो. श्रमाला प्रतिष्ठा देतो. विवेकी बनतो. त्यासाठी योग्य ते प्रयोग करण्याची आवश्यकता येथे चर्चेत घेतली आहे. उर्वरित निबंधांची सांगोपांग चर्चा मेंगाणे यांनी केली असून शिक्षक, विद्यार्थी, पालक, शिक्षण, तंत्रज्ञान, प्रशासन, विद्यार्थी मूल्यमापन प्रक्रिया, मानवी मूल्ये, राष्ट्रपुरुषांचे विचार अशा अनेक गोष्टी केंद्रवर्ती ठेवून लिहिलेल्या निबंधांची केलेली सविस्तर चर्चा मुळातून वाचली पाहिजे.

एकूणच हे पुस्तक प्राथमिक शिक्षणाच्या– पर्यायाने देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी धडपडणाऱ्या शिक्षकांच्या माफक अपेक्षांचे, त्यांनी पाहिलेल्या स्वप्नांचेच संकलन आहे. या शिक्षकांची स्वप्ने सत्यात आणण्यासाठी पैशांपेक्षा इच्छाशक्तीची गरज आहे. त्यांनी मांडलेल्या अपेक्षा अवास्तव नाहीत, तर त्या विद्यार्थ्यांचे हक्क आहेत. जी मुलं उद्या देशाचे भवितव्य ठरवणार आहेत, त्यांच्यासाठी इतक्या माफक अपेक्षा पूर्ण करू न शकणाऱ्या देशाचे भविष्य नक्कीच अंधकारमय असेल. त्यासाठी या पुस्तकातील शिक्षकांच्या अपेक्षा नवे शिक्षण धोरण ठरवताना, अभ्यासक्रम रचताना आणि अगदी शाळांसाठी नव्या इमारती बांधतानाही विचारात घ्याव्यात इतक्या महत्त्वाच्या आहेत. या पुस्तकाची निर्मिती विषयाला साजेशी असून, मुखपृष्ठ, आतील रेखाटने, मांडणी आणि पुठ्ठाबांधणी आतील मूल्ययुक्त लेखनाला साजेशी आहे. शिक्षणाबद्दल अनास्था बळावत चाललेल्या या दिवसांत शिक्षणक्षेत्रानेच नाही, तर संपूर्ण समाजाने अशा पुस्तकाचे मन:पूर्वक स्वागत केले पाहिजे.

**डॉ. नंदकुमार मोरे,** कोल्हापूर
nandkumarvmore@gmail.com
Mob.9422628300
(प्राध्यापक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर)

**आमच्या कल्पनेतील प्राथमिक शिक्षण**
संपादक : दीपक मेंगाणे
दर्या प्रकाशन, पुणे
पृष्ठे : १५५, किंमत : रु. २५०

उर्दू कथा :

# लीला

**सागर सरहदी**

जेव्हा तो मेकअप उतरवून, केस पुसून,
तोंड धुऊन, आपले कपडे घालून घरी पोहोचला;
तेव्हा हैराण झाला. कारण घराचा दरवाजा उघडाच
होता. आणि त्याची आई कौसल्येप्रमाणे जमिनीवर
पडून रडत होती, ओरडत होती,
''रामाऽऽ तुझ्या सीतेचे हरण झालेऽ कुणी रावण
तिला उचलून घेऊन गेलाऽऽ!''
लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते. गल्ली सुनसान होती.
आयाबाया घराच्या बाहेर आल्या होत्या. म्हाताऱ्या
बायका त्याच्याकडे पाहत होत्या. जणू त्यांचा राम
वनवासाला निघालाय आणि तो तर कधीचाच
वस्तीमध्ये राहून वनवास भोगत होता.
तो राम नव्हता... त्याची बायको सीता नव्हती...
तो माणूस रावण नव्हता... आणि त्याच्या समोर
कोणतीही लंका नव्हती, जी ज्याला जिंकायची
होती. होते फक्त निरर्थक आयुष्य. त्या आयुष्याचा
कोणताही शेवट नव्हता.

रामाची रथयात्रा निघाली, तेव्हादेखील ती दर्शन घेण्याकरता लोकांबरोबर रस्त्यावर आली. रामाचा रथ पूर्णपणे परंपरेनुसार सजवला गेला होता. घोड्याच्या गळ्यात नकली चांदीचे हार होते. राम-लक्ष्मण आणि सीता हे पुष्पहार गळ्यात घालून अयोध्येला परतत होते. रामाच्या चेहऱ्यावर तेज होते... मोठ-मोठे मायाळू डोळे, जणू शांत सागर... कमलनयन, ओठांवर हास्याची लकेर, चाफेकळी नाक, केस मागे बांधलेले... आपल्या प्रजेला दर्शन देत ते रथातून पुढे-पुढे जात होते. दर वर्षीप्रमाणे ही वस्ती अयोध्यानगरी बनली होती. तेथील रहिवासी आपल्या प्रिय रामाचे दर्शन घेण्यासाठी कामधाम सोडून दोन्ही बाजूने रांगेत उभे होते. बराचशा महिला आपली आस्था प्रकट करीत रामाच्या पायाला हात लावून नमस्कार करीत होत्या. एक म्हातारी स्त्री तर सद्गदित होऊन त्यांच्या पायावर झुकली. तिच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. जणू ती प्रत्यक्ष रामाचे दर्शन करून ह्या मृत्युलोकातून मुक्त झाली होती. एकंदर असे वातावरण होते. विश्वासाची गंगा वाहत होती. आकाश घोषणांनी दुमदुमले होते. 'सिया राम की जयऽऽ' लोक मुग्ध होते... त्या वातावरणात हरवून जाऊन पुष्पादेखील पुढे झाली आणि तिने रामाच्या पावलांना स्पर्श केला. एक क्षणभर ती विसरली की- जो माणूस रामाची भूमिका करतो आहे, तो तिचा पती आहे. या अशक्य घटनेकडे तिच्या पतीनेदेखील चमकून पाहिले होते. दोघांची नजरानजर झाली. जे घडले होते, त्यामुळे दोघेही घाबरले. या घटनेच्या मागे- या छोट्याशा घटनेमागे- किती तरी घटना आहेत... खरे तर ही घटना पुष्पाच्या नकळत घडलेली होती... पण दोघांनाही जाणवले की, कुठे तरी काही तरी तुटलेय... कुठे तरी फास बसलाय.

पुष्पाला मिळवण्यासाठी जगदीशने राजा जनकाच्या दरबारात शिवधनुष्य तोडले नव्हते. पण जीवनाच्या रणामध्ये त्याला जो संघर्ष करावा लागला, लढाई करावी

लागली- ते सगळं स्वतः रामाने पाहिले असते, तर तो स्वयंवरासाठी तयार झाला नसता. ह्या आयुष्यात जगण्यासाठी किती मारावे लागते, किती दु:खं झेलावी लागतात... आज कोणत्याही देवाला त्याचा अंदाज बांधता येणार नाही. हे माणसाचे नशीब आहे की, त्याला हे सगळे सोसावेच लागते. फाळणीनंतरचे दिवस होते. जगदीश आपली आई आणि दोन बहिणी ह्यांच्याबरोबर रिफ्युजी कॅम्पमध्ये एका बराकीत राहत होता. वडील देवाघरी गेले होते आणि घरात तो एकच पुरुष होता. आईवर त्याचे खूप प्रेम होते. त्याच्या आयुष्याच्या केंद्रस्थानी आईच होती. जगदीशचे शरीर धष्टपुष्ट होते. सहा फूट उंच... आई त्याला आपल्या समोरच बसवून जेवण भरवत होती, जशी ती आपल्या पतीला देत असे. आपल्या मुलींपासून वाचवून, आपण न पिता, बहुतेक वेळा स्वतः उपाशी राहून ती त्याला एक पेला दूध देत असे. अर्ध्या ग्लास दुधाचे दही बनवत असे. जगदीश जितका आईवर प्रेम करीत असे, तितकाच तिला घाबरतदेखील असे. त्या वेळी त्याचे सहा फुटी शरीर त्याला साथ देत नसे. धष्टपुष्ट शरीर दबकून लहान होत असे. एकदा तो कुठून तरी दारू पिऊन बराकीत आला होता, तेव्हा आईने त्याला काठीने मारून-मारून त्याचे शरीर रक्तबंबाळ केले होते. त्याची दारू उतरवली होती. सगळ्या गल्लीने पाहिले होते की, तो रडतो आहे, क्षमायाचना करतो आहे, मार खातो आहे. आईने त्याला इतके मारले होते की- ती त्याच्या जखमांना हळद गरम करून आपल्या हाताने दहा दिवस लावत होती. जखमा शेकत होती. जगदीशने त्यानंतर दारूला स्पर्श केला नव्हता.

जगदीश एखाद्या घोड्यासारखा राबत होता. कॉलेजमधून परतल्यावर तो दहा-दहा, पंधरा-पंधरा रुपयांच्या ट्युशन घेऊन कुटुंबासाठी धान्य खरेदी करे. आपल्या दोन बहिणींच्या शाळेचा खर्च भागवत असे. काहीच दिवसांनंतर तो आपल्या कुणा दूरच्या भावाच्या शिफारशीवरून एका बँकेत नोकरीला लागला. मग तो प्रायव्हेट कॉलेजमध्ये जाऊ लागला. दिवसा नोकरी करे, रात्री शिकायला जाई. मग कॉलेजची परीक्षा डोक्यावर आली की, त्याची तयारी करे.

एके दिवशी त्याची आई नेहमीप्रमाणे स्वयंपाकघरात बसवून त्याला जेवण वाढत होती. एक बहीण त्याला वारा घालत होती. आई त्याच्याकडे पाहता-पाहता अचानक रडू लागली. जगदीशने जेवण थांबवले आणि तिला रडण्याचे कारण विचारू लागला. त्याने विचारल्यावर तर आई धाय मोकलून रडू लागली. जगदीश विचारत राहिला आणि ती रडत राहिली. जगदीशने जेवणाच्या प्लेट्स तोडल्या, मातीचा घडा फोडला, आपले डोके तो भिंतीवर आपटू लागला. गर्दी जमा झाली, तेव्हा आई हुंदके देत म्हणाली, ''माझ्या मुलाच्या सोन्यासारख्या शरीराची माती झाली. हाय... मी त्याला इतक्या कष्टाने वाढवले, राजकुमार बनवले होते... जगाने त्याचे रूपच बिघडवले आहे!''

त्या दिवशी जगदीश स्वतःविषयी विचार करू लागला. त्या क्षणानंतर त्याला आपल्या अस्तित्वाची जाणीव झाली. आई रडल्यानंतर तो ही खूप रडला. आईच्या त्या वाक्यावर त्याने लक्ष केंद्रित केले. त्याच्या रक्तात, रक्ताच्या एकेका थेंबात ते वाक्य सळसळत राहिले. त्या एका वाक्याने त्याचे आयुष्य बदलले. या एका वाक्यासाठी त्याने आईशी असलेले त्याचे नाते तोडले. आता तो लाडाने आपल्या आईच्या मांडीवर डोके ठेवत नसे. आता तो हसून आईच्या गळ्यात पडत नसे. आता तो आईशी चेष्टा-मस्करी करीत नसे.

त्याने आपला चेहरा आरशात पाहिला. तो त्या चेहऱ्याशी आपली ओळख वाढवण्याचा प्रयत्न करू लागला. हा अनोळखी चेहरा त्याच्या खांद्यावर ठेवला गेला होता. तो त्याचे बदलते हावभाव पाहत राहिला. कानशिलापाशी आलेले पांढरे केस मोजत राहिला. डोळ्यांच्या खाली आलेल्या सुरकुत्या मोजत राहिला. त्याला स्वतःविषयीच द्वेष वाटू लागला. आपल्या कामाविषयी घृणा वाटू लागली. सूर्याविषयी घृणा वाटू लागली... जो दररोज त्याच्या उशाला येऊन त्याला उठवतो. रात्रीविषयी राग येऊ लागला- ज्या रात्रीने त्याला एकटेपणा बहाल केला होता, त्याची झोप गायब केली होती. त्याला दिवसाची घृणा वाटू लागली, जो नवीन तगादे घेऊन येतो, त्याला नव्या तडजोडी करायला भाग पाडतो... त्याच वेळी त्याच्या आयुष्यात पुष्पा दाखल झाली.

पुष्पा खात्या-पित्या घरात वाढली होती. रिफ्युजी तर तीदेखील होती. पण तिच्या आई-वडिलांनी पळून येताना बरोबर पैसे आणि दागिने आणले होते. त्या काळात नवरा मिळणे अवघड होते. कुणीही जबाबदारी घ्यायला तयार नव्हते. दहशतीचे वातावरण होते. पण पुष्पा सुंदर होती. हसतमुख होती. कामकाजात हुशार होती. मैत्रिणींमध्ये ती

राजहंसासारखी वावरत असे. गल्लीमध्ये हरिणीसारखी धावत असे. तिच्या घरच्यांनी हुंडा वगैरे देऊन, एक फ्लॅट देऊन तिचे लग्न लावून दिले होते. पुष्पाला पाहून, तिच्याशी लग्न करून जगदीशला आयुष्य जगण्यासाठी एक कारण मिळाले होते. कदाचित याच्या आधारानेच तो आपले निरर्थक आयुष्य जगू शकणार होता. तो पुष्पावर मोहित झाला होता. तिला खूश ठेवण्याचे त्याने ठरवले.

आता तो बँकेच्या परीक्षा देण्यात गुंतला. एकानंतर एक पायऱ्या चढत गेला. दिवसा बँकेतील काम, रात्री परीक्षेसाठी दिव्याच्या प्रकाशात अभ्यास करू लागला. आता त्याच्या कानांजवळचे केस पांढरे झाले होते. डोळ्यांभोवती काळी वर्तुळे झाली होती.

जीवनात हळूहळू धुके पसरू लागलेय याचा त्याला अंदाजच आला नाही. त्याला माणूस ओळखू येईना. कशातच त्याला अर्थ वाटेनासा झाला. गोष्टी विस्कटून जाऊ लागल्या. संबंध तुटत चालले. मनात काही रेशमी धागे आहेत, पण ते तुटत आहेत... त्यांचा तुटण्याचा आवाज असा येतोय की, जणू बॉम्ब फुटताहेत! हे काय होतेय की, तो ज्या खुर्चीवर बसलाय त्या खुर्चीशी त्याचा काही संबंध नाहीये. आरशात तो त्याच्या चेहरा पाहतोय, पण तो चेहरा त्याचा नाहीये. मग दिवसरात्र मेहनत त्याने कशासाठी केली? आपल्या एका बहिणीचे लग्न, मग दुसरीचे... आणि मग अशा प्रकारे नट बनून मदाऱ्यासारखे दोरीवरून चालणे... तो चक्रावला. पुष्पाला खूश ठेवण्याऐवजी तिच्यामध्ये आणि त्याच्यामध्ये एक दरी उत्पन्न झाली... आणि तो ज्या दिवशी डिपार्टमेंटचा इनचार्ज झाला, तेव्हा त्याला कामाबद्दल विरक्ती निर्माण झाली. तो आयुष्यापासून पळू लागला.

मग त्याने रामाची भूमिका केली. कानापाशी असलेले पांढरे केस काळे केले. डोळ्यांत काजळ घालून डोळे मोठे केले. ओठांवर हलकेसे हास्य... आणि जेव्हा तो धनुष्य घेऊन रथावर बसला, तेव्हा वस्तीतील लोकांना वाटले की, साक्षात राम प्रकट झाले आहेत! डोळ्यांत वैराग्य सुरुवातीपासूनच होते, आयुष्याची विरक्तीही होती. अर्धचंद्रासारखे हास्य स्वत:च एका पक्ष्याप्रमाणे त्याच्या ओठांवर येऊन बसले होते. आता रामाच्या चित्रात रंग भरला गेला होता. जगदीशने बाहेरील जगाशी संबंध तोडून अंतर्गत जगाशी संबंध जोडले होते. वास्तविक, जीवनाला वैतागून बनावटी जीवन त्याने आपलेसे केले होते. नाटकातील जादूमय जग त्याला आपलेसे वाटू लागले होते.

प्रत्येक वर्षी रामाचा रथ निघतो. प्रत्येक वर्षी गर्दी त्याच्या पाया पडते. प्रत्येक वर्षी आकाश दुमदुमते. आता जगदीश रस्त्यावरून जाताना त्याची नजर लोकांच्या चेहऱ्यांमधून आरपार जाते. कधी कधी लोक नमस्कार करण्यासाठी उठत. म्हाताऱ्या बायका तर सद्‌गदित होऊन त्याला भेटत आणि आशीर्वाद देत. जगदीशने आपल्या चेहऱ्याभोवती एक संरक्षण कवच तयार केले होते. ते आता कुणीही तोडू शकत नव्हते.

जेव्हा तो मेकअप उतरवून, केस पुसून, तोंड धुऊन, आपले कपडे घालून घरी पोहोचला; तेव्हा हैराण झाला. कारण घराचा दरवाजा उघडाच होता. आणि त्याची आई कौसल्येप्रमाणे जमिनीवर पडून रडत होती, ओरडत होती. ‘‘रामाऽऽ तुझ्या सीतेचे हरण झालेऽ कुणी रावण तिला उचलून घेऊन गेलाऽऽ!’’

लोकांच्या डोळ्यांत अश्रू होते. गल्ली सुनसान होती. आयाबाया घराच्या बाहेर आल्या होत्या. म्हाताऱ्या बायका त्याच्याकडे पाहत होत्या. जणू त्यांचा राम वनवासाला निघालाय आणि तो तर कधीचाच वस्तीमध्ये राहून वनवास भोगत होता.

तो राम नव्हता... त्याची बायको सीता नव्हती... तो माणूस रावण नव्हता...

आणि त्याच्या समोर कोणतीही लंका नव्हती, जी ज्याला जिंकायची होती. होते फक्त निरर्थक आयुष्य. त्या आयुष्याचा कोणताही शेवट नव्हता.

मराठी अनुवाद : **चंद्रकांत भोंजाळ,** मुंबई ५८.
Mob. 9867812898

---

गंगासागर तलवार नावाचा तरुण भारताची फाळणी झाल्यावर वायव्य सरहद्द प्रांतातून मुंबईत आला, पुढे ‘सागर सरहद्दी’ या नावाने लेखन करू लागला. कभी कभी, सिलसिला, चांदनी व अन्य चित्रपटांच्या पटकथा वा संवाद त्यांच्या नावावर आहेत. बाजार या हिंदी सिनेमाचे दिग्दर्शनही त्यांनी केले. मागील आठवड्यात वयाच्या ८८ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यानिमित्ताने, त्यांच्या एका कथेचा अनुवाद येथे प्रसिद्ध करीत आहोत.

– संपादक

डॉ. अभय बंग

# महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाला खुले पत्र
# चंद्रपूर जिल्हा दारूबंदी : खरी समस्या व उपाय

चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदीबाबत राज्य शासनाने नियुक्त केलेल्या श्री.झा (माजी उत्पादनशुल्क सचिव) यांच्या समितीचा अहवाल शासनाला नुकताच सादर झाला आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी उठवण्याची घाई काही राजकीय नेत्यांना झाली आहे. हा प्रश्न लवकरच मंत्रिमंडळासमोर येईल. मी राज्य मंत्रिमंडळाला या पत्राद्वारे सरळ आवाहन करतो आहे.

१. चंद्रपूर जिल्ह्याचा मूळ प्रश्न दारूचा अतिरेक हा आहे, दारूबंदी हा प्रश्न नाही. दारूचा मूळ प्रश्न सोडून दारूबंदीलाच समस्या म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे व शिक्षा देणे, ही पद्धतशीर दिशाभूल आहे. मूळ प्रश्न सोडवा.

२. चंद्रपूर जिल्ह्यातील जनतेवर दारूचे ओझे असहनीय पातळीला पोचले होते. सन २०११ मध्ये कायदेशीर व अवैध मिळून एकूण अंदाजित १००० कोटी रुपयांची दारू दर वर्षी सेवन केली जात होती. (२०,००० रु. प्रति कुटुंब)

३. चंद्रपूर जिल्ह्यात दारूविरुद्ध व्यापक जनभावना, दारूमुळे त्रस्त स्त्रिया, त्यांचे आंदोलन, तसेच ५८५ ग्रामपंचायती व जिल्हा परिषद या सांविधानिक संस्थांच्या प्रस्तावांमुळे आणि राज्य शासनाने नेमलेल्या श्री.देवतळे समितीच्या शिफारशींनुसार २०१५ मध्ये दारूबंदी लागू झाली.

४. दारू दुकाने बंद झालीत, पण जिल्ह्यातील दारू पिणारे पुरुष दारू शोधत होते. त्यांना व्यसनमुक्त करण्याची व्यवस्था झाली नाही. शासनाद्वारे दारूबंदीच्या अंमलबजावणीसाठी कोणतेही विशेष नियोजन किंवा प्रयत्न करण्यात आले नाहीत. अवैध दारूपुरवठा थांबवण्यासाठी मनुष्यबळ अथवा आर्थिक मदत देण्यात आली नाही. त्यामुळे अवैध दारूपुरवठा सुरू राहिला.

५. तरीदेखील दारूबंदीनंतर दारू पिण्याचे प्रमाण पूर्वीपेक्षा एका वर्षात एक–तृतीयांशाने कमी झाले. (२०१६ जिल्हा सँपल सर्वेक्षण) उरलेली दोन–तृतीयांश दारू आता अवैध होती.

६. दारूबंदीच्या अपुऱ्या, कमकुवत अंमलबजावणीने जनतेचा– विशेषत: स्त्रियांचा अपेक्षाभंग झाला. तो क्रोध निवडणुकीत प्रगटही झाला.

७. नवे पालकमंत्री आणि नवे खासदार (पूर्वाश्रमीचे दारू दुकानदार) यांनी राज्य शासनाच्या दारूबंदीच्या निर्णयाची अधिक चांगली अंमलबजावणी करण्याऐवजी दारूबंदी उठविण्याचा व वार्षिक १५००–२००० कोटी रुपयांचे दारूसाम्राज्य निर्माण करण्याचा विडा उचलला आहे, असे दिसते.

८. पालकमंत्री श्री.वडेट्टीवार यांनी ‘दारूबंदी उठवा’ अशी मागणी करून मग दारूबंदी निर्णयाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी समिती नेमली. जिल्हाधिकारी श्री.खेमणारांच्या अध्यक्षतेखाली अधिकाऱ्यांच्या समितीने २०२० मध्ये स्वत:च्या कमजोर अंमलबजावणीचा आढावा घेण्याऐवजी जणू राज्य शासनाच्या नीतीविरुद्ध आढावा घेतला. हा हास्यास्पद प्रकार म्हणजे वस्तुत: राज्य शासनाचा अवमान होता.

९. जिल्हाधिकारी समितीने शासकीय दारूबंदीविरुद्ध जणू जनमत प्रकट होण्यासाठी निवेदने मागविली. ही माहिती गोपनीय

ठेवण्याऐवजी पालकमंत्री श्री.वडेट्टीवार रोज दारूबंदीविरुद्ध निवेदनांचा आकडा जाहीर करत होते. अनेक जागी दारू पिणाऱ्या पुरुषांच्या सह्या अवैध खर्रा विकणाऱ्या पानठेल्यांवर गोळा करण्यात आल्या. २,२५,००० लोकांना दारूबंदी नको, असे चित्र उभे केले. यातून एक प्रकारे जिल्ह्यातील तळीरामांचा आकडा मिळाला. ही संख्या व समस्या किती मोठी झाली आहे, हे त्यातून कळते. याचा दुसरा अर्थ, जिल्ह्यातील ८५ टक्के वयस्कांनी (१४ लाख) याला सहमती दिली नाही. राज्य शासनाच्या नियमानुसार एखाद्या गावात असलेले दारू दुकान बंद करायला गावातील किमान ५० टक्के वयस्कांचे मत प्रकट व्हावे लागते. चंद्रपूरमधील दारूबंदी उठवायला तेवढी मते मिळू शकली नाहीत. केवळ १५ टक्क्यांना दारूबंदी नको.

१०. दारूबंदीमुळे कोणत्याही भागातली दारू ४० टक्के कमी होते, असा भारतातील सहा राज्यांतील दारूबंदीचा निष्कर्ष आहे. (अमेरिकन इकॉ. रिव्ह्यू). म्हणजे दारूची समस्या सोडवण्यासाठी दारूबंदी आवश्यक हे पहिले पाऊल आहे, पण पुरेसे नाही.

११. दारूबंदीच्या अपुऱ्या अंमलबजावणीवर योग्य उपाय प्रभावी अंमलबजावणी हा आहे. १०० टक्के यशस्वी झाली नाही म्हणून दारूबंदीचा शासकीय निर्णय बदल करण्याचा पायंडा पाडल्यास राज्यातील तंबाखूबंदी, प्लॅस्टिकबंदी, भ्रष्टाचारबंदी, अंधश्रद्धा, बलात्कार व दलित अत्याचार विरोधी कायदे, इन्कम टॅक्स व कोरोना प्रतिबंधक उपाय- सर्वच रद्द करावे लागतील. सर्वच अपूर्ण यशस्वी आहेत.

१२. चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी उठविल्यास खालील दुष्परिणाम होतील.

जिल्ह्यातील ५० टक्के पुरुष (चार ते पाच लाख) दारू प्यायला लागतील (WHO- २०२०), त्यापैकी ६०,००० ते ८०,००० पुरुष व्यसनी बनतील.

जिल्ह्यातील जनतेचे वर्षाला अंदाजित २,००० कोटी रुपये दारूवर खर्च होतील. हा पैसा जिल्ह्याच्या एकूण नियोजन व विकास निधीपेक्षा अधिक राहील. यातून शासनाला वैध दारूवर वर्षाला २०० कोटींचा कर मिळेल, पण त्यासाठी जनतेला २००० कोटींचा भुर्दंड बसेल. उर्वरित पैसा कुणा-कुणाच्या तिजोरीत जाईल?

जिल्ह्यातील स्त्रियांविरुद्ध दर वर्षी ९०,००० हिंसेच्या/अत्याचाराच्या घटना घडतील (अमेरिकन इकॉ. रिव्ह्यू), ही भयावह स्थिती होईल. दारूबंदी असलेल्या शेजारच्या वर्धा व गडचिरोली जिल्ह्यात चंद्रपूरहून अवैध दारूचा पुरवठा वाढेल.

या तिन्ही जिल्ह्यांतील अंदाजित एकूण आठ लाख आदिवासींचे व सोळा लाख स्त्रियांचे जीवन उद्ध्वस्त होण्याचा धोका निर्माण होईल.

हा धोका ओळखून गडचिरोली जिल्ह्यातील १०५० गावांतील लोकांनी प्रस्ताव पारित केला आहे की- गडचिरोलीत तर दारूबंदी हवीच, पण चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदीदेखील उठवू नये; मजबूत अंमलबजावणी करावी.

१३. महाराष्ट्र राज्य शासनाच्या दारू-तंबाखू नियंत्रण टास्क फोर्सअंतर्गत गडचिरोली जिल्ह्यात गेली चार वर्षे सुरू असलेल्या 'मुक्तिपथ' पथदर्शी प्रकल्पात असे आढळले की, जिल्ह्यातली एकूण दारू ६५-७० टक्के कमी झाली. त्यासाठी अमलात आणलेला चार कलमी कार्यक्रम आहे : १. शासनाद्वारे प्रभावी अंमलबजावणी, २. व्यापक जनजागृती, ३. गावा-गावात दारूविरुद्ध सक्रिय ग्रामसंघटन, ४. व्यसनांचा उपचार.

१४. चंद्रपूर जिल्ह्याच्या आंशिक प्रभावी दारूबंदीसाठी उपाय काय?

२०१९ मध्ये तत्कालीन मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली सहा मंत्री व सहा सचिवांच्या राज्यस्तरीय टास्क फोर्सने निर्णय घेतला आहे की, गडचिरोलीचा दारू-तंबाखू नियंत्रण यशस्वी पॅटर्न शेजारी दारूबंदी असलेल्या चंद्रपूर व वर्धा जिल्ह्यांमध्येही लागू करावा. तो निर्णय प्रभावीरीत्या अमलात आणणे, हा चंद्रपूर जिल्ह्यासाठी योग्य उपाय आहे.

महाराष्ट्र शासनाला विनंती व कळकळीचे आवाहन आहे की- चंद्रपूर जिल्ह्यातील दारूबंदी उठवू नये, उलट आजवर न केलेली अंमलबजावणी कडेकोट करावी. त्यासाठी गडचिरोलीत प्रभावी झालेला पॅटर्न अमलात आणावा.

महाराष्ट्रात कोरोना पुन्हा पसरण्याचा गंभीर धोका असताना तो प्रश्न सोडविण्याऐवजी 'दारूबंदी'ला प्रश्न बनवून दारूचा मूळ प्रश्न परत आणल्याने कोणाचे भले होणार आहे?

**डॉ. अभय बंग,** गडचिरोली
search.gad@gmail.com

## विकासाच्या सागरात नौकाविहार करणाऱ्यांना वाढत्या विषमतेची जाणीव नाही

दि. २० मार्चच्या साधनामध्ये संतोष दास्ताने यांचा 'विषमतेचा विषाणू' हा लेख वाचला. 'ऑक्सफॅम' या स्वयंसेवी संस्थेने प्रसिद्ध केलेल्या 'असमानतेचा विषाणू' या अहवालातील वास्तव अस्वस्थ करणारे आहे. एका बाजूला कोरोनामुळे टाळेबंदीच्या काळात देशातील सर्वसामान्य जनतेची अवस्था भुकेकंगाल झाली, तर अब्जावधींच्या सांपत्तिक स्थितीत ३५ टक्क्यांची वाढ नोंदवली गेली. या काळात ८४ टक्के कुटुंबांना आपले रोजगार गमावल्यामुळे आर्थिक सामना करावा लागला. एप्रिल महिन्यात दर तासाला १ लाख ७० हजार नागरिकांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या. ऑक्सफॅमने देशातील आर्थिक विषमतेचे हे कटू वास्तव समोर आणून म्हटले आहे की, आघाडीचे अब्जाधीश आणि रिलायन्स इंडस्ट्रीजचे सर्वेसर्वा मुकेश अंबानी यांनी या काळात एका तासात जेवढी संपत्ती कमावली, तेवढी संपत्ती कमवायला एका अकुशल कामगाराला दहा हजार वर्षे लागतील; तर सर्वसामान्य काम कामगाराला तीन वर्षे लागतील.

भारतीय अर्थव्यवस्थेत ९० टक्क्यांहून अधिक वाटा असलेल्या असंघटित क्षेत्रातील कामगारांना टाळेबंदीची सर्वाधिक झळ सोसावी लागली असल्याकडे हा अहवाल अंगुलीनिर्देश करताना 'एकूण ११ कोटी २० लाख रोजगार गमवावे लागलेल्यांपैकी ९ कोटी ३० लाख रोजगार असंघटित क्षेत्राशी संबंधित आहेत' असे नमूद केले आहे. एका बाजूला टाळेबंदीदरम्यान देशाचा विकासदर उणे २४ नोंदवला गेला; तर दुसरीकडे भारताने अब्जाधीशांच्या यादीत जागतिक पातळीवर अमेरिका, चीन, जर्मनी, फ्रान्स, रूस या देशांनंतर सहाव्या क्रमांकावर भरारी घेतली. दरम्यानच्या काळात भारतातील ११ प्रमुख अब्जाधीशांच्या सांपत्तिक स्थितीत एवढी वाढ नोंदवली आहे की, त्या पैशात देशातील मनरेगा तसेच आरोग्य मंत्रालयाशी संबंधित योजनांची पुढील एका दशकाची अर्थसंकल्पीय तरतूद होऊ शकेल. 'ऑक्सफॅम' संस्थेने जागतिक आर्थिक मंचाच्या परिषदेपूर्वी भारतातील एकूण लोकसंख्येपैकी निम्न स्तरावर ७० टक्के गरिबांकडे जेवढी संपत्ती आहे, त्याच्या चारपट अधिक संपत्ती देशातील एक टक्का धनाढ्यांकडे असल्याचा अहवाल प्रकाशित केला होता. तसेच देशाच्या वार्षिक अर्थसंकल्पाहून अधिक संपत्ती या धनाढ्यांकडे एकवटली असल्याचे म्हटले होते. हा अहवाल येथेच थांबलेला नव्हता, तर गरिब-श्रीमंत यांच्यातील दरी दूर व्हावी- आर्थिक असमानता नष्ट व्हावी, यासाठी जागतिक पातळीवर हाताच्या बोटांवर मोजता येतील एवढ्याच देशातील सरकारे प्रयत्न करत असल्याचे वास्तव त्यात मांडले होते. गरिबीनिर्मूलनाच्या बाता 'गरिबी हटाओ'पासून आपण ऐकत आलो आहोत; पण गरिबी काही हटत नाही, उलट ती आणखी घट्टपणे आपले पाय रोवताना दिसून येत आहे. वर्षाला साडेआठ लाख रुपये उत्पन्न असलेले आपल्याकडे आर्थिक गरीब म्हणून गणले जातात. गरिबी हटाओ असो, की आर्थिक पातळीवरील आरक्षण असो गरिबीकडे आपल्या राजकारण्यांकडून 'नव-राजकीय' मार्गांतूनच पाहिले जाते. देशातील जेमतेम दोन टक्के लोकांकडे नव्वद टक्के संपत्ती एकवटली असेल, तर गरिबांचे शोषण आणि गरिबीचे राजकीय भांडवल कोणत्या स्तराला गेले आहे याचा अंदाज यावा. आर्थिक सधन लोकांच्या उत्पन्नातील काही टक्के भाग गरीब-खालच्या स्तरांत झिरपणे हे आर्थिक विषमता दूर होण्यास मददगार ठरत असले तरी सधन उत्पन्न गट आपली सांपत्तिक पकड अधिक घट्ट करताना दिसत आहे. गरिबांची पिळवणूक करणे आणि धनाढ्यांची तळी उचलणे अशा अंगाची सरकारी धोरणे असल्याने गरिबांची दखल केवळ मतदार म्हणून घेतली जाते. त्यांचा असंतोष कमी करण्यासाठी गरिबांना देशहित, राष्ट्रवाद आदी अस्मितांची इंजेक्शने दिली जातात, हे आपण नोटाबंदीसारख्या निर्णयातून यापूर्वी अनुभवले आहेच. 'सब का साथ- सबका विकास' अशी घोषणा देणाऱ्या मोदी राजवटीत गरिबी अधिक पक्की झालेली दिसते. यूपीएच्या काळात देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यात कमालीचे यश आले, ४६ टक्क्यांवरून तब्बल १३ टक्क्यांवर आले असल्याचा उल्लेख जागतिक बँकेने आपल्या ताज्या अहवालात केला आहे. फोर्ब्सच्या मांडणीनुसार

२०१४ मध्ये देशातील सर्वांत धनाढ्य उद्योगपतींच्या क्रमवारीत २२ व्या स्थानी असलेले उद्योगपती गौतम अदानी २०२० सरताना दुसऱ्या क्रमांकावर पोहोचले. सरकारी धोरणे विशिष्ट उद्योगसमूहहितैषी असल्याखेरीज हे होऊ शकत नाही. यामागे सत्ताधाऱ्यांना विशिष्ट उद्योगसमूहांनी उपकृत केले नसेल तर उद्योगधार्जिणी आर्थिक धोरणे सत्ताधारी राबवत नाहीत, हे वास्तव आहे. प्रसारमाध्यमांत भारत आगामी काळात पाच लाख कोटी डॉलर्सची अर्थव्यवस्था बनणार, चीनला मागे टाकत भारत १० टक्के विकासदर नोंदवणार, भारत महासत्ता होणार... अशा आशयाच्या बातम्यांची सदैव रेलचेल असते. विकासाच्या सागरात मनमुराद नौकाविहार करणाऱ्यांना म्हणूनच कदाचित वाढत्या असमानतेच्या वास्तवतेची जाणीव नसावी.

**बाळकृष्ण शिंदे,** पुणे

## त्याची प्रतिक्रिया म्हणून विद्यमान सत्ताधाऱ्यांना पाठिंबा मिळतोय

दि.२० मार्चच्या अंकातील रामचंद्र गुहा यांचा लेख वाचला. त्यातील भारतात मुस्लिमांना दडपलं जाते आहे, हे रामचंद्र गुहा यांचे मत पटत नाही.

शाहबानो खटला व त्याअगोदरही काँग्रेसचे जे राजकारण होतं, त्याला प्रत्युत्तर म्हणून भाजप व रास्वसंघ यांचा प्रसार जास्त होऊ लागला. (तत्पूर्वी व आजही एकंदर मतांचे बहुमत त्यांच्याकडे नाही, हे स्पष्ट आहे.)

बऱ्याच मोठ्या भारतीय समाजाला (हिंदू व इतर), काँग्रेसचे व इतरांचेही तुष्टीकरणाचे राजकारण पसंत नसल्याने तसेच भाजप व संघपरिवार यांचे युक्तिवाद हळूहळू पटत गेले आहेत. म्हणजे भाजप व संघ यांना मोठं करण्यात भारतीय समाजाचा (हिंदू) हातभार लागलेला आहे. भारतीय हिंदू समाज हा कट्टरवादी नसल्याने किंवा चांगले सामाजिक बदल कमी गतीने का होईना स्वीकारत असल्याने, पूर्णपणे संघटित नसल्याने आतापर्यंत बहुतांश राजकीय पक्षांनी आपली स्वार्थी राजनीती चालू ठेवली. याची प्रतिक्रिया म्हणून विद्यमान सत्ताधाऱ्यांना पाठिंबा मिळतोय.

भारतात पंतप्रधानपद सोडल्यास नगरसेवक ते राष्ट्रपती सर्व पदे मुस्लिम समाजाला मिळाली व मिळत आहेत. सैन्यदलातही मोठी पदे त्यांनी भूषवली आहेत. अन्य क्षेत्रातही मुस्लिम नागरिकांनी (जे मुख्य प्रवाहात आहेत त्यांनी) त्यांच्या कर्तृत्वाने अनेक जागा मिळवल्या व मिळवत आहेत. एवढे घडत असूनही, मुस्लिमांना इथे दडपले जाते म्हणणे म्हणजे पुन्हा एकदा तुष्टीकरणधार्जिणे राबवण्यासारखे आहे, असे मला वाटते.

मुस्लिम समाजावर होत असलेल्या अन्याय व अत्याचाराच्या घटना रामचंद्र गुहा तपशीलवार सांगतात, पण मुस्लिम समाजातील काही लोकांकडून होत असलेल्या तशाच प्रकारच्या घटना त्यांना माहीतच नाहीत का? असतील माहीत, तर त्यावरही लिहावे त्यांनी. केवळ मुस्लिमांवर अत्याचार होणाऱ्या घटनाच (अर्थातच अत्यंत निषेधार्ह) त्यांना दिसत असतील, तर आश्चर्य आहे. हमीद दलवाईंना गौरवणाऱ्या गुहासाहेबांना दलवाईंनी काय लिहिलं आहे याचा विसर पडला आहे का?

**प्रसन्न देशपांडे,** युनायटेड अरब अमिराती

Editorial by Abhay Tilak (Sadhana 27 March). It is one of the best pieces on the subject of impact of Corona in india and the reasons therefore not only in Marathi but English too.

pl excuse me for writing in english as I am not v comfortable in writing in Marathi. It is short but very powerful piece and touching most aspects in a sharp manner. You have given justice to internal migration of workers (many skilled).

You have given a good justice to the broadly spoken concept of jobless growth and distorted urbanization .

It is true that Covid exposed huge weak spots in our economy and society. Unfortunately, our solutions are nowhere near the root of the problems so graphically explained by you.

I am urban, transport/housing economist and I find the situation and understanding by govt and most of busy and prospering elite need to grasp the sharp realities. You have brought out hope. We should have some debate on the possible solutions.

Thanks for providing very good insights alongwith very pithy analysis by Milind Bokil in the same issue of Sadhana. I dont have his email id but will locate him and respond.

I am sick of the webinars by bogus org like Mumbai first and the likes.

**Ashok Datar,** Mahim-400 016

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा/०४१७/प्र. क्र. २४७/मोघ-१ दिनांक ३०/११/२०१८

**प्रपत्र १**

**महाराष्ट्र शासन**

**जलसंपदा विभाग**

कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय
नवीन प्रशासकीय इमारत, डी विंग, पश्चिम बाजू, दुसरा मजला, पुणे ४११००१.
दूरध्वनी ०२०-२९७०५१६७ / ई-मेल : eepidpn@gmail.com
जलसंपदा विभागाच्या संकेतस्थळास कृपया भेट द्या. http://mahatenders.gov.in

**ई-निविदा सूचना क्रमांक ५९ सन २०२०-२१**

कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे १, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत असणाऱ्या **खुला (वर्ग-४ अ ब त्यावरील)** खालील कामाकरिता ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ येथून डाऊनलोड करण्यात यावीत, तसेच निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे १ यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही.

कामाचे नाव : १) को.प.बंधारा कोंढवली, ता.वेल्हे, जि.पुणे या को.प.बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम करणे. सन २०२०-२१ (कामाची किंमत रु. ५५,९३,८५१।-)
(निकष - सा.बां.वि.कडील नोंदणीकृत पात्र कंत्राटदार- खुला, वर्ग ४ अ)

| | |
|---|---|
| जिल्हा | : पुणे |
| निविदेची अंदाजित किंमत रुपये | : ५५.९४ लाख. |
| ई-निविदा उपलब्ध कालावधी | : दिनांक ३१/०३/२०२१- ते १५/०४/२०२१ |
| ई-निविदा उघडणे | : दिनांक १९/०४/२०२१ |

खालील ठिकाणी ई-निविदा सर्व माहिती उपलब्ध आहे.
१) संकेतस्थळ : http://mahatenders.gov.in
(सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवर कळविण्यात येईल.) २. कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे यांचे कार्यालयातील सूचना फलक.

जावक क्रमांक पुपावि/लेखा शाखा-१/निविदा/१८२३/सन २०२१
कार्यकारी अभियंता, पुणे पाटबंधारे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय.
नवीन प्रशासकीय इमारत, डी विंग, पश्चिम बाजू, दुसरा मजला, पुणे ४११००१.
दूरध्वनी ०२०-२९७०५१६७
दिनांक : २६/०३/२०२१

सही
**(राजेंद्र धोडपकर)**
कार्यकारी अभियंता
पुणे पाटबंधारे विभाग, पुणे १

शिक्का
विमाका, पुणे

**विमाका-पुणे-जाहि-३२१-/२०२०-२१**


BASSEIN CATHOLIC
CO-OPERATIVE BANK LTD
ESTD. 1918
(SCHEDULED BANK)
BCCB
GREEN
SOLAR LOAN
*Condition Apply
Loan For Installing Solar Plants
For Domestic/Commercial Purpose
8.50 % p.a*
Call: 0250 2322053 / 9527441600 | Toll free no: 1800 266 2407
www.bccb.co.in

**Registered** Licence to Post Without Prepayment of Postage No. WPP-6 / 31-12-2023
एन.डी.नं.आर.एन.आय.१६०१/५७ Postal Registration No. PCW/080/ 2021-2023
Posted at PUNE PSO GPO 411001 / Every Monday / Date of Posting : 5-4-2021 / Date of Publication : 5-4-2021




पाने २३८ । किंमत २०० रुपये

# १५ एप्रिल पासून उपलब्ध साधना प्रकाशनाचे नवे पुस्तक

# तुझ्यासवे तुझ्याविना

## सुरेश द्वादशीवार

सुरेश द्वादशीवार यांनी चार वर्षांपूर्वी दिवंगत झालेल्या पत्नी जयाला उद्देशून लिहिलेल्या ३० दीर्घ पत्रांचे हे पुस्तक आहे. या पुस्तकात कौटुंबिक आठवणी तर आहेतच, पण जास्त भाग व्यापला आहे तो राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटना घडामोडींच्या आठवणींनी! आधी राज्यशास्त्राचे प्राध्यापक आणि नंतर 'लोकसत्ता' व 'लोकमत' या दैनिकांचे नागपूर आवृत्त्यांचे संपादक, आठ वैचारिक कादंबऱ्यांचे व दहा वैचारिक पुस्तकांचे लेखक अशी त्यांची ओळख महाराष्ट्राला आहे. मात्र ते त्या पलीकडे बरेच काही होते/आहेत, हे या नव्या पुस्तकातून चांगले कळते.
– संपादक

मी मूल्यांसाठी तुरुंगवास भोगला. ज्यांच्या दर्शनासाठी लोक येतात, त्यांचा रोष ओढवून घेतला. त्यांच्याशी असलेले पितृवत संबंध फुंकून टाकले. पण विचारांची कास सोडली नाही आणि थोरा-मोठ्यांचे पदर कधी सोडले नाहीत.

ज्यांना मी ऐकविले ते महाराष्ट्राचे नामवंत वक्ते आणि आत-बाहेर संतवृत्ती धारण करणारे माझेच वडीलधारे होते. ते कमालीचे प्रामाणिक होते. माझे ऐकून ते म्हणाले, 'तू म्हणतोस ते खरे आहे.' मला माणसांचा मोह सोडवत नाही. त्यासाठी त्यांच्या प्रमादांकडे दुर्लक्ष करणे कमीपणाचे वाटत नाही. पण त्यांच्याविषयीच्या माझ्या विश्वासाचे टवके मात्र नेहमीच उडत असतात.

'तरुण भारत'मध्ये असताना मी संघाचा नव्हतो, 'लोकमत'मध्ये राहून मी काँग्रेसचा झालो नाही आणि 'लोकसत्ता'त असतानाही मी संचालकांची तरफदारी कधी केली नाही. पदे सोडली, संघटना सोडल्या, एकटे राहणे पसंत केले अन् त्यासाठी प्रत्येक पावलागणिक तसे राहण्याची किंमत चुकवत राहिलो. किमतीहून मूल्य मोठे असते, असे तूही म्हणायचीस. माझ्या तशा निर्णयांच्या मागे दर वेळी तू उभी राहिलीस.

also available on amazon.in

e-book स्वरूपात किंडलवर उपलब्ध

संपर्क
**साधना** प्रकाशन
431, शनिवार पेठ, पुणे 411030
Ph. 020-24459635 / mediasadhana@gmail.com